पुणे, वार्षिक वर्गणी २०० रुपये, किंमत २० रुपये, जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२३, खंड २२, अंक ४-५-६, पृष्ठे १००

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


५ ■ कृत्रिम बुद्धिमत्तेचे आव्हान आणि संधी
१० ■ वाढत्या बेरोजगारीचे चिनी वास्तव
१४ ■ शाश्वत शेतीसाठी 'डिजिटल फार्मिंग'
२० ■ डॉ. राजा दीक्षित यांचे भाषण

**अर्थबोधपत्रिका पुरवणी**

**कवडसे, प्रा. वि. म. दांडेकर यांच्या विचारविश्वाचे...**

३९ ■ भारतीय अर्थव्यवस्थेतील बेकारी आणि असमतोल
५६ ■ दीक्षान्त भाषण
६३ ■ वंचितांचा विकास प्रयत्न
७१ ■ पूर्ण रोजगार : नवीन नियोजन आयोगाचा दृष्टिकोन


**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

**वार्षिक वर्गणी २००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/मनीऑर्डर/पोस्टल ऑर्डर/ चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. **त्याबरोबर नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.

वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : ०२०-२५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेल : ispepune@gmail.com
www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड २२ (अंक ४-५-६)**
**जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर- २०२३**
**संपादक - अभय टिळक**
**सहयोगी संपादक - पराग पोतदार**

- **अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?**
- उद्बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- नि:पक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

## अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यत: इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी अनेक माहिती संदर्भासह पुरविणे.**

***अर्थबोधपत्रिका कशी साकारते?***

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याल अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

---

- या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि / किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.
- अंकातील लेख आपण नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. **यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. – तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# सुस्कारा

जवळपास तीन चतुर्थांश पावसाळा उलटून गेला तरी राज्यातील मोठ्या धरणांमधील पाणीसाठा पुरेसा समाधानकारक नसल्याच्या वार्ता येत असल्यामुळे सर्वत्रच एक प्रकारची अस्फुट धास्ती नांदत राहिली. मात्र, सप्टेंबर महिना सरतासरता बरसलेल्या पर्जन्यराजाने मोठाच दिलासा दिला. राज्यकर्त्यांपासून ते सर्वसामान्य नागरिकांनी त्यांमुळे समाधानाचा सुस्कारा सोडावा हे स्वाभाविक ठरते. वैश्विक स्तरावरील पर्यावरणीय बदलांचा प्रभाव भारतीय उपखंडात 'नेमेचि' येणाऱ्या पावसाळ्यावर अलीकडील काळात वारंवार आणि वाढत्या तीव्रतेने पडत असल्याचा अनुभव आपण सगळेच घेतो आहोत. परंतु, अनुभवातून शहाणे होण्याकडे आपली वाटचाल डोळसपणे चालू असल्याचे वास्तव घाऊक प्रमाणावर गैरहजरच दिसते. जगभरातील मनुष्यमात्रांची बदलती जीवनशैली हा पर्यावरणीय स्थित्यंतरांना हातभार लावणारा एक मुख्य घटक होय, हे आता अनेक अभ्यासांती सिद्ध झालेले आहे. शतकानुशतके वंचितता आणि अभावग्रस्तता नशिबी आलेले जगभरचे अनेक जनसमूह अलीकडील काही दशकांत नवसुबत्तेची झुळूक चाखत आहेत. अशा परिस्थितीत, 'चंगळवादाला लगाम घाला', अशा उपदेशाचे डोस कितीही आणि कोणीही पाजले तरी व्यवहारात त्यांचे परिणाम दिसून येण्याच्या शक्यता धूसरच राहतात. हा निराशावाद मुळीच नाही. अथवा, काही समाजघटकांच्या बेगुमान, बेदरकार जीवनराहाटीचे समर्थनही नाही. हे आहे केवळ वस्तुस्थितीचे कथन. अशा लोकव्यवहारात, एक प्रगल्भ आणि जबाबदार अशी पाणीवापराची संस्कृती निर्माण करून ती जनमानसात खोलवर रुजावी, यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणे, एवढेच आपल्या हातात राहते. घरगुती पाणीवापरापासूनच याची सुरुवात करावी लागेल. घरीदारी आपण पाण्याचा किती बेजबाबदारपणे वापर करतो, हे जरा निरखून बघितले तरी आपल्याच ध्यानात येईल. पाण्याला मोल आहे, ही बाब आपण जणू काही विसरूनच जातो अथवा गेलेलो आहोत. केवळ पाणीपट्टी भरली की आपण पाण्याचे मूल्य चुकते केले, हा आपला समज अतिशय भ्रामक आणि म्हणूनच दिशाभूल करणारा आहे.

तसे बघायला गेले तर, आपण जी काही पाणीपट्टी भरतो तिच्यात पाणीपुरवठ्याच्या वास्तविक खर्चाचे प्रतिबिंब किती रास्तपणे उमटलेले असते याचाही नीट अभ्यास करणे अनिवार्य बनते आहे. पाणी ही जीवनावश्यक चीज आहे म्हणून तिचे शुल्क व्यापारी तत्वांवर आकारले जाऊ नये, हे मान्यच आहे. परंतु, म्हणून पाणी अत्यल्प शुल्क आकारणी करून पुरवले जावे, हेदेखील अयोग्यच. कारण, तसे होण्याने पाण्याचे 'शुल्क', 'मूल्य' आणि 'किंमत' या तीनही बाबींमध्ये तारतम्य राखण्याचा मुद्दा पार निकालातच निघतो. घरात अथवा शेतात पुरविल्या जाणाऱ्या पाण्याचे शुल्क आपण चुकते करू. परंतु, पाणीवितरणाच्या सदोष आणि नादुरुस्त यंत्रणेपायी गळती होऊन वाया जाणाया पाण्याचे मूल्य अथवा किंमत कोणी जोखली आहे? पर्जन्यमानातील वारंवार उद्‍भवणारी अनियमितता या साऱ्या कळीच्या मुद्यांकडे आपले लक्ष वेधते आहे. पण आपण मनावर घेणार का?

## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी– 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारासंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्‍धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

# तंत्रज्ञान

## कृत्रिम बुद्धिमत्तेचे आव्हान आणि संधी

कृत्रिम बुद्धिमत्तेचा अर्थात 'आर्टिफिशिअल इंटेलिजन्स' (एआय) तंत्रज्ञानाचा वापर ज्या वेगाने सध्या जगभरात होऊ लागलेला आहे तो पाहता येणाऱ्या काळामध्ये या नव्या तंत्रज्ञानाचा बोलबाला असणार हे अगदी उघड आहे. सध्या दैनंदिन जीवनात आणि प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी त्याचा होत असलेला वापर पाहता आणि भविष्यात या तंत्रज्ञानाचा किती प्रकारे व किती प्रभावी वापर होऊ शकतो हे लक्षात घेता कृत्रिम बुद्धिमत्ता ही लवकरच मानवी बुद्धिमत्तेसमोर एक प्रखर आव्हान बनून उभी राहील अशी शक्यता जाणकारांकडून वर्तवली जाते आहे. याचे अगदी बोलके आणि ताजे उदाहरण म्हणजे, 'एआय' तंत्रज्ञानाच्या विरोधामध्ये हॉलिवूडमध्ये अलीकडेच पुकारण्यात आलेला संप. चित्रपटामध्ये एखाद्या तंत्रज्ञानाचा वापर केला म्हणून हॉलिवूड संपावर जाण्याची ही बहुधा आजवरच्या इतिहासातील पहिलीच घटना असावी. हॉलिवूडमधील गेल्या ६० वर्षांतील हे सर्वांत मोठे आंदोलन मानले जाते आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वाढता वापर आणि पूर्वी काम करीत असलेल्या कलाकारांना मिळत असलेला कमी मोबदला याच्या विरोधात हा संप पुकारता. विशेष म्हणजे हा विरोध करणाऱ्यांमध्ये लेखकांची संख्या सर्वाधिक असून चित्रपट आणि दूरचित्रवाणीच्या हजारो कलावंतांनी या लेखकांना पाठिंबा दिला. लेखक आणि कलावंतांना वाजवी वेतन मिळावे आणि 'एआय' तंत्रज्ञानाचा अवास्तव वापर थांबवावा अशी त्यांची प्रमुख मागणी आहे. या संपामध्ये एक लाख पन्नास हजारांहून अधिक लोकांनी काम थांबवलेले असल्याने अमेरिकी चित्रपट आणि दूरचित्रवाणी निर्माते यांना मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तवली जाते आहे. याच स्वरूपाच्या मागणीसाठी 'Writers Guild of America' या संस्थेचे ११ हजार सदस्यदेखील संपावर गेले. कामाच्या अधिक चांगल्या संधी उपलब्ध व्हाव्यात आणि तंत्रज्ञानाचा अतिरेकी वापर थांबवावा याच त्यांच्या प्रमुख मागण्या आहेत.

आयरिश अभिनेता Cillian Murphy, अमेरिकी अभिनेता Matt Damon आणि ब्रिटिश अभिनेत्री Emily Blunt या सर्वांनी या संपाला पाठिंबा दिला आणि तशा 'पोस्ट' त्यांनी समाजमाध्यमांवरही केलेल्या दिसल्या. पॅरामाउंट, वॉर्नर ब्रदर्स आणि डिस्ने या कंपन्यांच्यासमोर कलावंत आणि लेखकांनी आता निदर्शने केली आहे. मोशन पिक्चर्समध्ये काम करणारे लोक, तंत्रज्ञ, नर्तक, गायक, स्टंट कलाकार यांनाही आपल्या भवितव्याची भीती वाटत असल्याने त्यांनीही या संपाला पाठिंबा दिली.

लेखक आणि कलाकार एकावेळी संपावर जाण्याची ही पहिलीच वेळ आहे. या पूर्वी १९६० साली अभिनेते आणि अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष Ronald Reagan यांच्या पुढाकाराने संप झाला होता. त्यानंतर इतक्या मोठा प्रमाणावर हाच मोठा संप आहे. त्यामुळे हॉलिवूडचे मोठे आर्थिक नुकसान होईल असे मानले जाते आहे. या सगळ्याच्या पाठीमागे एक प्रमुख मागणी आहे ती म्हणजे, 'एआय' तंत्रज्ञानाच्या अवास्तव वापराला असलेला विरोध. डिजिटल तंत्रज्ञानाचा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून चित्रपटांमध्ये आता अशक्य वाटणाऱ्या गोष्टीही अगदी सहजतेने साकारणे शक्य झालेले आहे. परंतु या सगळ्यामध्ये कलाकारांवर अन्याय होऊन त्यांचे महत्त्व कमी होत जाईल, हीच भीती लेखकांनाही वाटते आहे. त्यामुळेच आपले अस्तित्व टिकून राहावे आणि केलेल्या कामाचा यथायोग्य मोबदला मिळत राहावा म्हणून त्यांनी हे संपाचे हत्यार उचललेले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आणि प्रभाव येणाऱ्या काळात आणखी वेगाने वाढत जाणार आहे हे लक्षात घेऊनच या आव्हानाची व भविष्यातील संकटाची पावले ओळखून त्यास विरोध करण्यास त्यांनी सुरुवात केलेली आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या रूपाने एक नवे तंत्रज्ञान आता आपल्या दरवाजापर्यंत येऊन ठेपलेले आहे. आपल्या जीवनात विविध स्तरांवर परिवर्तन घडवण्याची क्षमता असलेली क्रांतिकारी शक्ती म्हणून त्याकडे पाहिले जाते आहे. येणाऱ्या काळात दैनंदिन जीवन आणि व्यावसायिक पातळीवर या तंत्रज्ञानाचा प्रभाव खूप राहील असा अंदाज वर्तवण्यात येतो आहे. त्यामुळे एका बाजूला मोठे आव्हान वाटत असले तरी त्यात संधीही दडलेल्या आहेत. या दोन्हीचा विचार करूनच पुढे जावे लागणार आहे. त्या पार्श्वभूमीवर कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे जी नवी आव्हाने उभी ठाकणार आहेत, ती प्रथमत: पाहायला हवीत.

**योग्य-अयोग्यतेची निवड**

कृत्रिम बुद्धिमत्ता ही यंत्रणाच मुळी तंत्रज्ञानावर आधारित आहे. त्यामुळे तिला

नीती–अनीतीचे बंधन नाही. प्राप्त असलेल्या माहितीच्या आधाराने आवश्यक असणारा मजकूर तयार करून देणे हे या तंत्रज्ञानाचे वैशिष्ट असले तरीदेखील त्याचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरू झाल्यानंतर नैतिक मूल्यांचे काय होणार हा प्रश्न अभ्यासकांकडून उपस्थित केला जातो आहे. योग्य काय अयोग्य काय आणि नैतिक काय व अनैतिक काय याची निवड करण्याची क्षमता कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये असणार आहे का, असा प्रश्न निर्माण होत असून त्यात तथ्यही आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर जसजसा वाढत जाईल तसतसा व्यावसायिक पातळीवर रोजगारावर त्याचा प्रतिकूल परिणाम होत जाईल, असा अंदाज या क्षेत्रातील अभ्यासक वर्तवत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव व्यावसायिक आणि उद्योगक्षेत्रावर पडतो आहे. या नव्या तंत्रज्ञानाचे अनेकांना आकर्षणही आहे. येणाऱ्या काळात कृत्रिम तंत्रज्ञान एकूणच बाजारपेठेवर प्रभाव निर्माण करेल असा अंदाज आहे. हे तंत्रज्ञान प्रत्येक टप्प्यावर स्वत:ला विकसित करीत जाणारे आहे. त्यामुळे त्या दृष्टीने स्वत:ला अद्ययावत ठेवू शकणाऱ्या आणि हे तंत्रज्ञान प्रभावी रीतीने हाताळू शकणाऱ्या लोकांना नव्या संधी प्राप्त होतील. परंतु, यात जे मागे पडतील किंवा ज्यांची कामे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधाराने सहजतेने होतील त्यांचे रोजगार भविष्यात धोक्यात येतील, अशी भीतीही व्यक्त केली जाते आहे. त्यामुळे प्रस्थापित कर्मचाऱ्यांचे कौशल्य आणि क्षमता विस्तारण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागणार आहेत.

हव्या त्या माहितीचे संकलन, विश्लेषण करणे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून जरी सहजसाध्य होणार असले तरीदेखील उपलब्ध होणाऱ्या त्या माहितीची गोपनीयता आणि सुरक्षितता हा अतिशय कळीचा मुद्दा असणार आहे. त्यामुळे तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सर्व माहिती संकलित करीत असताना आपला उद्योगव्यवसाय, किंवा व्यक्तिगत स्वरूपाची माहिती गोपनीय आणि सुरक्षित राहू शकेल का, त्याची हमी काय असेल, माहिती गोपनीय न राहू शकल्यास त्याला जबाबदार कोण राहील, असे प्रश्न यातून सहजच उद्‌भवतात.

कृत्रिम बुद्धिमत्तेचे संचालन करण्यासाठी जी यंत्रणा प्रस्थापित करावी लागते त्यात 'अल्गोरिदम'चा प्रभाव खूप मोठा असतो. ही एकूणच प्रक्रिया तशी काहीशी जटिल असते. त्यामुळे तिच्यामध्ये पारदर्शकतेचा अभाव असतो. एखादी गोष्ट जेव्हा कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून सुचवली जाते किंवा आपल्यासमोर सादर केली जाते तेव्हा ती प्रक्रिया नेमकी झाली कशी, हे समजून येत नाही. प्राप्त होणाऱ्या माहितीच्या विश्वासार्हतेवरही त्यामुळे शंका उपस्थित केली जाऊ शकते. या

पारदर्शकतेअभावी अनेक विषयांबाबत संदिग्धता राहते. विशेषत: आरोग्यसेवा, संशोधन, माहितीचे आदानप्रदान, संवेदनशील स्वरूपाचे सामाजिक विषय या बाबतीत ही माहिती मिळवताना विशेष काळजी घ्यावी लागते.

कोणतेही नवे तंत्रज्ञान हळूहळू आपल्या अंगवळणी पडत असताना सुरुवातीच्या टप्प्यावर असे काही धोके जाणवणे स्वाभाविकच असते. आज प्राथमिक स्थितीत असणारे कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान जसजसे विकसित होत जाईल तसतशी प्रत्येक टप्प्यावर नवनवीन सुधारणाही होत जाणार आहे. त्यामुळे आज जी आव्हाने वाटत आहेत किंवा ज्या ज्या गोष्टींची भीती वाटत आहे त्या गोष्टी येणाऱ्या काळात तितक्या ठळकपणे प्रस्तुत राहतीलच असे वाटत नाही. या नव्या तंत्रज्ञानामुळे ज्या नव्या संधी निर्माण होणार आहेत त्याकडेदेखील तितक्याच डोळसपणाने पाहणे त्यामुळे गरजेचे आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून एकूण कार्यक्षमतेत आणि उत्पादकतेत वाढ निश्चितपणाने होईल असा अंदाज जाणकारांकडून व्यक्त केला जातो आहे. त्यामुळे प्रस्थापित कर्मचाऱ्यांना अधिक जटिल आणि सर्जनशील कामांवर लक्ष केंद्रित करता येऊ शकते. यातून एक सुनियोजित अशी कार्यप्रणाली प्रस्थापित होऊ शकते. कामातील अचूकता वाढू शकते आणि कार्यक्षमता निश्चितपणे सुधारू शकते.

**निर्णयप्रक्रियेत सुधारणा**

प्राप्त होणाऱ्या विविध प्रकारच्या माहितीचे अचूक विश्लेषण करण्याची एक वेगळी क्षमता कृत्रिम बुद्धिमत्तेकडे असल्याकारणाने एकूणच निर्णयप्रक्रियेत चांगली सुधारणा होईल असा विश्वास अभ्यासकांना वाटतो. विविध व्यवसायांमध्ये कार्यरत असणाऱ्या प्रमुख व्यक्तींना धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी या माहितीचा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे केलेल्या विश्लेषणाचा चांगल्या रीतीने उपयोग होऊ शकतो. त्यामुळे एकूण कार्यपद्धतीतदेखील सुधारणा होऊ शकते आणि तिचे अधिक चांगले परिणाम मिळू शकतात. या शिवाय, संशोधन आणि विकास या प्रक्रियेमध्येदेखील माहिती संकलित करण्यासाठी आणि विविध पूरक संदर्भ उपलब्ध करून देण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा चांगला उपयोग होऊ शकतो. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर व्यवसाय व उद्योगांच्या दृष्टीने निश्चितपणाने लाभदायी ठरू शकतो. येणाऱ्या काळात तो अधिकाधिक प्रमाणात वाढत जाणार आहे.

माहितीचे संकलन आणि उपलब्ध माहितीचा आवश्यकतेनुसार प्राधान्यक्रम लावून देण्याची क्षमता यामुळे व्यक्तिगत पातळीवरचा अनुभव वापरकर्त्यांना मिळू

शकतो, असा विश्वास या तंत्रज्ञानाची पाठराखण करणाऱ्या जाणकारांकडून व्यक्त केला जातो आहे. 'इ-कॉमर्स'सह विविध प्रकारच्या गोष्टी या माध्यमातून नव्याने शिकण्याची संधी प्राप्त होऊ शकते. स्वत:ला हवा असणारा आशय आणि व्यक्तिगत पातळीवरची उत्तरे या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्राप्त होत असल्याने हे तंत्रज्ञान भविष्यात लोकांना अधिक आपलेसे वाटू शकते. आपल्याला जी माहिती ज्या स्वरूपात हवी आहे त्या आज्ञावली योग्य रीतीने दिल्यानंतर त्या संदर्भातील ती माहिती तत्काळ प्राप्त होऊ शकते हे या तंत्रज्ञानाचे खरे वैशिष्ट असल्याने भविष्यात हे तंत्रज्ञान वैयक्तिक वापरासाठी सर्वाधिक वापरले जाणार आहे.

येणाऱ्या काळात उद्योगधंदे, सेवा क्षेत्र, आरोग्यसेवा क्षेत्र या विविध क्षेत्रांत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बळावर खूप वेगाने प्रगती होईल, असा अंदाज आहे. माहिती संकलन, विश्लेषण आणि तिचा प्रत्यक्ष वापर यात खूप सुधारणा होत जाईल. आरोग्यसेवेच्या क्षेत्रात हे तंत्रज्ञान अधिक मोलाचे योगदान देऊ शकेल, असा विाास जाणकारांना आहे.

'नॅचरल लर्निंग प्रोसेसिंग', 'रोबोटिक्स', 'मशिन लर्निंग' आणि 'डीप लर्निंग' ही कृत्रिम बुद्धिमत्तेची प्रमुख अंगे मानली जात आहेत. हे तंत्रज्ञान जेव्हा प्रभावीपणाने उदयास येईल तेव्हा कदाचित आज जे आपले अवलंबित्व माहितीच्या शोधासाठी 'गूगल'सारख्या 'सर्च इंजिन'वर अवलंबून आहे ते लयास जाऊन तयार माहितीचा साठाच हाती येत जाणार आहे. प्रादेशिक भाषेच्या अडचणीही कालांतराने दूर होत जाऊन हे तंत्रज्ञान अधिक प्रगल्भ होत जाणार आहे. या तंत्रज्ञानात ज्या वेगाने सुधारणा होत आहेत ते पाहता तो काळ दूर नाही, असे लक्षात येते.

आजच्या घडीला काहीसे गुतांगुंतीचे वाटणारे आणि मनात एक प्रकारची धास्ती निर्माण करणारे हे तंत्रज्ञान कदाचित उद्या आपल्या जगण्याचा अविभाज्य भाग बनलेले असू शकेल. त्यामुळेच त्यातून निर्माण होणाऱ्या आव्हानांचा आणि त्यातील नवनव्या संधींचा शोध घेत स्वत:ला प्रगत करीत जाणे हा शहाणपणाचा मार्ग असणार आहे.

# आंतरराष्ट्रीय

## वाढत्या बेरोजगारीचे चिनी वास्तव

'कोविड १९'च्या महामारीनंतर जगभरातील देशांपुढे जी आव्हाने निर्माण झालेली आहेत त्याच्या चपेट्यातून चीनसारखी महासत्ताही सुटलेली नाही. एप्रिल २०२३च्या आकडेवारीनुसार, चीनमधील बेरोजगारी सातत्याने वाढत असून १६ ते २४ वयोगटातील २०.४ टक्के तरुण बेरोजगार होते. त्यातून चीनची आर्थिक आव्हाने वाढत चाललेली आहेत. युवकांची बेरोजगारी आणि ज्येष्ठांची वाढती संख्या अशी दुहेरी आव्हाने चीनच्या पुढ्यात आहेत. चीनमधील वाढत्या लोकसंख्येला आळा बसला असला तरीदेखील येत्या दहा वर्षांत देशातील ४० कोटी लोक हे ६० वर्षे अथवा त्यापेक्षा अधिक वयाचे असतील. एकूण लोकसंख्येच्या तुलनेत हे प्रमाण ३० टक्के इतके मोठे असणार आहे.

वृद्धांच्या संख्येपेक्षा बेरोजगारीची समस्या येणाऱ्या काळात अधिक गंभीर होत जाणार आहे. चीनमधील श्रमशक्ती दरवर्षी १.१ टक्क्यांनी कमी होते आहे आणि तरुणांची बेरोजगारी वाढत चालली आहे. उच्चशिक्षित पिढीमध्ये नोकऱ्या गमावण्याचे प्रमाणही मोठे आहे. त्यामुळे समाजमाध्यमांवरदेखील त्याचे मोठे प्रतिसाद उमटू लागले आहेत. स्वत:च्या भविष्याची चिंता असणाऱ्या तरुणाईचे स्वप्न या वाढत्या बेरोजगारीने भंग होईल की काय अशी भीती आता व्यक्त होते आहे. जगातील सर्वोच्च महासत्ता बनण्याच्या आकांक्षेने झपाटलेला चीन देशांतर्गत पातळीवर सध्या बेरोजगारीच्या आव्हानाचा सामना करतो आहे.

याचे एक प्रातिनिधिक उदाहरण सांगायचे झाले तर, सरकारी नोकऱ्यांसाठी अगदी अलीकडे चीनमध्ये एक स्पर्धा परीक्षा झाली. या परीक्षेसाठी बसलेल्या युवकांची एकूण संख्या होती तब्बल ७७ लाख आणि उपलब्ध जागा होत्या दोन लाख! या वरून हे विषम चित्र स्पष्ट व्हावे. उपलब्ध रोजगार आणि त्यासाठी इच्छुक उमेदवार यांचे गुणोत्तर प्रमाण किती व कसे विस्कळीत होते आहे हे या वरून लक्षात येते.

‘कोविड-१९’ मुळे अर्थव्यवस्थेत जे चढउतार झाले त्यामुळे चीनमधील खासगी कंपन्यांच्या रोजगारावर परिणाम झाला आहे. चिनी कंपन्यांमधील रोजगार वेगाने कमी होत चालले असून नव्याने भरती होताना दिसत नाही. त्याउलट रोजगारक्षम अशा युवकांची संख्या झपाट्याने वाढते आहे. हे असंतुलन वाढत असल्याने बेरोजगार युवकांची संख्या वेगाने वाढत चालली आहे. चिनी विद्यापीठांतून शिक्षण घेऊन या वर्षी सुमारे १.१५ कोटी विद्यार्थी बाहेर पडतील. गेल्या वर्षीदेखील जवळपास इतक्याच संख्येने युवक-युवती शिक्षण घेऊन बाहेर पडले होते. इतक्या मोठ्या संख्येने पदवीधर होऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना तितक्याच मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणे गरजेचे आहे. परंतु, दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही. डिसेंबर २०२२ पर्यंतच्या उपलब्ध आकडेवारीनुसार, पदवीधर झालेल्या, विद्यापीठांतून शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या परंतु रोजगाराच्या नव्या संधी नसल्याने बेरोजगार असलेल्या युवकांची संख्या जवळपास चार कोटींहून अधिक होती. त्यात आणखी एक कोटी लोकांची या वर्षी नव्याने भर पडेल असा अंदाज आहे. हे चित्र नक्कीच हितावह नाही आणि यातून अनेक नव्या समस्या उद्भवतील असा जाणकारांचा अंदाज आहे. वय वर्षे १६ ते २० या वयोगटातील युवक सध्या सर्वाधिक बेरोजगार असून बेरोजगारीचे प्रमाण १८ ते २० टक्के इतके आहे. त्यामुळे शिकून बाहेर पडलेल्या प्रत्येक पाच युवकांमागे एक युवक बेरोजगार होत असल्याचे एक निराशादायी चित्र सध्या चीनच्या पुढ्यात आहे. या परिस्थितीतून मार्ग नेमका कसा काढायचा ही चिंता चीनमधील सगळ्याच धुरीणांना भेडसावते आहे.

चिनी व्यवस्थेच्या भवताली एक पोलादी भिंत असल्याने पूर्वी बऱ्याचदा आतील बातम्या बाहेर पडू दिल्या जात नसत. परंतु आता समाजमाध्यमांचे खुले व्यासपीठ मिळाल्याने युवक त्यावरून आपल्या व्यथा मांडताना दिसत आहेत. सध्याच्या परिस्थितीने निराश झालेल्या असंख्य चिनी युवक युवतींचे ‘व्हिडिओ’ सध्या समाजमाध्यमांवरून मोठ्या प्रमाणावर प्रसारित होत आहेत. त्या माध्यमातून चिनी तरुणांच्या बेरोजगारीच्या कथा आणि व्यथा आता जगभरात पोहोचत आहेत. चीनमध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या रोजगार मेळाव्यांत किंवा रोजगार विनिमय व माहिती कार्यालयांच्या बाहेर बेरोजगार तरुणांचे लोंढेच्या लोंढे उभे असल्याचे दृश्य आता चीनमध्ये नित्याचे होऊ लागले आहे. Beijing, Shanghai, Shenzhen, Guangzhou, Chengdu या शहरांमध्ये बेरोजगारीचे चित्र आणखीनच गंभीर आहे. कितीही, कुठेही प्रयत्न केले तरी नोकऱ्या मिळत नाहीत अशा विवंचनेत

आजचा चिनी तरुण वर्ग आहे. जर अशीच परिस्थिती राहणार असेल तर आम्ही घेतलेल्या शिक्षणाला अर्थ काय असा प्रश्न चिनी तरुण अगदी उघडपणे आता विचारू लागले आहेत. आपल्याला कोणत्याही क्षणी कामावरून काढले जाऊ शकते अशी एक असुरक्षिततेची टांगती तलवार जे सध्या नोकरीमध्ये आहेत त्यांच्याही डोक्यावर असल्याने तेही भीतीच्या सावटाखालीच काम करीत आहेत. विशेष म्हणजे जवळपास ५० टक्के लोकांना आपल्या नोकरीची हमी नाही आणि ते या भीतीने पछाडलेले आहेत, असे वास्तव अलीकडेच केलेल्या एका अभ्यासातून समोर आले आहे. त्यामुळे शिक्षण व शैक्षणिक पात्रता यांच्याशी सुसंगत नोकरी मिळावी अशी आशा संपुष्टात आलेले अनेक तरुण स्वच्छता कर्मचारी, सुरक्षा रक्षक किंवा 'डिलीव्हरी बॉय'या सारख्या नोकऱ्या करीत आहेत. परंतु या नोकऱ्यांनाही मर्यादा असल्याने लक्षावधी तरुणांच्या हाताला काम नाही अशी परिस्थिती सध्या चीनमध्ये दिसून येते आहे. अनेक तरुण नोकरीच्या आशेने दिवसभर फिरतात. वेगवेगळ्या ठिकाणी त्यांच्या औपचारिक मुलाखतीही घेतल्या जातात. परंतु, कुठेही नोकरीसाठी बोलावले जात नाही. त्यामुळे सातत्याने नकार झेलणाऱ्या तरुणांमध्ये वेगाने नैराश्य पसरत चालले आहे आणि त्यांना हा उद्वेग व्यक्त करण्यासाठी समाजमाध्यमांचे व्यासपीठ मिळत असल्याने हे तरुण तिथे आपल्या भावनांना वाट मोकळी करून देताना दिसत आहेत. काही ठिकाणी नोकरी देण्याची तयारी दाखवली जाते परंतु ती पदरात पाडून घेण्यासाठी आवश्यक असणारे कौशल्य या विद्यार्थ्यांकडे नसल्याने त्यांनी संबंधित प्रशिक्षण सशुल्क घ्यावे आणि नंतरच त्यांना नोकरी देण्याबाबतचा विचार केला जाईल अशी अट कंपन्यांकडून घातली जाते आहे. त्यामुळे आपण जे औपचारिक शिक्षण विद्यापीठात घेतले ते व्यर्थ होते का असा प्रश्न आता विद्यार्थ्यांकडून उपस्थित केला जातो आहे.

**वाढती महागाई आणि कामाचा ताण**

नव्याने कर्मचारी भरती होत नसल्याने रोजगार मिळालेल्यांवर अतिरिक्त बोजा पडतो आहे. अनेक कंपन्यांमध्ये १८ ते २० तास राबवून घेतले जात असल्याचीही अनेक युवकांची तक्रार आहे. मोठ्या कंपन्यांमध्ये इतके तास राबल्यानंतर दरमहा साधारण ७५०० युआन (सुमारे ९० हजार रुपये) इतके वेतन मिळत असले तरीदेखील चीनमधील वाढत्या महागाईच्या तुलनेत ही रक्कम पुरतच नाही, अशी येथील युवकांची तक्रार आहे. त्यामुळे सध्या दुसरीकडे नोकऱ्या नसल्याने हा ताण सहन करण्याशिवाय पर्याय नाही आणि जे रिकामे आहेत त्यांच्या हाताला कामच नाही अशी विचित्र परिस्थिती अनेक मोठ्या शहरांतून दिसून येते आहे.

चीनमधील ही नव-तरुणाई पूर्वीच्या पिढीसारखी गरिबीत वाढलेली नाही. त्यामुळे दारिद्र्याच्या परिस्थितीचे चटके त्यांनी फारसे सोसलेले नाहीत. 'एकच मूल' या चीनच्या धोरणामुळे अनेक घरांतील मुले एकटी वाढलेली आहेत. उत्तम शाळांमध्ये चांगले शिक्षण घेऊन बाहेर पडलेली आहेत. त्यामुळेच त्यांच्या आशा-आकांक्षा वेगळ्या आणि अधिक आहेत. अशा परिस्थितीत शिक्षण घेऊन बाहेर पडल्यानंतर मात्र प्रत्यक्षात बेरोजगारीच्या रूपाने निराशा पदरी पडत असल्याने ही पिढी चिंताक्रांत आणि अस्वस्थ आहे. याचा उद्रेक आज ना उद्या मोठ्या शहरांतून दिसू लागेल अशी चिंता अभ्यासकांना जाणवते आहे. सातत्याने वाढणाऱ्या बेरोजगारीवर मात कशी करायची याची चिंता आता शासनाला आणि चीनमधील राजकीय नेतृत्वाला भेडसावते आहे. काही प्रमाणात या समस्येवर उत्तर शोधता यावे म्हणून ३१ प्रांतांमध्ये आता रोजगाराच्या नव्या संधी तयार करण्यावर भर देण्यात आलेला आहे. स्पर्धा परीक्षांकडे आणि सुरक्षित सरकारी नोकरीकडे तरुणांचा कल लक्षात घेऊन तिथेही जागा वाढवण्यावर चीन सरकारने भर दिलेला आहे. ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी शहरी भागातील तरुणांना पाठवण्याची एक वेगळी योजनाही चीन हाती घेतो आहे. तूर्तास तरी, वाढत्या बेरोजगारीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर प्रभावी तोडगा नसल्याने येणाऱ्या काळात सध्याची ही परिस्थिती सावरते की या चक्रात चीन अधिकच गुरफटत जातो हे पाहावे लागेल.

# शेती

## शाश्वत शेतीसाठी 'डिजिटल फार्मिंग'

जगभरात अनेक देश असे आहेत जे पूर्णत: कृषी क्षेत्रावर निर्भर आहेत. मात्र, बदलत्या परिस्थितीमध्ये कृषी क्षेत्रापुढील आव्हानेही वाढत चालली आहेत. या सगळ्यात सर्वांत मोठे आव्हान असणार आहे ते पाण्याचे. येणाऱ्या काळात पाण्याची टंचाई वाढतच जाणार असल्याने उपलब्ध होणाऱ्या पाण्यात शेती कशी करायची हे एक मोठेच आव्हान शेतकऱ्यांच्या पुढ्यात उभे ठाकणार आहे. पुरेशा पाण्याशिवाय शेती शक्य नाही आणि दुसरीकडे पाण्याची टंचाई गंभीर स्वरूप धारण करीत जाईल, हे लक्षात घेता आगामी काळात पाण्याचा वापर अत्यंत जबाबदारीने करणे क्रमप्राप्त ठरणार आहे. याचा विचार आता जगभरात विविध पातळ्यांवर सुरू झालेला आहे. भारतासारख्या कृषीप्रधान देशातही याचा विचार गांभीर्याने सुरू आहे.

त्यामुळे नव्या तंत्रज्ञानाची साथ घेत शेती करण्यासाठी जगभरातील देश आता पुढे येत असून त्यातून 'डिजिटल फार्मिंग' ही नवी संकल्पना जोर धरते आहे. जमिनीची मशागत, पिकांची लागवड, प्रत्यक्ष पिके हाताशी येणे आणि त्या नंतरचे विक्री व्यवस्थापन अशा सर्वच पातळ्यांवर एकत्रितपणे होणारा तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर म्हणजे 'डिजिटल फार्मिंग' होय. अमेरिका, जर्मनी, जपान, चीन आदी देशांनी या नव्या तंत्रज्ञानाचा अंगिकार करून शेतीमध्ये अनेक नवनवीन प्रयोगदेखील सुरू केलेले आहेत. 'डिजिटल फार्मिंग'लाच 'ई-ॲग्रीकल्चर' किंवा 'स्मार्ट फार्मिंग' म्हटले जाते. त्याचा प्रभावी वापर आता ठिकठिकाणी होताना दिसतो आहे.

**चिनी आघाडी**

चीनने 'डिजिटल फार्मिंग'च्या क्षेत्रात अनेक नवनवीन प्रयोग केलेले आहेत. आर्थिक विकासादरम्यान चीनने कृषी क्षेत्रावर विशेष लक्ष केंद्रित केले असून या क्षेत्रात चांगली प्रगती करताना त्यात नव्या तंत्रज्ञानाची साथ घेतली आहे. मांस, अंडी, फळे आणि भाज्य यांच्या उत्पादनात चीन आज जगात आघाडीवर आहे.

त्यासाठी कृषी क्षेत्रात चीनने आमूलाग्र असे बदल केलेले आहेत. प्रामुख्याने यांत्रिकीकरण आणि आधुनिकीकरणावर त्यात विशेषत्वाने भर दिलेला आहे. पुढील काळातील आव्हानांचा वेध घेत ज्या ज्या गोष्टी कृषी क्षेत्रामध्ये करणे गरजेचे आहे त्या दिशेने पावले टाकायलाही चीनने सुरूवात केलेली आहे. त्याचाच एक भाग म्हणून चीनने अनेक ठिकाणी 'डिजिटल फार्मिंग'ची सुरुवात केली आहे.

पूर्वीच्या काळी शेती हाच एक मुख्य पारंपरिक व्यवसाय मानून उदरनिर्वाह करणारे अनेक शेतकरी होते. त्यांच्या माध्यमातून केली जाणारी शेती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत असे. आता आधुनिक युगामध्ये परिस्थिती वेगाने बदलत चालली आहे. आजच्या घडीला कृषी क्षेत्रामध्ये काम करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होते आहे. कमी मनुष्यबळात करायचे कष्टाचे काम, अशी शेतीची सध्याची अवस्था आहे. अशा परिस्थितीमध्ये नव्या तंत्रज्ञानाचा अंगीकार करून कमीतकमी मनुष्यबळात अधिकाधिक चांगले आणि परिणामकारक काम 'डिजिटल फार्मिंग'च्या माध्यमातून होऊ शकते असे दिसून आले आहे. यात आधुनिक तंत्रज्ञानाची भूमिका फार महत्त्वाची ठरते आहे. गेल्या तीन दशकांमध्ये कृषी क्षेत्रामध्ये अनेक लक्षणीय बदल होताना दिसत आहेत. तसेच, उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातही 'डिजिटल' कृषी तंत्रज्ञान हा विषय नव्याने समाविष्ट करण्यात आलेला असून त्याचा प्रत्यक्ष वापरही अनेक ठिकाणी होताना दिसतो आहे. अमेरिका आणि जगभरातील अनेक विश्वविद्यालयांमध्ये शाश्वत शेतीच्या अनुषंगाने १४० हून अधिक विविध प्रकारचे अभ्यासक्रम शिकवले जात आहेत. या क्षेत्रात काही करू पाहणाऱ्या तरुणाईला नवनवीन तंत्रज्ञानासह पर्यावरणाचे रक्षण, संतुलन आणि कृषी क्षेत्रातील महत्त्वाचे संशोधन शिकण्यात अधिक रस आहे. त्या दृष्टीने 'डिजिटल फार्मिंग' हे आधुनिक काळासाठी वरदान ठरेल अशी आशा व्यक्त केली जाते.

**पैसा आणि वेळेची बचत**

शेती करण्याची पारंपरिक पद्धत 'डिजिटल' पद्धतीमुळे वेगाने बदलते आहे. पैसा आणि वेळेची बचत ही 'डिजिटल फार्मिंग'ची सर्वांत मोठी उपलब्धी मानली जाते. त्यामुळे या तंत्रज्ञानाकडे कल वाढू लागला आहे. माहितीचे अचूक संकलन, पूर्वानुमान, विश्लेषण, 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'चा (एआय) प्रभावी वापर, संपूर्ण शेतीचे सुनियोजित असे व्यवस्थापन यामुळे 'डिजिटल फार्मिंग' शेतकऱ्यांच्या दृष्टीने पैसा आणि वेळेची बचत करणारा एक प्रभावी पर्याय ठरतो आहे.

'डिजिटल फार्मिंग'मध्ये तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला जात असल्याने त्यात शेतकऱ्यांचा मोठा लाभ होतो. उपग्रहाच्या माध्यमातून आणि 'ड्रोन'चा वापर करून

शेतीची उंचावरून छायाचित्रे टिपता येतात. या सर्व छायाचित्रांचे अध्ययन आणि अभ्यास करून पिके केव्हा घ्यावी, कोणत्या प्रकारची घ्यावीत, नेमकी कोणत्या काळामध्ये घ्यावीत आणि कशा पद्धतीने शेती करावी याची पुढील सुस्पष्ट दिशा मिळू शकते आणि त्यामुळे कृषी उत्पादनातसुद्धा वाढ होत जाते. उपग्रहाच्या माध्यमातून जी महत्त्वाची आकडेवारी प्राप्त होते आणि जी ताजी माहिती हाताशी येते तिचा उपयोगदेखील शेती करताना अगदी निश्चितपणाने होतो.

शेतीमध्ये वापरली जाणारी प्रत्यक्षातील उपकरणे आणि संगणकाच्या मदतीने कृषी क्षेत्राला मदत करण्यासाठी साकारण्यात येणारी संगणकीय आज्ञावली या दोन्हीमध्ये सातत्याने क्रांती होत असून शेती करण्यासाठी नवनवीन पद्धतींचा शोध लावला जातो आहे. शेती करताना होणारे कष्ट लक्षात घेता त्यात सुलभता यावी आणि कमी कष्टांत अधिक उत्पादन मिळवण्याच्या दिशेने पावले टाकत असतानाच कृषी उत्पादनांचा दर्जा उत्कृष्ट राखण्याच्या दिशेने प्रयत्न करण्यावर भर दिला जातो आहे.

**'मोबाइल ॲप्स'चे वरदान**

पिकांवर पडणारे रोग ही शेतकऱ्यांसाठी मोठी डोकेदुखी ठरत असते. त्यावर तत्काळ योग्य उपाययोजना न झाल्यास पिकांचे नुकसान होते आणि त्यामुळे शेतकऱ्याला मोठी आर्थिक झळ बसते. अनेकदा कर्ज काढून शेती केली जात असल्याने शेतकरी कर्जबाजारी होऊन पुरते हवालदिल होतात. अशा परिस्थितीमध्ये शेतीतील या अडचणींविषयी नेमके मार्गदर्शन करू शकणारी 'मोबाइल ॲप्स' बाजारात दाखल झालेली आहेत. सामान्य शेतकऱ्यांपर्यंत 'स्मार्ट फोन' पोहोचलेले असल्याकारणाने त्याद्वारे ते आपली समस्या 'ॲप'वर पाठवू शकतात आणि त्याचे नेमके उत्तर त्यांना मिळू शकते. त्यांना योग्य ते मार्गदर्शन केले जाते. बदलत्या हवामानानुसार कोणत्या पिकांवर कोणत्या प्रकारच्या कीटकांचा हल्ला होऊ शकतो याचेही पूर्वानुमान शेतकऱ्यांना कळवणे आता 'ॲप'च्या माध्यमातून सोपे झालेले आहे. 'डिजिटल फार्मिंग' विषयी मार्गदर्शन करणारी काही उपयुक्त 'ॲप'देखील नव्याने तयार करण्यात आलेली आहेत. 'ॲग्रिगेज एक्सेलियर' नावाच्या एका कंपनीने Farmshots नावाचे एक खास 'ॲप' तयार केलेले आहे. त्याद्वारे 'डिजिटल फार्मिंग' मध्ये नव्याने काय काय करता येऊ शकते आणि नव्या तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर कसा करायचा या विषयी अतिशय सुंदर असे मार्गदर्शन केलेले आहे.

याच धर्तीवर अनेक मार्गदर्शनपर कार्यक्रमांतून 'डिजिटल फार्मिंग'विषयी शेतकऱ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यावर विशेषत्वाने भर दिला जातो आहे

आणि त्यांना या नव्या पद्धतीने यथायोग्य मार्गदर्शन केले जाते आहे. उपग्रह आणि 'ड्रोन'द्वारे काढलेल्या छायाचित्रांमुळे पिकांना कोणता रोग लागलेला आहे; कीटकांचा प्रादुर्भाव नेमका कुठे व किती प्रमाणात झालेला आहे; पिकांमध्ये कोणती पोषकतत्वे कमी आहेत या सगळ्याची अचूक व शास्त्रीय माहिती प्राप्त होणे आता सोपे झाले आहे. तसेच, कोणत्या पिकांना या पुढे कीटकनाशकांची आवश्यकता लागणार आहे की फवारलेली कीटकनाशके पुरेशी आहेत किंवा कसे याचीही माहिती आता 'ड्रोन'द्वारे उपलब्ध होऊ शकणार आहे.

येणाऱ्या काळात 'ड्रोन'चा वापर फार महत्त्वाचा ठरणार असून त्यातून क्रांतिकारी असे बदल घडतील असा अंदाज कृषितज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. 'ड्रोन'च्या वापरामुळे शेतकऱ्यांना पिकांचे नुकसान वेळीच रोखता येते आणि त्यासाठी आवश्यक असणाऱ्या उपाययोजनाही नेमकेपणाने करता येतात. रोपांना नेमका कुठे आणि किती प्रमाणात सूर्यप्रकाश हवा आहे हेदेखील आता या नव्या तंत्रज्ञानामुळे कळू लागले आहे. तापमान, मृदेतील आर्द्रता, बदलत्या हवामानामध्ये घ्यायची काळजी, पाण्याचा अतिरिक्त वापर टाळणे यासारख्या सगळ्यांच बाबींमध्ये नव्या पद्धतीने शेती करण्यावर सध्या भर दिला जातो आहे. पिकांची पाहणी करताना आता 'ड्रोन'सारखी सुविधा मोठेच वरदान ठरणार आहे आणि त्याचा शेतकऱ्याला खूप उपयोगही होणार आहे.

अलीकडील काळामध्ये 'इनडोअर व्हर्टिकल फार्मिंग' ही शेती करण्याची एक नवी पद्धत विकसित होत चालली आहे. मर्यादित जागेची अडचण लक्षात घेता ज्या ठिकाणी जागेची उपलब्धता कमी आहे अशा ठिकाणी एकावर एक थर रचून शेती केली जाते. त्यास 'इनडोअर व्हर्टिकल फार्मिंग' असे म्हटले जाते. अत्याधुनिक अशा तंत्रज्ञानाच्या सहाय्याने भाजीपाला, फळे यांची लागवड करणे आणि मर्यादित जागेत अधिक उत्पादन घेणे त्यामुळे आता शक्य झालेले आहे. त्याप्रमाणे कमी पाण्यामध्ये अशी शेती होत असल्याने ती अधिक उपयुक्त ठरत असल्याचे दिसून आले आहे. एरवी जितके पाणी असते त्याच्या तुलनेत 'इनडोअर व्हर्टिकल फार्मिंग' मध्ये पाण्याची ७० टक्के बचत होते असे दिसून आले आहे. त्यामुळेच एक प्रभावी शेतीपद्धती म्हणून तिच्याकडे पाहिले जात असून अनेक देशांनी या पद्धतीने शेती करण्यास सुरुवातदेखील केली आहे. कमी मनुष्यबळामध्ये ही शेती होत असल्याने खर्चाच्या दृष्टीनेही अशी शेती किफायतशीर ठरते. त्यामुळे या प्रकारच्या शेतीकडे कल वाढतो आहे.

**अत्याधुनिक यंत्रसामुग्री**

पूर्वीच्या काळी शेतकऱ्यांना ट्रॅक्टर चालवण्याचे प्रशिक्षण अनिवार्य ठरत असे. परंतु, आता मात्र चालकविरहित ट्रॅक्टर्स किंवा 'ड्रोन'द्वारे कीटकनाशकांची फवारणी अशा अत्याधुनिक यंत्रसामुग्रीचा वापर कृषीक्षेत्रात वाढतो आहे. नव्या तंत्रज्ञानामुळे त्यात चालकाची गरज उरलेली नसून संपूर्ण शेतात कुठेही ट्रॅक्टर चालकाविना सहजतेने फिरू शकतात. अनेक देशांमध्ये आता कृषी क्षेत्रामध्ये 'रोबोटिक्स' तंत्रज्ञानाचा प्रभावी पद्धतीने वापर केला जातो आहे. Terrasentia सारखे छोटे परंतु अद्ययावत असे 'रोबॉट' शेतीमध्ये फार महत्त्वाची भूमिका बजावू शकतात असे दिसून आले आहे. शेताच्यामधून वाट काढत जाणारे हे 'रोबॉट' त्यांच्यावर बसविलेला कॅमेरा आणि 'सेन्सर्स' यांच्या मदतीने आणि 'जीपीएस' तंत्रज्ञानाच्या सहाय्याने पिकांसंबंधातील सर्व माहिती नेमकेपणाने गोळा करतात. प्राप्त झालेल्या माहितीचे अचूक विश्लेषण होऊन त्याद्वारे शेतीतील संभाव्य नुकसान वाचवता येऊ शकते. या सगळ्या गोळा केलेल्या माहितीचा एक अहवालच या 'रोबॉट'च्या मदतीने सादर केला जात असल्याने कोणत्याही पिकांचे सुनियोजित व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने पावले टाकताना खूप चांगली आणि अचूक माहिती हाताशी असते. या पूर्वी पारंपरिक पद्धतीने होणाऱ्या शेतीमध्ये याचा अभाव होता.

उपग्रहांची मदत शेतीमध्येही होऊ शकते याची जाणीव अगदी अलीकडच्या काळामध्ये झालेली आहे. त्यामुळे आता उपग्रह प्रक्षेपित करणाऱ्या काही जागतिक कंपन्यांनी शेतीसाठी उपग्रह सेवा देण्याबाबत हात पुढे केला आहे. उपग्रह सेवा देणाऱ्या कंपन्या आता खास एकेका पिकांच्या शेतीसाठीदेखील स्वतंत्रपणे सेवा देण्यासाठी सरसावलेल्या आहेत. त्यातून एक नवीनच बाजारपेठ विस्तारते आहे. त्यामुळे 'डिजिटल फार्मिंग'मधील हे एक महत्त्वाचे पाऊल ठरते आहे.

**पाणीबचतीसाठी प्रयत्न**

शाश्वत शेतीसाठी पाणी आणि कीटकनाशकांचा वापर हे दोन कळीचे मुद्दे आहेत. त्या पार्श्वभूमीवर, जपानने कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून शाश्वत शेतीच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. येणाऱ्या काळात, म्हणजे, २०३० सालापर्यंत जगाच्या अनेक भागांमध्ये पाण्याची भीषण टंचाई जाणवू लागेल असे संभाव्य चित्र आहे. ठिबक सिंचनसारख्या प्रणालींना तंत्रज्ञानाची अचूक जोड दिली जात असून त्याद्वारे पिकांना नेमके किती पाणी लागणार आहे याचा अचूक अंदाज घेऊन तेवढेच पाणी कसे मिळेल या दृष्टीने पाण्याचे नियोजन करता येते. तसेच

आपल्या ठिकाणी बसून संपूर्ण शेतीलाही पाणी देण्याची व्यवस्था आता नव्या तंत्रज्ञानातून शक्य झालेली आहे. मातीचे नमुने घेऊन आणि 'सेन्सर्स'च्या मदतीने योग्य ते विश्लेषण करून पाण्याचा वापर खूप नियंत्रित करता येऊ शकतो असे जपानी संशोधकांनी सप्रमाण सिद्ध केलेले आहे.

जपानमध्ये या सगळ्याचे प्रयोग केले जात असून आता व्हिएतनाम, चीन आणि अन्य आशियाई देशांमध्येदेखील 'डिजिटल फार्मिंग' पोहोचवण्याच्या दृष्टीने पावले उचलण्यास जपानने सुरुवात केलेली आहे. या आणि अशा अनेकानेक सुविधांमुळे कृषी क्षेत्रात आमूलाग्र असे बदल होत आहेत. 'डिजिटल फार्मिंग'च्या माध्यमातून पुढील पिढीच्या भविष्यासाठी शाश्वत शेतीचे उद्दिष्ट नक्की साध्य होऊ शकेल, अशी आशा त्यांपायीच या क्षेत्रातील जाणकार व्यक्त करत आहेत.

## ????

# डॉ. राजा दीक्षित यांचे भाषण

**लो. बाळ गंगाधर टिळक :**

आज जशी लोकमान्यांची पुण्यतिथी आहे, तशी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आज आहे. या दोन्हीही व्यक्तींना अभिवादन करून मी सुरुवात करतोय आणि या दोघांच्याबद्दल एकत्रित अशी गोष्ट सांगून मी ही सुरुवात करणार आहे. ती गोष्ट कोणती? आपल्याला कल्पना असेल की टिळकांना 'तेल्यातांबोळ्यांचे पुढारी' म्हटलं गेलं. जे तळाचे वर्ग समजले गेले अशा वर्गातून अण्णाभाऊ पुढे आले आणि त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत फार मोठे कार्य केले. अण्णाभाऊ हे लोकप्रिय शाहीर होते. आपण त्यांना 'लोकशाहीर' म्हणतो. त्यांच्या किमान तीन-चार तरी कविता अशा आहेत की ज्यांच्यामधे त्यांनी लोकमान्यांना वंदन केलेलं आहे. मला त्यांची एक कविता आठवते. ती कविता म्हणजे एक 'गण' आहे. त्या गणामध्ये वेगवेगळ्या दैवतांना वंदन करत ते पुढे जात होते. आधी त्यांनी परमेश्वराला वंदन केलेलं आहे, मग मातृभूमीला वंदन केलेलं आहे, मग शिवरायांना वंदन केलेलं आहे आणि त्याच्यानंतर लोकमान्यांना वंदन केलेलं आहे. लोकमान्यांचं जेव्हा निधन झालं त्या वेळेला अण्णाभाऊ जन्माला आले. अण्णाभाऊंना लोकमान्यांविषयी खूप आदर होता आणि तो आदर त्यांनी काव्यरूपाने व्यक्त केलेला आहे. हा एक विलक्षण योग मला सुरुवातीला नमूद करावासा वाटतो. आता काव्याचा उल्लेख केलाच आहे तर मी जरा साहित्यातच शिरतो, काव्यातच शिरतो. किंबहुना तुमच्या माहितीसाठी एक सांगतो. स्वप्निल पोरे म्हणून पुण्यातले एक पत्रकार आहेत. त्यांनी लोकमान्यांविषयीच्या कवितांचा एक संग्रह संपादन करून प्रसिद्ध केलेला आहे. अनेकांनी लोकमान्यांवर काव्यं रचली. किंबहुना 'लोकमान्य' हा महाकाव्याचा विषय वाटावा असंच त्यांचं सगळं चरित्र आणि चारित्र्य होतं. मी एक इतिहाससंशोधक असल्यामुळे जुन्या साधनांमध्ये, कागदपत्रांमध्ये शिरत असतो, म्हणून एक उदाहरण

देतो तुम्हाला. १९२० साली लोकमान्यांचं जेव्हा निधन झालं, तेव्हा त्यांच्या निधनाचा महाराष्ट्रातल्या लोकांच्या मनावर इतका मोठा परिणाम झाला की लगेचच काही कवींनी त्यांच्यावर काव्यं रचली. दीर्घकाव्यंसुद्धा रचली. त्याचं एक विशेष उदाहरण म्हणजे १ ऑगस्ट १९२० रोजी लोकमान्यांचा मृत्यू झाल्यानंतर अवघ्या दहा दिवसांनी लोकमान्यांवर लक्ष्मण गणेशशास्त्री लेले यांनी 'टिळकांजली' आणि 'विरहगिती' अशी दोन दीर्घ काव्यं रचली. कल्पना करा की ते किती 'टिळकमय' झाले असतील! या दोन दीर्घकाव्यांमध्ये मिळून चार चरणांची ७९ कडवी म्हणजे ३१६ चरण होते. त्या दोन दीर्घ काव्यांमध्ये त्या कवीचे मनोगत आहे. ती छोटा पुस्तिका माझ्या वाचनात आली. कवीच्या मनोगताखाली तारीख आहे '१० ऑगस्ट १९२०'. याचा अर्थ, लोकमान्यांच्या मृत्यूनंतर दहा दिवसांनी त्यांनी प्रस्तावना लिहिली होती. गावाचं नाव लिहिलेलं आहे सोलापूर. म्हणजे सोलापूरच्या एका कवीला ही एवढी मोठी आदरांजली लगेच दहा दिवसांत काव्यरूपाने अर्पण करावीशी वाटली. महापुरुषाचं लक्षण हे असतं की त्याच्याविषयी लोकांना इतका आदर वाटतो आणि लगेच एवढ्या प्रतिक्रिया येतात. काव्यरूपी प्रतिक्रिया येतात. ज्यांना आपण 'स्वातंत्र्यशाहीर' म्हणतो ते कवी 'गोविंद' म्हणजे कवी गोविंद दरेकर. त्यांनी लोकमान्यांवर कविता रचली आणि त्या कवितेचं शीर्षक होतं 'कै. लोकमान्यांच्या दहाव्या दिवसानिमित्त.' म्हणजे स्वातंत्र्यशाहीर गोविंदांची ही कवितासुद्धा अवघ्या दहा दिवसातच रचलेली कविता आहे. लोकमान्यांच्या जाण्याने काय झाले हे सांगताना या कवितेमध्ये कवी गोविंद असे म्हणतात की, 'आर्यभूमीचा भूगोलच डळमळला'! खरं तर गोविंदांच्या टिळकांवरच्या तीन कविता आहेत आणि त्या तीनही प्रसिद्ध आहेत. त्यातली एक आता मी सांगितली ती कविता. त्याआधी लोकमान्यांना मंडालेचा कारावास झाला तेव्हा १९०८ साली गोविंदांनी केलेली कविता आणि १९१७ मध्ये जेव्हा लोकमान्यांची षष्ट्यब्दीपूर्ती झाली त्या वेळेला रचलेली 'टिळकांची भूपाळी' ही दुसरी कविता. तुम्हाला जर कधी मूळ भूपाळी पाहायला मिळाली तर अवश्य बघा, अतिशय सुंदर अशी भूपाळी आहे ती. माझ्या मते तर तिन्ही कवितांमध्ये सर्वोत्कृष्ट कविता जर कुठली असेल तर ती लोकमान्यांची भूपाळीच आहे, की ज्या भूपाळीत कवी गोविंद लोकमान्य टिळकांचं महत्त्व सांगतात. ते असं म्हणतात की, 'या एका खांबावर उभी महाराष्ट्र द्वारका.' तसंच 'केसरी'विषयीचा त्या कवितेतला उल्लेख सांगण्याजोगा आहे. त्यांनी असं म्हटलं की,

**'देशभक्तीचे कल्पद्रुमवन विस्तारी केसरी। जनहृदी विस्तारी केसरी ।।**
**आशा वाटे खुलेल फुलेल वसंत तो लवकरी ।।'**

एकंदरीतच लोकमान्यांवर किती विपुल साहित्य लिहिलं गेलेलं आहे! त्यांची चरित्रंसुद्धा अनेक आहेत. सगळ्यांचा उल्लेख येथे शक्य नाही. पण नमुन्यादाखल एखादं उदाहरण द्यायचं झालं तर आपल्या मराठी विचारविश्वातले ख्यातनाम विचारवंत आणि लेखक डॉ. सदानंद मोरे यांचे लोकमान्यांवर तीन ग्रंथ आहेत. त्यांचा 'लोकमान्य ते महात्मा' हा ग्रंथ २००७ मधला आहे. त्याच्यानंतर 'लोकमान्य बाळ गंगाधर टिळक' असा २०१० मधला ग्रंथ आहे. पुण्याच्या 'गंधर्ववेद प्रकाशन'ने ६५ श्रेष्ठ पुरुषांवर ग्रंथमाला प्रकाशित केली त्या ग्रंथमालेतला हा ग्रंथ आहे. डॉ. मोरे यांचा तिसरा ग्रंथ 'कर्मयोगी लोकमान्य' हा २०१४ मधला. म्हणजे एकाच अभ्यासक विचारवंताला एक पुस्तक लिहून भागलं नाही. त्यांना तीन ग्रंथ लिहावे लागले आणि सगळे जाडजूड ग्रंथ आहेत. छोटे पुस्तिकावजा ग्रंथ नाहीत. मोठे ग्रंथ आहेत ते. जसे संशोधकांनी, अभ्यासकांनी ग्रंथ लिहिले, तसे त्यांच्याविषयी साहित्यिकांनासुद्धा असे वाटले की, 'अरे आपण काहीतरी लिहिले पाहिजे'. त्यातही मग कादंबरी आहे, नाटक आहे, काव्य आहे. इतर कलांमध्येही असं दिसेल की त्यांचे पुतळे आहेत, मूर्ती आहेत, चित्रं आहेत. त्यांच्यावर नाटक आहे, सिनेमा आहे. अशा प्रकारे समाजातील साहित्यिक, कलावंतांची जी संवेदनशील मनं असतात, त्यांनी लोकमान्यांना आदरांजली वाहिलेली आहे.

मराठी साहित्यातील एक मोठे नाव म्हणजे गंगाधर गाडगीळ. मराठी कथेच्या क्षेत्रातील फार मोठं नाव! त्या गंगाधर गाडगीळांनी 'दुर्दम्य' नावाची कादंबरी लोकमान्यांवर लिहिली आहे. १९७० मध्ये तिचा पहिला भाग प्रसिद्ध झाला. १९७१ मध्ये दुसरा भाग प्रसिद्ध झाला. विश्राम बेडेकर हे फार मोठे साहित्यिक. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते ते. त्यांनी 'टिळक आणि आगरकर' हे नाटक लिहिलं. ते १९९७-९८ च्या सुमारास प्रकाशित झालं. रंगभूमीवर त्याचे प्रयोगही झाले. ही दोन उदाहरणं नमुन्यादाखल मी तुम्हाला सांगितली. कलावंत कसे आकर्षित होतात याचं एक उदाहरण देतो. महाराष्ट्रातील अत्यंत ख्यातनात असे मूर्तिकार, शिल्पकार करमरकर याचं. त्यांनी केलेले शिवाजी महाराजांचे पुतळे प्रसिद्ध आहेत. तर त्या शिल्पकार करमरकरांनी १९२२ साली म्हणजे लोकमान्यांच्या मृत्यूनंतर दोन वर्षांनी लोकमान्यांचा फार सुंदर अर्धपुतळा तयार केला. मी माझं व्यक्तिशः भाग्य मानतो की मी ज्या पुणे विद्यापीठात शिकवत होतो, त्या विद्यापीठाच्या ग्रंथालयामध्ये

१९२२ मधला तो पुतळा आहे. पुणे विद्यापीठ १९४९ मधलं आहे. पण तो पुतळा आज पुणे विद्यापीठाच्या, म्हणजे आजच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ग्रंथालयामध्ये आहे. १९२२ मधला तो फार सुंदर अर्धपुतळा आहे. असे तुम्हाला गावोगावी, जागोजागी कितीतरी पुतळे दिसतील; पण हा एक विशेष उल्लेख करण्याजोगा पुतळा आहे. तसंच पुण्याला जर तुम्ही भेट दिली तर पुण्यामध्ये टिळक स्मारक मंदिर आहे. तुमच्याकडे ख्यातनाम चित्रकार सुहास बहुलकर यांनी तयार केलेली लोकमान्य टिळक आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जी म्यूरल्स आहेत, ती किती सुंदर आहेत! तर ती म्यूरल्स जशी आहेत, तशी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार गोपाळ देऊसकर यांनी पुण्याच्या टिळक स्मारक मंदिरामध्ये एक संपूर्ण भिंत आपल्या चित्रकामाने सजवली आहे. लोकमान्यांच्या चरित्रातले अनेक प्रसंग घेऊन ती सबंध भिंत लोकमान्यांच्या जीवनावरच चित्रित केलेली आहे. या देऊसकरांनी काढलेलं टिळकांचं तैलचित्र आपल्या संसदभवनातसुद्धा आहे. ज्या बहुलकरांचा उल्लेख मी केला, त्या बहुलकरांनी काढलेलं लोकमान्यांचं तैलचित्र हे आपल्या राष्ट्रपतीभवनात आहे. इतक्या महत्त्वाच्या जागी ते आपल्याला पाहायला मिळतं. सिनेमांमध्ये आपल्याला खूप रस असतो म्हणून तुम्हाला सांगतो की, लोकमान्यांवर चित्रपट, नाटकं पुष्कळ आली. प्रभात फिल्म कंपनीने लोकमान्यांवर चित्रपट काढला होता. त्यात गजानन जहागीरदार यांनी लोकमान्यांची भूमिका केली आणि विश्राम बेडेकरांनी त्याचं दिग्दर्शन केलं. पुन्हा अलीकडे २०१५ साली 'लोकमान्य एक युगपुरुष' हा ज्याला आपण 'बायोपिक' म्हणतो तो चरित्रात्मक सिनेमा आला. प्रसिद्ध नट सुबोध भावे यांनी त्याच्यामध्ये लोकमान्यांची भूमिका केलेली आहे. तर ही यादी पुष्कळ वाढवता येईल. मी नमुन्यादाखल तुम्हाला ते सांगितलं. अशा कितीतरी रितीने साहित्यिक-कलावंतांनी लोकमान्यांविषयीचा आदर व्यक्त केलेला आहे. तुम्ही महाराष्ट्रातल्या कोणत्याही गावात जा, तुम्हाला लोकमान्यांचा एकतरी पुतळा आढळेल. एखाद्या शाळेला किंवा महाविद्यालयाला त्यांचं नाव दिलेलं आढळेल. म्हणजे अशा रितीने लोकांच्या मनामध्ये ते मोठेपण असतं. माणूस मोठा केव्हा होतो? महापुरुष केव्हा होतो? त्याचं एक गमक आहे की अशा अनेक रूपांनी लोक त्या व्यक्तीविषयी आदर व्यक्त करतात. म्हणून तर असंख्य ठिकाणी टिळक विद्यालयं आहेत. असंख्य ठिकाणी टिळक महाविद्यालयंही तुम्हाला दिसतील.

लोकमान्यांनी जी आंदोलनं केली ती मोठीच होती, ती महत्त्वाचीच होती. स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी जे नेतृत्व केलं ते असामान्यच होतं, यात काही वाद नाही.

ते तुम्ही इतिहासाच्या पुस्तकात नेहमी वाचलंच असेल. म्हणून मी आणखी थोडं वेगळं काहीतरी तुम्हाला सांगणार आहे. ब्रिटिशांनी आपल्यावर राज्य केलं. ब्रिटिशांचं आक्रमण झालं हे आपण जेव्हा शिकतो तेव्हा आपण काय करतो? आपण प्लासीच्या लढाईपासून सुरुवात करतो आणि १८१८ मध्ये मराठ्यांचा पाडाव झाला, पुढे १८५७ चा उठाव झाला, हे सगळं आपण शिकत असतो आणि मग परकीय ब्रिटिशांविरुद्ध आपण राजकीय लढा कसा दिला हे स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात आपण अभ्यासतो. ते तर महत्त्वाचं आहेच; पण लक्षात घ्या, ब्रिटिशांचं भारतावरचं वर्चस्व हे केवळ राजकीय नव्हतं, तर ते वर्चस्व आर्थिक आणि सांस्कृतिकसुद्धा होतं. म्हणजे ते कसं? तर भारताची लूट करून त्या पैशावर इंग्लंड समृद्ध झाला. आपल्याला हे माहिती आहे की इंग्लंडची कारखानदारी ही फार प्रगत होती. 'Workshop of the world' - 'जगाचा कारखाना' – असं इंग्लंडचं वर्णन केलं जायचं. इंग्लंडचा कापड उद्योग हा जगभर प्रसिद्ध होता; पण त्याच्यासाठी लागणारा कापूस हा काही इंग्लंडमध्ये पिकत नव्हता. इंग्लडची भूमी मुळात सुपीक नाही. त्यामुळे या कारखान्यांसाठी लागणारा सगळा कच्चा माल, तो सगळा व्याप वाढवण्यासाठी लागणारं भांडवल, पैसा आणि तो सगळा माल खपवण्यासाठी असणाऱ्या बाजारपेठा हे सर्वच इंग्लंडला बाहेर शोधावं लागत होतं. यातून वसाहतवाद फोफावला. ''ब्रिटिश साम्राज्यावरचा सूर्य कधीच मावळत नाही'' अशी दर्पोक्ती ब्रिटिश लोक करत असत. तर त्यामुळे, ब्रिटिशांचं जे आक्रमण आहे ते मूलतः आर्थिक होतं. राजकीय वर्चस्व जसं त्यांनी आपल्यावर निर्माण केलं, तसं मुख्यतः आर्थिक वर्चस्व त्यांनी लादलं आणि हे जे आर्थिक वर्चस्व आहे त्याच्याद्वारे त्यांची संपन्नताही वाढीस लागली. कुणीतरी असे म्हटलेले आहे की, ज्याने वाफेचं यंत्र तयार केलं तो जेम्स वॉट जर ५० किंवा १०० वर्षे आधी जन्माला आला असता तर इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीच झाली नसती! का? तर त्याचा वाफेच्या यंत्राचा जो शोध आहे तो भारतातल्या लुटीमुळे फारच अर्थपूर्ण ठरला, त्यातून मिळणारी बाष्पशक्ती त्यामुळे उपयोगी पडली, हे आपल्याला विसरून चालत नाही. म्हणून ही जी आर्थिक लूट त्यांनी केली, हे जे आर्थिक आक्रमण आहे, त्याबद्दल लोकमान्यांनी काय केलं, हे बऱ्याच वेळा आपल्याला माहिती नसतं.

दुसरं आणखी एक आहे की हे जसं आर्थिक व राजकीय आक्रमण ब्रिटिशांनी केलं, तसंच त्यांनी आपल्यावर सांस्कृतिक आक्रमणही केलं. मेकॉलेचं शिक्षणविषयक धोरण १८३५ मध्ये आलं. मेकॉलेनी इंग्रजी शिक्षण आणलं. हा मेकॉले काय म्हणत

असे ते मी आज तुम्हाला सांगतो. त्याच वर्षी केलेलं त्याचं विधान आहे. मूळ इंग्रजी विधान काही तुम्हाला सांगत नाही, त्याचा आशय सांगतो. मेकॉलेनी अस म्हटलं की, 'या देशामध्ये आम्ही ब्रिटिश राज्यकर्ते आणि भारतीय जनता यांच्यामध्ये मध्यस्थांचा असा एक वर्ग आम्हाला तयार करायचा आहे, की जो वर्णाने आणि रक्ताने गहूवर्णीय असेल, भारतीय असेल, परंतु त्याची मतं, त्याची मूल्यं, त्याच्या आवडीनिवडी, त्याची बुद्धिमत्ता हे सगळं इंग्रजी वळणाचं झालेलं असेल'. म्हणजे थोडक्यात भारतीयांचं आंग्लीकरण करणे, त्यांची मनं इंग्रजी वळणाची करून टाकणे हे ध्येय होतं. हे ध्येय का? तर कुठल्याही सत्ताधाऱ्यांना, ते स्थानिक असोत की परकीय असोत, ज्यावेळी एखाद्या देशावर दीर्घकाळासाठी राज्य करायचं असतं, तेव्हा लोकांच्या मनावर ताबा मिळवावा लागतो. हे तर ठीक आहे की एका लढाईमध्ये एका मैदानावर शत्रूच्या एकवटलेल्या सैन्याचा एका दिवसात पराभव करता येतो. त्याने सत्ताही मिळते. पण ही सत्ता जर दीर्घकाळ टिकवायची असेल, तर दुसरी एक लढाई खेळावी लागते. ती शस्त्रांची लढाई नसते. किंबहुना त्या लढाईतली शस्त्रं वेगळी असतात. ती विचारांची शस्त्रं असतात. आणि म्हणून लोकांची मनं जिंकण्याची लढाई केल्याशिवाय राज्यकर्त्यांना आपलं वर्चस्व खऱ्या अर्थाने लोकांवर प्रस्थापित करता येत नाही. म्हणून मग ब्रिटिशांनी काय केलं, की भारतीयांची मनं जर जिंकून घ्यायची असतील तर त्यांच्या मनांना इंग्रजी वळण लावायचं ठरवलं. त्यांना असं पटवून द्यायचा प्रयत्न केला की, 'अरे हे जे साहेब लोक आलेले आहेत तेच आपले खरे उद्धारकर्ते आहेत'. तर मग आपल्याला असं केलं पाहिजे, की इथलं जे शिक्षण आहे त्याच्यावर ताबा मिळवला पाहिजे. इथलं जे साहित्य आहे, ते आपण प्रभावित केलं पाहिजे. तुम्हाला आश्चर्य वाटेल, या गोष्टी आपल्याला माहिती नसतात की ज्या वेळेला खुद्द इंग्लंडमध्ये इंग्रजी साहित्य शिक्षणाच्या क्षेत्रात जास्त प्रमाणात शिकवलं जात नव्हतं, त्याच्याहीपेक्षा जास्त प्रमाणात इंग्रजी साहित्य भारतात शिकवलं गेलं. त्यांना असं वाटलं की आपलं साहित्य इंग्लंडमध्ये एक वेळ अभ्यासक्रमात लावायचं नाही; पण भारतात, इथल्या अभ्यासक्रमात लावायचं. ते अशासाठी की, भारतीयांची मनं इंग्रजी वळणाची करून जिंकून घ्यायची. बर्नार्ड कोन्ह नावाच्या एका फार मोठ्या अभ्यासकाने एक निबंध लिहिला आहे. त्या निबंधाचं केवळ शीर्षक सांगतो, महत्त्वाचं आहे बघा. त्या निबंधाचं शीर्षक आहे. 'Command of Language and Language of Command.' म्हणजे काय? 'भाषेवरचं प्रभुत्व आणि प्रभुत्वाची भाषा.' ही काय

भानगड आहे? तर तुमच्या असं लक्षात येईल की ज्या वेळेला परकीय लोक आपल्या भारतात आले, त्या वेळेला त्यांनी आपल्या भारतीय भाषांचा अभ्यास सुरू केला. भारतीय साहित्य, प्राचीन साहित्य जे आहे, त्याचा अभ्यास केला. एवढेच नव्हे तर अगदी संस्कृत असो की आपली मराठी असो की बंगाली असो की हिंदी असो, या सगळ्या भाषांचा त्यांनी नुसता अभ्यास नाही केला, तर या भाषांची त्यांनी व्याकरणं तयार केली. या भाषांमध्ये शब्दकोश तयार केले. अशा कितीतरी गोष्टी! या भाषांमध्ये त्यांनी छपाईची कला मोठ्या प्रमाणात रुजवली आणि या भाषांमध्ये पुस्तकं छापायला सुरुवात केली. म्हणजे एका बाजूने पाहिलं तर त्यांनी आपल्यावर उपकार केले. त्यांनी आपल्या भारतीयांच्या भाषांवर प्रभुत्व मिळवले. पण भाषेवरचे प्रभुत्व हा एक निरुपद्रवी उद्योग होता का त्यांचा? तर नाही! भाषेवरचं प्रभुत्व हे त्यांना त्यांच्या प्रभुत्वाची भाषा निर्माण करण्यासाठी हवं होतं.

म्हणजे कसं आहे बघा, ते आपल्या भाषा शिकले, आपले साहित्य शिकले, आपला इतिहास शिकले, आपला इतिहास त्यांनी लिहिला. आपल्याकडे शास्त्रशुद्ध इतिहासलेखन मोठ्या प्रमाणात होत नव्हतं. बखरी वगैरे होत्या. पुराणं होती. आपला इतिहास हा वेगळ्या स्वरूपातील होता. पण ज्याला आज आपण शास्त्रीय इतिहास म्हणतो त्याची सुरुवात कोणी केली, तर त्यांनीच केली. म्हणजे आपल्या मराठ्यांचा इतिहास ग्रँट डफ यांनी आधी लिहिला हे माहिती आहे ना तुम्हाला? ज्या ग्रँट डफने हा इतिहास लिहिला, त्याने खूप अभ्यास केला. त्याच्याबद्दल आपण त्याला श्रेय द्यायला हवे. पण जंगलात पेटलेल्या एखाद्या वणव्याप्रमाणे मराठ्यांचा उदय झाला, असं त्याने म्हटलं होतं. म्हणजे जंगलात जसा वणवा पेटतो तसा हा उदय अपघाती आहे! थोडक्यात आपलं जणू काही काहीच श्रेय नव्हतं! मग काय झालं, की हा इतिहास आमच्या पहिल्या पिढीने शिकला. त्यामुळे त्या नवशिक्षितांच्या पिढ्या प्रभावित झाल्या. ज्यांनी लिहिलेला इतिहास त्या शिकल्या, त्यांना 'प्रशासक इतिहासकार' (Administrator Historians) म्हणतात. अनेक इतिहास, मग ते भारताचे असोत, महाराष्ट्राचे असोत ते आधी त्या गोऱ्या लोकांनी, परकीय लोकांनी लिहिलेले आहेत. हे इतिहास आपल्या शाळांमध्ये शिकवले गेले. ग्रँट डफचा इतिहास आपल्याकडच्या शाळांमध्ये शिकवला जायचा. त्याचे काही वेळेला मराठी भाषांतर झाले. पण तो इतिहास आपल्या पहिल्या पिढ्या शिकल्या आहेत. जेम्स मिलचा (James Mill) भारताचा इतिहास तेव्हा शिकवायचे. आता या मिलने भारताच्या इतिहासाची विभागणी कशी केली माहितीय? आपल्याला बंगालची

फाळणी माहिती आहे. का झाली बंगालची फाळणी? तर 'फोडा आणि राज्य करा - Divid and rule' या नीतीमुळे. आपल्याला माहितीय की, कर्झनने बंगालची फाळणी केली. आता हे केव्हा झालं, तर १९०५ मध्ये. मी जे तुम्हाला सांगतोय ते त्याच्या जवळजवळ एक शतक आधीचं आहे. तेव्हा मिलने 'फोडा आणि राज्य करा' ही नीती इतिहासलेखनाद्वारे वापरली! त्यांनी 'History of India' लिहून प्रचंड मोठं काम केलं. त्याला श्रेय आहे त्याचं. पण भारतीय इतिहासाची विभागणी त्यांनी कशी केली माहितीय? हिंदू कालखंड आणि मुस्लिम कालखंड अशा पद्धतीने केली. इथेच त्यांनी हिंदू-मुस्लिम असं वेगळं दाखवलं. आधुनिक कालखंडाला मात्र ख्रिश्चन किंवा अन्य असं न म्हणता त्यांनी आधुनिक कालखंड असं म्हटलं. तिथेच त्यांनी विभाजनाला खतपाणी घातलं. हिंदू-मुस्लिम ऐक्य हे आपल्यासाठी धोकादायक आहे, हे १८५७ च्या नंतर नाही, तर पहिल्यापासूनच ब्रिटिशांच्या लक्षात आलं होतं. 'फोडा आणि राज्य करा' ही नीती इतिहासाच्या रणांगणावर आधी वापरली गेली. संस्कृतीचंसुद्धा एक रणांगण असतं. त्या रणांगणावर ही लढाई सुरू झालेली होती. हे जे इतिहास सुरुवातीला लिहिले गेले, त्यांचा प्रभाव आपल्याकडील आरंभीच्या नवशिक्षितांवर पडला. पण पुढे नंतरच्या ज्या पिढ्या शिकून बाहेर पडल्या, त्यांच्या लक्षात आलं की, 'अरेच्या, याच्यात काहीतरी गडबड आहे! म्हणून आपण आपल्या नजरेने आपला इतिहास लिहिला पाहिजे, आपल्या इतिहासाची साधने आपणच शोधली पाहिजेत.' मग देशी पद्धतीने तो सबंध इतिहास त्यांनी मांडला. याचे उत्तम उदाहरण म्हणजे विष्णूशास्त्री चिपळूणकर. त्यांचा उल्लेख का करतोय? ते टिळकांचे एका अर्थी गुरू. चिपळूणकरांनी 'इतिहास' नावाचा एक मोठा निबंध लिहून ब्रिटिशांनी लिहिलेला आपला इतिहास कसा चुकीचा आहे, हे दाखवून दिले. म्हणून आपल्या नजरेने इतिहास लिहिला पाहिजे अशी दृष्टी आणि हे आपल्या नजरेने सगळ्या गोष्टी करणं, ब्रिटिशांच्या सांस्कृतिक आक्रमणाला तोंड देण्यासाठी आवश्यक आहे, याची जाणीव निर्माण होऊ लागली. एक 'भूमिका युद्ध' (War of position), ज्याला सांस्कृतिक युद्ध म्हणता येईल, ते भारतात उभं राहिलं.

हे सगळं मी विस्ताराने सांगितलं कारण लोकमान्यांच्या सबंध कार्यामध्ये त्यांचीही सांस्कृतिक रणनीती फार महत्त्वाची आहे. म्हणून तुम्ही बघा की टिळक आणि आगरकर यांचे पुढे मतभेद झाले असतील; पण त्यांनी सुरुवातीला काय काय केलं ते आपल्याला माहीत असतं, आपण ते शाळेत शिकलेलो असतो. ते हे की, त्यांनी

अनेक शैक्षणिक व सांस्कृतिक गोष्टींवर भर दिला. न्यू इंग्लिश स्कूल आहे. फर्ग्युसन कॉलेज आहे. 'केसरी', 'मराठा' आहेत. हे सगळं काय आहे? ही सगळी सांस्कृतिक आयुधं आहेत! 'शिक्षण' या विषयावर लोकमान्यांचे एकूण चाळीस-पन्नास अग्रलेख आहेत 'केसरी'मध्ये. बघा, शिक्षणाला किती महत्त्व दिले त्यांनी! पुढे त्यांच्या 'चतु:सूत्री'त राष्ट्रीय शिक्षण आलंय. ज्यांच्या साहित्यातून पुढे राष्ट्रवाद प्रगटला ते कवी केशवसुत किंवा कादंबरीकार हरि नारायण आपटे हे दोघे न्यू इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी होते आणि त्यांचे शिक्षक कोण होते माहितीय? त्यांचे शिक्षक होते टिळक आणि आगरकर! 'केसरी' छापण्याचे जे निवेदन आहे त्यात टिळक म्हणतात, 'वर्तमानपत्रे हे रयतेचे कोतवाल आणि वकील आहेत.' 'केसरी' हे मराठी आणि 'मराठा' हे इंग्रजी का? तर लोकांमध्ये जागृती व्हावी, लोकांना आपल्यावर अन्याय का होतो हे कळावं म्हणून मराठी वृत्तपत्र काढले; परंतु शासनापुढे या गोष्टी मांडाव्या आणि आपलं सगळं म्हणणं महाराष्ट्राबाहेरील लोकांपर्यंत जावं आणि ते इंग्रजांपर्यंतही पोहोचावं म्हणून इंग्रजी वृत्तपत्र काढलं. हे असं नाही की सहज सुचलं म्हणून एक मराठी आणि एक इंग्रजी वृत्तपत्र काढलं! त्याच्यामागे निश्चित काहीतरी हेतू होता. पुढे १९०२ सालच्या अग्रलेखात टिळक म्हणतात की, 'केसरी केवळ शिकल्यासवरलेल्या किंवा उच्चभ्रू लोकांसाठी नाही, तर सर्वसामान्य लोकांसाठी व त्यांचे प्रबोधन होण्यासाठी आहे'. शब्द थोडे वेगळे असतील, पण आशय असा आहे. आणि तळमळ किती होती बघा! 'केसरी'चा प्रचार व्हावा म्हणून किर्लोस्कर कंपनीचे नाटक जेथे चालू होते तेथे जाऊन 'केसरी'च्या प्रचाराची पत्रकं स्वतः लोकमान्य टिळकांनी त्या नाटकाच्या प्रयोगाच्या जागी वाटलेली होती. हे टिळक आपल्याला माहिती नसणार! नाटकातल्या लोकांशी त्यांचे संबंध इतके होते की, नारायण श्रीपाद राजहंस यांना 'बालगंधर्व' ही पदवी लोकमान्य टिळकांनीच दिली! लोकमान्य टिळकांवर असंख्य नाटकं लिहिली गेली आहेत. स्वातंत्र्यचळवळीच्या काळात अशा नाटकांवर बंदी घातली गेली. इतकं सगळं त्या नाट्यक्षेत्राशी संबंधित आहे.

पण नुसतं एवढंच नाही, तर आता साहित्याचं क्षेत्र घ्या. साहित्याच्या क्षेत्रात किती जागृती शक्य असते! महाराष्ट्र साहित्य परिषद ही आपली प्रसिद्ध साहित्यसंस्था आहे. न्या. महादेव गोविंद रानडे यांनी ग्रंथकार संमेलने तथा आजची साहित्य संमेलने सुरू केली. त्यातूनच पुढे १९०६ साली महाराष्ट्र साहित्य परिषद स्थापन झाली. तेव्हा पुण्यात नागनाथ पाराजवळ मळेकर वाड्यात जे ग्रंथकार संमेलन म्हणजे आजच्या भाषेत साहित्य संमेलन भरलं होतं, त्याला स्वतः लोकमान्य

टिळक हजर होते. त्या साहित्य संमेलनामध्ये साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांनी साहित्य परिषदेच्या स्थापनेची घोषणा केली आणि त्याला अनुमोदन देऊन आशीर्वादपर भाषण लोकमान्य टिळकांनी केलं. म्हणून आज जर तुम्ही पुण्याच्या साहित्य परिषदेत आलात, तर तुम्हाला त्यांच्या माधवराव पटवर्धन सभागृहात लोकमान्यांचा फोटो आढळेल. कारण साहित्य परिषदेच्या स्थापनेशी लोकमान्य टिळकांचा संबंध आहे. टिळकांच्या अनुयायांमध्ये न. चिं. केळकर किंवा कृ. प्र. खाडिलकर यांच्यासारखे साहित्यिक होते. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकरांच्या 'कीचकवध' नाटकावर ब्रिटिशांनी बंदी का घातली? तर त्याचं कथानक महाभारतातलं, पण त्या कथानकातून रूपक असं मांडलेलं होतं की 'कीचक' आणि 'कर्झन' यांची लोक तुलना करायचे. त्यामुळे प्रचंड असंतोष त्या नाटकातून निर्माण झाला आणि त्या नाटकावर बंदी घातली गेली. तुम्हाला एक माहिती आहे का, की लोकमान्यांना ज्या अग्रलेखांवरनं तुरुंगवास भोगायला लागला, ते 'केसरी'तले काही अग्रलेख हे त्यांनी स्वतः लिहिलेलेच नव्हते, तर ते खाडिलकरांनी लिहिलेले होते. पण टिळकांनी ती जबाबदारी स्वीकारली. तर हे असं आहे! साहित्य क्षेत्राशी टिळकांचा खूप संबंध होता. वेगवेगळ्या संमेलनांना ते हजर राहायचे. साहित्यिकांची त्यांच्याकडे उठ-बस असायची. हे जसं आहे, तसंच सिनेमाचं सांगतो तुम्हाला.

सिनेमा हा एक आपल्या आवडीचा विषय आहे. भारतीय चित्रपट सृष्टीची सुरुवात १९१३ साली झाली. ही सुरुवात करणारे दादासाहेब फाळके यांना आपण 'चित्रपटमहर्षी' म्हणतो. त्यांनी चित्रपट काढण्यापूर्वी लोकमान्यांच्या स्वदेशीच्या चळवळीतून स्फूर्ती घेतली आणि म्हणून त्यांनी जे चित्रपट काढले, त्यांचे विषय वरवर पाहायला पौराणिक घेतले; पण ते देशभक्तीच्या भावनेतून प्रेरित झाले होते. एवढेच नव्हे तर लोकमान्यांचे त्यांना आशीर्वाद होते. चित्रपट ही सोपी गोष्ट नव्हती. फार खर्चिक होती, आजही आहे! त्यांच्याकडे पुरेसं भांडवल नव्हतं; पण त्यांना ते भांडवल उभारता यावं म्हणून लोकमान्यांनी 'केसरी'मध्ये लेख लिहिले आणि आवाहन केलं. त्यामुळे त्यांच्याकडे पैशाचा ओघ सुरू झाला आणि त्यातनं त्यांना सिनेमा काढता आला. बाबुराव पेंटर यांना तर लोकमान्यांनी 'चित्रपटकेसरी' अशी पदवी दिलेली होती. १९२० साली जेव्हा काँग्रेसचं अधिवेशन झालं, त्या वेळेला त्यांनी लोकमान्यांवर एक फिल्म तयार केली होती. एकदा चित्रपटाच्या संदर्भात लोकमान्य संबंधित लोकांना म्हणाले की, 'आम्ही हे जे करतो, लिहितो आहोत ना, त्याच्यापेक्षा हे तुमचं माध्यम अधिक प्रभावी आहे. याच्यातून आपले राष्ट्रीय विचार

लोकांपर्यंत पोहोचतील'. म्हणजे किती लक्ष होतं बघा लोकमान्यांचं! राष्ट्रीय जागृतीच्या कामी वेगवेगळ्या माध्यमांचा उपयोग त्यांनी जाणीवपूर्वक करून घेतला.

तुम्हाला सर्कसचं उदाहरण देतो. त्या वेळेच्या दोन प्रसिद्ध सर्कस म्हणजे एक छत्रे यांची सर्कस आणि दुसरी देवलांची सर्कस. छत्र्यांच्या सर्कसबरोबर लोकमान्य हे तिकडे ब्रह्मदेशात गेलेले होते आणि गंमत अशी की, ती सर्कस चीनमध्ये गेली, तर त्या छत्र्यांच्या सर्कसच्या माध्यमातून त्यांनी चीनची वार्तापत्रं 'केसरी'त छापली. आणि हे नुसतं इथे थांबलेलं नाहीय. छत्र्यांशी जे संबंध होते, त्यातून लोकमान्यांनी अशी व्यवस्था केली की त्या सर्कशीच्या माध्यमातून काही क्रांतिकारक परदेशात गेले. आधी चीनमध्ये गेले. क्रांतिकारक पांडुरंग सदाशिव खानखोजे असेच सर्कसच्या माध्यमातून परदेशी गेलेले होते. टिळक जेव्हा १९१८ ला चिरोल खटला लढण्यासाठी इंग्लंडला गेले आणि तेथून जेव्हा परत आले, तेव्हा त्यांच्या सत्कारार्थ पुण्यात जी मिरवणूक काढली गेली, त्या मिरवणुकीसाठीचे हत्ती-घोडे देवल सर्कसने पुरवलेले होते. बघा तुम्ही, कोणाकोणावर किती प्रभाव आहे लोकमान्यांचा!

आता तुम्हाला कीर्तनाचं उदाहरण देतो. 'राष्ट्रीय कीर्तन' हा शब्द आता आपण ऐकतो. तो लोकमान्यांमुळे रूढ झालेला आहे. त्यांनी एका अग्रलेखात असं लिहिलेलं होतं की, 'आमच्या कीर्तनकारांनी आता नुसते धार्मिक आणि पौराणिक विषय न घेता आपले सामाजिक विषय घ्यावेत आणि त्याच्यातून आपली कीर्तनाची मांडणी करावी. समाजशिक्षण हे कीर्तनकाराचे मुख्य कर्तव्य आहे'. एवढे बोलून ते थांबत नाहीत. पुढे जाऊन ते सांगतात की, 'नव्या शिक्षणाने विद्वान झालेल्या ग्रॅज्युएटांनीही कीर्तनाच्या कलेत लक्ष घालावं. म्हणजे इष्ट सुधारणा लवकर घडून येईल'. डॉ. दत्तोपंत ऊर्फ अण्णासाहेब पटवर्धन हे पहिले राष्ट्रीय कीर्तनकार म्हणून ओळखले जातात. त्यांनी टिळकांच्या प्रेरणेतून राष्ट्रीय कीर्तनं केली. बराच काळ ते वाईला होते. राष्ट्रीय कीर्तन या माध्यमातून राष्ट्रीय विचारांचा प्रसार केला गेला. गणेशोत्सव आणि शिवजयंतीचा उत्सव लोकमान्यांनी सुरू केले, हे आपणाला माहीत आहे. गणेशोत्सव आणि शिवजयंतीचा उत्सव हे काय केवळ आज ज्या पद्धतीने काही वेळा होतात, तसा हौसेचा मामला होता का? तर नाही. ते जनजागृतीचे साधन होते. या उत्सवांवरचे लोकमान्यांचे अग्रलेख मुळातून वाचण्याजोगे आहेत. ते अग्रलेखात नमूद करतात की, 'आमच्या समाजामध्ये हे वेगवेगळ्या जातींचे लोक आहेत. हे सगळे लोक एकत्र यावेत, हा या आमच्या उत्सवाचा उद्देश आहे'. त्यांनी म्हटलं की, 'एकष्ट्रीयत्व हा दृश्य पदार्थ नसतो. ती एक प्रकारची कल्पना असून

सतत जागृत ठेवावी लागते'. या दृष्टीनेच त्यांनी उत्सवांची आखणी केली. गणेशोत्सवातील मेळे हे राष्ट्रीय विचारांच्या प्रसाराचे एक माध्यम होते. त्यांच्या शिवजयंती उत्सवाला पाचोऱ्याच्या मुस्लिमांनी देणगी दिली, हे बहुदा आपणाला माहीत नसेल!

आता मुस्लिम हा विषय निघाला याच्यावरून सांगतो की मुस्लिमांमध्ये त्यांची कशी लोकप्रियता होती. मौलाना हसरत मोरानी हे एक मुस्लिम कवी होते. गुलाम अलीचं गाणं आहे ना, 'चुपके चुपके रात दिन आंसू बहाना याद है,' हे त्या मोरानींचंच गाणं आहे बरं का! लोकमान्य टिळक जेव्हा मंडालेहून सुटून आले आणि उत्तर भारतात त्यांनी वेगवेगळे दौरे केले, त्या दौऱ्यांमध्ये संयुक्त प्रांत, पंजाब, सिंध येथे मोरानी हे पाठोपाठ जात असत. लोकमान्य टिळकांवर त्यांनी उर्दूमध्ये काव्यरचना केलेल्या होत्या. आणि उर्दूमधल्या कविता फक्त त्यांनीच केल्या असं नाही. आज टिळक आणि सावरकर यांची म्यूरल्स असलेल्या दोन्ही ठिकाणी भेट देताना मला एकदम आठवलं की, स्वातंत्र्यवीर सावरकरांनी लोकमान्य टिळकांवर उर्दूमध्ये काव्यरचना केलेली आहे! हे आपल्याला माहीत असतं का? लोकमान्य हे कसे श्रेष्ठ होते याचं वर्णन त्या काव्यात सावरकरांनी केलेलं आहे. आपल्याला माहीत नसलेल्या अशा कितीतरी गोष्टी आहेत! असो. माझा मूळ मुद्दा असा की, टिळकांनी संस्कृती हीच एक रणभूमी बनवली होती.

टिळकांनी मंडालेच्या तुरुंगवासात 'गीतारहस्य' का लिहिलं? त्यांचा वेळ जात नव्हता म्हणून लिहिलं का? नक्कीच नाही! फार मोठा उद्देश त्याच्यामागे होता. टिळक हे पहिल्या दर्जाचे विद्वान होते. त्यांनी असं म्हटलं होतं की, 'जर मी स्वातंत्र्यात जन्माला आलो असतो ना, तर मी गणिती आणि खगोलअभ्यासक झालो असतो. अनेक ग्रंथ लिहित बसलो असतो'. मंडालेच्या तुरुंगामध्ये त्यांनी जवळजवळ साडेतीनशे ग्रंथ वाचले. ते वाचनासाठी ग्रंथ मागवून घेत असत. 'गीतारहस्य' तर त्यांनी लिहिलंच; पण आपल्याला लिहायचे आहेत अशा दहा ग्रंथांची यादी त्यांनी केली होती आणि त्या ग्रंथामध्ये एक ग्रंथ 'शिवचरित्र' हा होता. दुसरा ग्रंथ गणितशास्त्रावरचा होता. तिसरा ग्रंथ खगोलावरचा होता. म्हणजे केवढी बुद्धिमत्ता आहे बघा. म्हणून तर मॅक्समुलर किंवा राधाकृष्णन यांच्यासारख्या जागतिक कीर्तीच्या विद्वानांनी लोकमान्यांच्या विद्वत्तेविषयी त्यांची प्रशस्ती केलेली आहे.

'गीतारहस्य' जे त्यांनी लिहिलं, त्याबद्दल मुद्दाम मी तुम्हाला एक गोष्ट सांगणार आहे. आपल्या स्वातंत्र्यचळवळीचा जो आंदोलनात्मक मार्ग होता, त्याला तत्त्वज्ञानाची बैठक देण्यासाठी त्यांनी तो ग्रंथ लिहिला. काय आहे तो ग्रंथ? त्याला लोकमान्यांनीच

दिलेलं दुसरं एक शीर्षक आहे 'कर्मयोगशास्त्र'. 'गीतारहस्य' हे वर लिहिलंय आणि त्याच्याखाली 'कर्मयोगशास्त्र' असं लिहिलंय. कर्मयोग! आपण आपलं काम करणं, आपली कृती करणं, कर्तव्य करणं, हाच एक ईश्वरभक्तीचा मार्ग आहे. गीतेकडे वेगवेगळ्या दृष्टीने पाहिले गेलेले आहे. लोकमान्य म्हणतात की, गीता ही कर्मयोगासाठी आहे. हा कर्मयोग त्यांनी का सांगितला? केवळ व्यक्तीला नव्हे, तर समाजाला कृतीप्रवण बनवण्यासाठी हा कर्मयोग ते सांगतात. त्यांनी जेव्हा 'गीतारहस्या'चा खर्डा लिहिला, तेव्हा त्यांनी स्वत:चे वर्णन करताना स्वत:साठी एक शब्द वापरला आहे– 'सकलभारतवर्ष हिताकांक्षी'. बघा, 'गीतारहस्य' लिहिताना डोक्यात काय आहे. 'सकलभारत' – 'सकल' शब्द आहे. 'सकलभारतवर्षहिताकांक्षी' म्हणजे 'सगळ्या भारतवर्षाच्या हिताची आकांक्षा बाळगणारा' असं स्वतःचं वर्णन ते करतात. मी बाकी तत्त्वज्ञानात जात नाही; पण तुम्हाला आश्चर्य वाटेल अशा एकदोन गोष्टी सांगतो. मंडालेहून सुटका झाली त्या वेळी जे 'गीतारहस्य' त्यांनी पेन्सिलने लिहून ठेवलं होतं त्याचं बाड ब्रिटिश सरकारने आपल्या ताब्यात ठेवलं होतं. कारावासातून परत पाठवताना ते बाड त्यांना दिलं नाही. अचानक त्यांना पुण्याला घरी आणून सोडलं. ते बाड सरकारने ठेवून घेतलं आणि पुढे ते चौकशीला दिलं की या माणसाने काय लिहिलंय याच्यात ते तपासायला हवं! 'ट्रांसलेटर'ला ते तपासायला दिलं. भरूचा नावाचा तो भाषांतरकार पारशी होता. त्याने जेव्हा रिपोर्ट दिला की हे धार्मिक विषयावरचं, तत्त्वज्ञानावरचं पुस्तक आहे, यात काही धोकादायक नाही, तेव्हा मग ते ब्रिटिशांनी पुढे ते हस्तलिखित परत केलं. पण मधला जो काळ होता तो मोठा अस्वस्थतेचा होता. टिळकांचे अनुयायी अस्वस्थ झाले होते. खूप मोठं बाड होतं ते, जवळजवळ ९०० छापील पानं भरतील एवढं मोठं बाड! लोकमान्यांच्या अनुयायांनी काळजी व्यक्त केली की ते बाड परत दिलं नाही तर काय करायचं? टिळक शांत होते, ते अनुयायांना असं म्हणाले, 'अरे, ग्रंथ जरी ब्रिटिश सरकारच्या हातात असला, तरी प्रत्यक्षात तो माझ्या डोक्यात आहे. काय होईल होऊन होऊन? माझं पुस्तक ते जप्त करतील आणि परत देणार नाहीत हस्तलिखित. मी सरळ उठेन आणि सिंहगडावर जाऊन चार महिने तिथे बसेन आणि तो सबंध ग्रंथ पुन्हा आठवून लिहून काढीन'. बघा, काय विलक्षण प्रतिभा आहे, स्मरणशक्ती आहे, आशावाद आहे! बाकीचे लोक अस्वस्थ झाले, पण टिळक धीरगंभीर. म्हणाले, मी पुन्हा लिहून काढतो! दुसरं म्हणजे ग्रंथ मराठीत का लिहिला, याचंही त्यांनी स्पष्टीकरण दिलंय. ते म्हणाले की, 'हा ग्रंथ जो आहे तो माझ्या समाजासाठी, माझ्या लोकांसाठी

आहे. तेव्हा त्यांना समजणाऱ्या त्यांच्या भाषेतच लिहायचा म्हणून मी हा मराठीत लिहिला आहे'. ते उत्तम इंग्रजीतही लिहू शकत होते. त्यांना संस्कृत उत्तम येत होते. तुम्हाला माहितीय का? डेक्कन कॉलेजमध्ये शिकत होते तेव्हा टिळकांनी संस्कृतमध्ये काव्यरचना केलेल्या होत्या.

पूर्वेकडच्या संस्कृती मागासलेल्या आहेत या अर्थाचं पाश्चात्त्यांनी जे काही लिहून ठेवलं होतं, त्याचा प्रतिवाद लोकमान्यांनी आपल्या ग्रंथामध्ये केला आणि तो आंधळेपणाने नाही केला. पाश्चात्त्य विचारांमध्ये जे चांगलं आहे असं वाटलं, ते त्यांनी स्वीकारलं होतं. एक साधं सांगतो तुम्हाला. त्याच्या खोलात जात नाही. 'उदारमतवाद' (Liberalism) हे असं तत्त्वज्ञान आहे की ज्याच्यात लोकशाही, राष्ट्रवाद, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, वैज्ञानिक विचार हे सगळं येत असतं. जॉन स्टुअर्ट मिल या तत्त्वज्ञाने उदारमतवादाची जी मांडणी केली होती, तिचा प्रभाव आपल्याकडच्या अनेक विचारवंतांवर, नेत्यांवर पडला. तो प्रभाव न्यायमूर्ती रानड्यांवर आहे, आगरकरांवर आहे, टिळकांवरही आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरसुद्धा आपल्याला उदारमतवादाचा काही प्रभाव दिसून येतो. प्रत्येकावर हा प्रभाव वेगवेगळा आहे; पण आहे. जे पाश्चात्त्य आहे, त्यातलं चांगलं घेऊन आपल्याकडच्या चांगल्या गोष्टींची जोड त्याला द्यायचा या लोकांचा प्रयत्न होता. जुन्यातलं सोनं टिकवायचं आणि त्याला तिकडच्या चांगल्याची जोड द्यायची आणि आपल्या देशाला आधुनिक बनवायचं, असा तो प्रयत्न होता. एक उदाहरण सांगतो तुम्हाला. जेरेमी बेंथॅम याने उदारमवादाला जे जहाल रूप दिले, ते 'उपयुक्ततावाद' (Utilitarianism) म्हणून ओळखले जाते. 'जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त सुख' (Greatest good for the Greatest number) हे त्याचं एक महत्त्वाचं सूत्र. ते 'सुखवाद' (Hedonism) म्हणून ओळखले जात असे. मानवी कृतीच्या मागे काय असतं? सुख मिळवणे ही माणसाची मूलभूत प्रेरणा आहे, असा विचार त्यांनी मांडला. पण हा जो जॉन स्टुअर्ट मिल होता, त्यांनी उपयुक्ततावादाला नवं वळण देऊन सुखाची प्रतवारी लावली. लोकमान्यांनी भारतीय परिभाषेत ती प्रतवारी लावली. सुख कशातही मिळू शकतं. म्हणजे आपल्याला समजा अचानक सुट्टी मिळाली आणि घरी जाऊन आपण लोळत पडलो, तरी त्यातही एखाद्याला सुख मिळू शकतं. पण श्रेष्ठ सुख कुठलं आणि कमी दर्जाचं सुख कुठलं आहे, यातही विवेक करावा लागतो. म्हणून लोकमान्यांनी भारतीय परिभाषेमध्ये सुखाचे प्रकार पाडले आणि सात्त्विक, राजस व तामस हे तीन प्रकार सांगून सात्त्विक सुख आणि तेही सामाजिक सुख हे कसं

महत्त्वाचं आहे, ते त्यात सांगितलं. 'गीतारहस्या'च्या पाचव्या प्रकरणाचं नावच मुळी 'सुखदुःखविवेक' असं आहे. तिथे त्यांनी तळटिपेत जॉन स्टुअर्ट मिलचं एक विधान दिलंय. किती सुंदर विधान आहे बघा. सुखाचे तात्त्विक विवेचन हे या एका विधानामध्ये आहे. त्यांनी असं म्हटलंय, 'एखादं सुखी समाधानी डुक्कर होण्यापेक्षा एखादा अस्वस्थ माणूस होणं मला आवडेल आणि एखादा सुखी समाधानी मूर्ख माणूस होण्यापेक्षा अत्यंत अस्वस्थ असा सॉक्रेटिस होणं मला आवडेल.' सॉक्रेटिस तत्त्वज्ञ होता. त्याच्यासारख्यांच्या अस्वस्थतेत कुठेतरी प्रगतीची बीजं असतात. म्हणून आम्ही अस्वस्थ असलो तरी तेही एक प्रकारचे सुख आहे. या पद्धतीचे तत्त्वज्ञान 'गीतारहस्यात' आहे. ते आपल्याला माहीत नसतं. आपण फक्त शाळेत वाचतो की टिळकांनी 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहिला. पण त्याद्वारे त्यांनी भारतीय स्वातंत्र्यचळवळीला कर्मयोगाची बैठक देण्याचा प्रयत्न केला, हे खूप महत्त्वाचे आहे.

लढाई ही जशी शस्त्राने लढायची असते, तशी विचाराने लढायची असते. टिळक अशी विचारांची लढाई लढत होते. म्हणून ते आर्थिक क्षेत्रातसुद्धा काय करतात ते बघा. ब्रिटिश आपलं आर्थिक शोषण करताहेत याची त्यांना जाणीव होती. ब्रिटिशांनी रेल्वे आणली. आपल्याला माहीत आहे की १८५३ साली भारतात रेल्वे आली. रेल्वेचा आपल्याला पुढे फायदाही झाला. पण त्या वेळी ब्रिटिशांचा हेतू काय होता? इथला कच्चा माल वेगाने तिकडे नेता यावा आणि इंग्लंडमध्ये तयार होणारा माल भारतासारख्या देशांमध्ये खपवता यावा, असा तो हेतू होता. त्यातून ब्रिटिशांना प्रचंड नफा मिळणार होता. आपल्याकडे जेव्हा रेल्वे आली, तेव्हा त्यांनी पहिलं काय केलं तर जे कापूस पिकवणारे प्रदेश आहेत ते मुंबई बंदराशी जोडले. सैन्याच्या वेगाने हालचाली व्हाव्या म्हणूनही रेल्वे आणली. विरोध दडपून टाकायला त्यामुळे मदतच होणार होती. लोकमान्यांना याची जाणीव होती. भारतातल्या रेल्वे मार्गासाठी प्रचंड भारतीय पैसा वापरला जातोय आणि फायदा मात्र ब्रिटिशांना मिळणार आहे, हे माहिती असल्यामुळे त्यांनी रेल्वेवर होणाऱ्या खर्चाबद्दल असे मार्मिक उद्गार काढले की, रेल्वेचे जाळे इथल्या पैशाने पसरवणे हे शेजाऱ्याच्या बायकोला सजवण्यासारखे आहे! नुसते एवढेच नाही. औद्योगिक परिषदेचे पहिले अखिल भारतीय अधिवेशन १८९१ साली लोकमान्य टिळकांनी भरवले. केवळ शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरच टिळकांचे तब्बल ४१ अग्रलेख आहेत. कामगारांच्या प्रश्नावरही त्यांनी लिहिले आहे. एक गरीब धनगर होता. त्याची थोडी शेती होती. टिळक जेव्हा मंडालेच्या कारावासात होते, तेव्हा पत्र लिहून त्यांचा सल्ला तो मागत

असे. ते चिरोल खटला लढून जेव्हा आले, तेव्हा मद्रासला आणि मुंबईला कामगार संघटनांनी त्यांचे सत्कार केले. मद्रासला बोलत असताना भाषणात ते असे म्हणाले की, 'आम्हाला जे स्वातंत्र्य हवे आहे ते खरं म्हणजे कष्टकरी वर्गासाठी हवे आहे, शेतकरी आणि कामगार यांच्यासाठी हवे आहे. खऱ्या अर्थाने आम्हाला इथल्या गरीब माणसांसाठी हे स्वातंत्र्य मिळवायचे आहे.' लोकमान्यांनी काही सामाजिक सुधारणांना विरोध केला, हे आपल्याला माहिती असतं. पण कसं असतं की, जशी जीवसृष्टीची उत्क्रांती होते तशी माणसाचीसुद्धा त्याच्या व्यक्तिगत जीवनात उत्क्रांती होते. टिळकांसारखे नेतेही काळाच्या टप्प्यात बदलत जातात. लोकमान्य टिळक हे जेव्हा राष्ट्रीय पातळीवरचे नेते बनले, तेव्हा त्यांनी हिंदू-मुस्लिम ऐक्याचा पुरस्कार केला. लखनौ करार असेल, खिलाफत चळवळ असेल, टिळकांचा त्यात पुढाकार होता. तुम्हाला आश्चर्य वाटेल असे उदाहरण सांगतो. मोहम्मद अली जीना हे पाकिस्तान निर्मितीनंतरही टिळकभक्त होते, केवळ स्वातंत्र्यलढ्याच्या सुरुवातीला नव्हे! पाकिस्ताननिर्मितीनंतर जेव्हा तिथे जाळपोळ झाली, तेव्हा जीनांनी आपल्या अनुयायांना असे सांगितले की, 'तुम्ही बाकी काहीही करा, पण कराचीमध्ये जो लोकमान्य टिळकांचा पुतळा आहे त्याला धक्का लागता कामा नये!' हे टिळकांचं चित्र आपल्याला माहिती नसतं. टिळकांच्या पार्थिवाला खांदा देणाऱ्यातसुद्धा मुस्लिम होते, हेसुद्धा काहींना माहिती नसतं. म्हणजे किती वेगवेगळ्या लोकांनी त्यांच्यावर प्रेम केलेलं आहे बघा!

बडोद्याचे सयाजीराव महाराज यांनी १९१८ साली एक अस्पृश्यता निवारण परिषद भरवली. त्याला लोकमान्य हजर होते. त्या परिषदेमध्ये लोकमान्यांनी असं विधान केलं की, 'जर ईश्वर अस्पृश्यता मानणार असेल तर अशा ईश्वराला मी मानणार नाही!' अस्पृश्यता निवारण ठरावावर मात्र त्यांनी सही केली नाही. कारण त्यांच्यावर काही अनुयायांचे दबाव होते. काय असतं की राजकीय नेत्यावर अनुयायांचे दबाव असतात. त्यामुळे सामाजिक संदर्भात सगळ्या जहाल स्वरूपाच्या गोष्टी त्याला करता येत नाहीत. म्हणून तुम्हाला असे दिसेल की, त्या काळात जे राजकीय जहाल आहेत ते सामाजिक मवाळ आहेत आणि जे सामाजिक जहाल आहेत ते राजकीय मवाळ आहेत! काही वेळा टिळकांवर 'उजवे'पणाचा आरोप केला गेला. डाव्या-उजव्याची जी काही भाषा आहे, ती कधीकधी फार शिक्केबाजीने केली जाते! म्हणून तुम्हाला मुद्दाम सांगतो की, कार्ल मार्क्सचा परिचय भारताला पहिल्यांदा लोकमान्य टिळक यांनी करून दिलेला आहे. हे माहिती आहे का तुम्हाला? कधी

करून दिला? तर अगदी १८८१ साली! भारतीय छापील साहित्यामध्ये मार्क्सचा पहिला उल्लेख हा टिळकांनी केलेला आहे. ‘मराठा’चा १७ एप्रिलचा अंक आहे, त्याच्यात ते ‘कम्युनिझम’बद्दल लिहितात. १ मे १८८१ च्या अंकामध्ये ते कार्ल मार्क्सचा उल्लेख करतात. १९०८ मध्ये जेव्हा मंडालेची सहा वर्षांची कारावासाची शिक्षा त्यांना झाली, तेव्हा मुंबईतले कामगार उत्स्फूर्तपणे संपावर गेले. अण्णा भाऊंच्या कवितेतसुद्धा ते आहे. सहा वर्षांची शिक्षा म्हणून मुंबईतल्या गिरणी कामगारांनी सहा दिवस संप केला. आपणहून केला. कोणी सांगीतलं नव्हतं. ही अशी कित्येक उदाहरणे देता येतील की ज्यांच्यातून लोकमान्य टिळकांचं एक अगदी वेगळं असं दर्शन आपल्याला घडू शकतं.

आर्थिक बाबतीतलं एक वेगळं उदाहरण सांगतो तुम्हाला. १३ फेब्रुवारी १८८१चा ‘मराठा’तला अग्रलेख आहे टिळकांचा. त्यात ते काय म्हणतात? 'We must become capitalists and enterprisers - आपण भांडवलदार आणि उद्योगपती झालं पाहिजे. उद्योगांचे मालक झालं पाहिजे. A nation of traders, machine-makers and shopkeepers - आपलं राष्ट्र हे व्यापाऱ्यांचं, यंत्रनिर्मात्यांचं आणि दुकानदारांचं राष्ट्र झालं पाहिजे’. बघा, केवढी दूरदृष्टी आहे! १८८१ मध्ये त्यांनी हे लिहिलेलं आहे! एकीकडे ते हे लिहितात आणि दुसरीकडे मार्क्सचा परिचयही करून देतात. तिसरीकडे लेनिनवर १९१८ मध्ये अग्रलेख लिहितात. पण त्यातल्या कशाच्याही ते आहारी जात नाहीत. म्हणजे ते भांडवलशाहीचे पुरस्कर्ते नव्हते किंवा मार्क्सवादाचे पुरस्कर्तेही नव्हते. पण या दोहोंतून जे चांगलं आहे, ते घेण्याची दृष्टी त्यांच्यामध्ये होती. अशी दृष्टी असल्यामुळे लोकमान्यांनी एका भूमिकायुद्धाला चालना दिली. नुसतं स्वातंत्र्यलढ्याचं राजकीय नेतृत्व केलं नाही, तर संस्कृतीच्या रणांगणावर एक फार मोठा लढाही त्यांनी उभारला. या लढ्यातून जी जागृती झाली ती आपल्या स्वातंत्र्यचळवळीला पुढे न्यायला पूरक ठरली. कुठलीही चळवळ ही सुरुवातीला नदीच्या उगमासारखी असते. मूठभर लोक तिचे नेतृत्व करतात. पण या चळवळीचे जनचळवळीमध्ये रूपांतर करण्यासाठी लोकमान्यांनी पुढाकार घेतला. ते पहिले असे मोठे नेते आहेत की भारतीय स्वातंत्र्य चळवळीला जनचळवळीचे रूप देण्याचे काम त्यांनी केले आणि तोच धागा पकडून पुढे महात्मा गांधीजींनी तिला आणखी विराट स्वरूप दिले. टिळक आणि गांधी हे एकमेकांच्या विरुद्ध होते, असं मानणं चुकीचं आहे. एक अर्थपूर्ण उदाहरण देतो. अवंतिकाबाई गोखले यांनी जे पहिले गांधी चरित्र लिहिले, त्याला टिळकांची प्रस्तावना होती आणि त्यात ते

गांधीजींच्या नव्या मार्गाचे स्वागत करतात. ते म्हणतात की, काही वेळा हा मार्ग उपयोगी नाही पडणार, पण हा फार महत्त्वाचा मार्ग आहे. त्यांनी गांधीजींचं कौतुक केलं. लोकमान्यांच्या मृत्युपूर्वी सुमारे चार महिने आधी सिंहगडावर लोकमान्य टिळक आणि गांधीजी यांची भेट झाली. त्या भेटीमध्ये लोकमान्यांनी गांधीजींना असं सांगितलं की, 'माझा सगळा जन्म या ब्रिटिशांविरुद्ध लढण्यात खर्ची पडलेला आहे. त्यामुळे ब्रिटिश काय आहेत हे मी चांगलं ओळखतो आणि मलाही ब्रिटिश चांगलं ओळखतात. जेव्हा तुम्हाला ब्रिटिशांचा खरा परिचय होईल, तेव्हा ते किती कुटिल आहेत, किती क्रूर आहेत हे जेव्हा तुमच्या लक्षात येईल, तेव्हा ब्रिटिशांविरुद्ध लढण्यात तुम्ही माझ्याही पुढे जाल'. लोकमान्य टिळकांनी व्यक्त केलेली ही भविष्यवाणी पुढे खरी ठरली! त्यांनी जनचळवळीचे रूप भारतीय स्वातंत्र्यचळवळीला द्यायला सुरुवात केली. 'तेल्यातांबोळ्यांचे पुढारी'म्हणून नुसते ओळखले गेले नाहीत, तर खरोखरच त्या पद्धतीने शेतकरी, कामगार, सामान्य जनता या सगळ्यांपर्यंत ही चळवळ पोहोचवण्याचे त्यांनी प्रयत्न केले. तोच धागा पकडून पुढे महात्मा गांधींनी त्या चळवळीला आणखी विराट स्वरूप दिले. ही जी इतिहासातली साखळी प्रक्रिया आहे, ती जेव्हा आपण समजून घेतो, तेव्हा 'दोन नेत्यांमधलं भांडण' असा चुकीचा अर्थ आपण लावत नाही. हे जर आपण लक्षात ठेवलं तर इतिहासातलं त्यांचं महत्त्व आपल्याला कळू शकतं.

*(श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये मंगळवार, दि. १ ऑगस्ट २०२३ रोजी लो. टिळक पुण्यतिथी आयोजित करण्यात आली होती. सभेसाठी ज्येष्ठ प्राध्यापक, लेखक, संपादक, इतिहास संशोधक आणि महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष व प्रमुख संपादक श्री. राजा दीक्षित यांना सन्माननीय वक्ते म्हणून निमंत्रित करण्यात आले होते.)*

# पुरवणी

## कवडसे, प्रा. वि. म. दांडेकर यांच्या विचारविश्वाचे


३९ ■ भारतीय अर्थव्यवस्थेतील बेकारी आणि असमतोल

५६ ■ दीक्षान्त भाषण

६३ ■ वंचितांचा विकास प्रयत्न

७१ ■ पूर्ण रोजगार : नवीन नियोजन आयोगाचा दृष्टिकोन

# पुरवणी

# भारतीय अर्थव्यवस्थेतील बेकारी व असमतोल

भारतीय अर्थव्यवस्थेत फार मोठी बेकारी साचलेली आहे, ही गोष्ट सर्वमान्य आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेअखेर जशी ती होती, तशीच ती आता पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीसही आहे. तुंबलेल्या बेकारीच्या आकारमानाबद्दल मतभेद असले तरी तिच्या अस्तित्वाबद्दल मला वाटते दुमत असण्याचे कारण नाही. त्याचप्रमाणे गेल्या काही वर्षात बेकारीमध्ये सातत्याने वाढच होत आली आहे. याबाबतही दुमत असेल, असे वाटत नाही. १९७१ च्या शिरगणतीच्या उपलब्ध आकडेवारीकडे नजर टाकल्यास बेकारीबाबत शंका दूर होऊ शकतात.

भारताची लोकसंख्या १९६१ मध्ये ४३९.२ दशलक्ष होती; ती १९७१ मध्ये ५४७.४ दशलक्ष एवढी झाली; म्हणजे या दशकात ती २४.६ टक्के वाढली. ही वाढ त्याबद्दल केलेल्या अपेक्षेपेक्षा कमी आहे असे सांगण्यात येते. परंतु त्याचे कारण आपल्या कुटुंबनियोजन कार्यक्रमास यश येऊन जननदर कमी झाला, असे नसून अपेक्षेप्रमाणे मृत्यूदर घटलेला नाही हे आहे. अशा प्रकारे यमदेवाची आपणावर कृपा झाली त्याबद्दल आपण त्याचे आभारच मानले पाहिजेत. काहीही असले तरी या दशकात लोकसंख्येत २४.६ टक्के इतकी वाढ होऊनही श्रमिकांच्या संख्येत मात्र २.६ इतकी घटच झाली. १९६१ च्या शिरगणतीत १८८.०६ दशलक्ष श्रमिकांची नोंद होती. १९७१ मध्ये ही संख्या १८३.६ दशलक्ष इतकी आहे. एकूण लोकसंख्या वाढूनही श्रमिकांच्या संख्येत झालेली घट ही एक गंभीर बाब आहे हे निश्चित.

असेही सांगण्यात येते की १९६१ ते १९७१ मध्ये श्रमिकांच्या संख्येत दिसून येणारी घट ही खरी नसून बहुतांशी ती 'श्रमिक' या संज्ञेची व्याख्या १९६१ पेक्षा १९७१ साली अधिक काटेकोरपणे लागू केल्याचे द्योतक आहे. हे शक्य वाटते आणि खास करून स्त्री श्रमिकांच्या नोंदणीवर त्याचा परिणाम झालेला आहे. उदाहरणार्थ, एकूण श्रमिकांची संख्या जरी २.६ टक्क्यांनी घटलेली असली तरी स्त्री

श्रमिकांच्या बाबतीत ही घट अधिक ठळक आहे. १९६१ आणि १९७१ या काळात स्त्री श्रमिकांची संख्या सुमारे ४१.४ टक्क्यांनी घटली. परंतु १९६१ च्या शिरगणतीत एकूण स्त्रियांच्या २८% इतक्या स्त्रिया 'श्रमिक' म्हणून नोंदविल्या गेल्या होत्या. हे प्रमाण १९७१ मध्ये केवळ १३.२ टक्क्यावर आले. यावरून असे म्हणता येईल की 'श्रमिक' या संज्ञेची व्याख्या १९६१ पेक्षा १९७१ साली अधिक काटेकोरपण करण्यात आली. कारणे कोणतीही असली तरी एक गोष्ट स्पष्ट दिसते की १९६१ व १९७१ च्या शिरगणतीतील स्त्री श्रमिकांच्या आकडेवारीची सहज तुलना होण्यासारखी नाही. तेव्हा आपण पुरुष श्रमिकांबद्दलच पुढे विचार करू या.

१९६१ ते १९७१ या काळात पुरुष श्रमिकांची संख्या घटलेली नाही. १९६१ मध्ये ही संख्या १२९.१ दशलक्ष होती, ती १९७१ मध्ये १४८.८ दशलक्ष इतकी म्हणजेच शेकडा १५.२ ने वाढली; परंतु याच काळात पुरुषांची लोकसंख्या मात्र शेकडा २५.२ इतकी वाढली; म्हणजे रोजगारवाढ ही लोकसंख्यावाढीपेक्षा बरीच कमी प्रमाणात झाली हे उघड आहे. असेही दाखविता येईल की १९६१ मध्ये पुरुष श्रमिकांचे एकूण पुरुष लोकसंख्येशी प्रमाण ५७.१ टक्के होते. ते १९७१ मध्ये ५२.५ टक्क्यावर आले. म्हणजेच 'श्रमिक' ही संज्ञा अधिक काटेकोरपणे वापरल्यामुळे स्त्री श्रमिकांच्या नोंदणीप्रमाणेच पुरुष श्रमिकांच्या नोंदणीवरही परिणाम झाला असणे शक्य आहे. शिरगणतीची निश्चित आकडेवारी उपलब्ध होऊन तिच्या छाननीने परिस्थिती स्पष्ट होईपर्यंत काहीही निश्चित विधान करणे शक्य नाही. तोपर्यंत मात्र १९७१ च्या शिरगणतीत पुरुष श्रमिकांची अपुरी नोंद झाली नाही असेच मानून एकंदर लोकसंख्यावाढीपेक्षा पुरुष – श्रमिकांच्या संख्येत जी कमी वाढ दिसून येते, तिची मीमांसा करणे योग्य ठरेल. १९६१ मध्ये पुरुष श्रमिकांची संख्या १२९.१ दशलक्ष म्हणून नोंदली गेलेली होती. याखेरीज ज्यांची नोंदणी 'श्रमिक' म्हणून झालेली नव्हती असे बेकार व अर्धबेकार हेही विचारात घेतले पाहिजेत.

ज्या प्रमाणात म्हणजे २५.२ टक्के दराने एकंदर लोकसंख्या वाढली त्याच प्रमाणात पुरुष श्रमिकांच्या संख्येत वाढ झाली आहे, असे गृहीत धरल्यास १९६१– १९७१ या काळात पुरुष श्रमिकांच्या संख्येतील निव्वळ वाढ ३२.५ दशलक्षापेक्षा अधिक व्हावयास हवी होती. परंतु प्रत्यक्षात मात्र पुरुष श्रमिकांची संख्या केवळ १९.७ दशलक्ष इतकीच वाढली. याचा अर्थ असा की १९६१ मध्ये असणाऱ्या मूळ बेकारीच्या संख्येत १२.८ दशलक्षपेक्षाही अधिक निव्वळ भर पडली. पुरुष श्रमिकांची नोंदणी अपुरी झाली असण्याची शक्यता मानूनही १९६१–७१ च्या दशकात पुरुष

श्रमिकांच्या बेकारीत किमान १० दशलक्ष बेकारांची तरी निव्वळ भर पडली आहे. हा निष्कर्ष अटळ दिसतो.

या अपयशाची बीजे प्रथमतः शेती आणि बिगरशेती क्षेत्रात शोधण्याचा आपण स्थूल प्रयत्न करू. शिरगणतीत केल्याप्रमाणेच आपण श्रमिकांचे वर्गीकरण (१) शेतकरी व शेतमजूर आणि (२) इतर श्रमिक अशा दोन वर्गात करू. पहिल्या गटास आपण शेतमजूर आणि दुसऱ्या गटास बिगर शेतमजूर असे संबोधू. १९६१–१९७१ या काळात पुरुष श्रमिकांची संख्या १५.२ टक्के वाढली. वरील दोन गटांत त्याची विभागणी केल्यास असे दिसते की शेतमजुरांची संख्या १९६१ मध्ये ८३.७ दशलक्ष होती, ती १९७१ मध्ये १००.३ दशलक्ष झाली; म्हणजेच १९६१–१९७१ मध्ये शेतमजुरांची संख्या १९.८ टक्क्यांनी वाढली. याउलट बिगर शेतमजुरांची संख्या १९६१ मध्ये ४५.४ दशलक्ष वरून १९७१ मध्ये ४८.५ दशलक्ष वर गेली; म्हणजे फक्त ६.९ टक्क्यांनीच वाढली. याचा अर्थ बिगरशेती विभागातील रोजगार पुरेसा वाढला नाही हे उघड आहे. १९६१–७१ मध्ये शेती विभागात झालेली १९.८ टक्क्यांची रोजगारवाढ स्पृहणीय आहे. एकंदर लोकसंख्यावाढीच्या मानाने ही वाढ कमी असली तरीही शेती विभागात रोजगारवाढीला असणारा मर्यादित वाव लक्षात घेता ती निश्चितच भरीव आहे. बिगर शेती विभागात रोजगार विस्तार न झाल्याने जादा श्रमिकांना सामावून घेण्यात अपयश आल्याचे दिसते व अन्यत्र सामावू न शकणाऱ्या या जादा श्रमिकांचा शेती विभागात अगतिकपणे स्वीकार करण्याखेरीज गत्यंतर राहिले नसावे.

१९६१–७१ या काळात बिगरशेती विभागातील श्रमिकांची संख्या फक्त ६.९ टक्क्यांनी वाढली असता शेती विभागातील श्रमिकांची संख्या मात्र १९.८ टक्क्यांनी वाढली. याचा अर्थ १९६१ पेक्षा १९७१ मध्ये शेती विभागातील श्रमिकांचे प्रमाण जास्त होते. १९६१ मध्ये एकूण पुरुष श्रमिकांपैकी शेती विभागात राबणाऱ्यांचे प्रमाण ६४.८ असे होते ते १९७१ मध्ये वाढून ६७.४ टक्क्यांवर गेले. शेती विभागात काम करणाऱ्यांचे प्रमाण हे देशाच्या आर्थिक प्रगतीच्या अवस्थेचे निदर्शक आहे असे सामान्यतः म्हणता येते. विकास मार्गावर यासंबंधीचे काही ठळक टप्पे असतात. प्रगतीच्या पहिल्या टप्प्याच्या अखेरीस शेती विभागात काम करणाऱ्या लोकांचे प्रमाण स्थिरावते म्हणजेच वाढावयाचे थांबते. १९७१च्या आकडेवारीचे वरील निष्कर्ष पाहता असे दिसून येते की आपण अद्याप विकासाच्या या अवस्थेपर्यंतही मजल मारली नाही. कारण त्या अवस्थेपर्यंत पोहोचण्यासाठी बिगरशेती विभागातील रोजगारवाढीचे प्रमाण एकंदर लोकसंख्यावाढीच्या प्रमाणाइतके असणे आवश्यक

असते. थोडक्यात म्हणजे १९६१-७१ मध्ये बिगरशेती विभागातील रोजगारवाढ किमान २५ टक्के तरी व्हायला हवी होती. परंतु प्रत्यक्षात ती केवळ ७ टक्क्यापेक्षाही कमीच झाली आहे. विकासाच्या दुसऱ्या टप्प्यात शेती विभागातील काम करणाऱ्यांची प्रत्यक्ष संख्या जरी वाढत राहिली तरी त्यांचे प्रमाण मात्र घटू लागते. या दुसऱ्या टप्प्याच्या अखेरीस मात्र शेती विभागात काम करणाऱ्यांची प्रत्यक्ष संख्याही वाढण्याचे थांबते. असे होण्यासाठी (पूर्वीचे संचित बेकार) आणि एकूण श्रमिकांच्या संख्येत होणारी निव्वळ वाढ ही बिगरशेती विभागातच सामावले जाणे अगत्याचे असते. १९६१ पूर्वीच्या संचित बेकारीचा विचार जरी दूर ठेवला तरीही १९६१-७१ मध्ये पुरुष श्रमिकांच्या संख्येत झालेली ३२.५ दशलक्ष इतकी निव्वळ भर १९६१-७१ या दशकात बिगरशेती विभागात सामावली जाणे आवश्यक होते. १९६१ मध्ये बिगरशेती विभागात ४५.४ दशलक्ष श्रमिक होते. त्यात भर पडलेल्या या ३२.५ दशलक्ष जादा श्रमिकांना सामावून घेण्यासाठी दहा वर्षात बिगरशेती विभागातील रोजगारीत ७१.६ टक्क्यांनी वाढ होणे आवश्यक होते. ही रोजगारवाढ अपेक्षेबाहेर मोठी नाही; कारण यासाठी केवळ ५.५ टक्के इतका विकास वेग पुरेसा आहे. वास्तविक जेवढा विकास एका वर्षात करणे शक्य आणि आवश्यक होते, त्यालाही आपणास दहा वर्षे लागत आहेत हे दुर्दैव होय.

बिगरशेती विभागातील रोजगार कशा स्वरूपाचा आहे आणि त्यात वाढ का झाली नाही हे पाहिले पाहिजे. १९७१ च्या शिरगणतीची संपूर्ण आकडेवारी अद्याप उपलब्ध नसली तरी १९६१ मधील बिगरशेती विभागातील श्रमिकांची विभागणी ही त्या विभागातील रोजगारीचे स्वरूप उलगडून दाखवील. हे स्वरूप अशा प्रकारचे आहे.

**१९६१ च्या शिरगणतीप्रमाणे पुरुष श्रमिकांची संख्या**

| | **दश लक्ष** |
|---|---|
| पशुसंवर्धन, जंगल, मळे इ. | ३.३ |
| खाणी | ०.७ |
| गृहोद्योग | ७.४ |
| बांधकाम | १.८ |
| व्यापारक्षेत्र | ६.८ |
| वाहतूक, साठवण व दळणवळण | ३.० |
| इतर सेवा | १५.२ |
| **एकूण बिगरशेती श्रमिक** | **४५.४** |

बिगरशेती रोजगारापैकी १/३ रोजगार कारखाने क्षेत्रात असून तो गृहोद्योग व बिगरगृहोद्योग यामध्ये जवळ जवळ समान प्रमाणात विभागला गेला आहे. बिगरशेती विभागातील आणखी १/३ रोजगार सेवा निर्मितीच्या क्षेत्रात असून यात सरकारी नोकरांचा समावेश आहे. राहिलेले १/३ लोक व्यापार-उदीम, वाहतूक, साठवण, दळणवळण इ. प्रमुख व्यवसायांत आहेत. १९७१च्या शिरगणतीतील अशा तऱ्हेच्या विभागणीचा तपशील उपलब्ध नसल्यामुळे १९६१-७१ या दशकात कोणत्या विभागात रोजगारवाढ अधिक व कोणत्या विभागात रोजगारवाढ कमी झाली हे सांगणे कठीण आहे.

परंतु बिगरशेती क्षेत्रातील संघटित विभागाबाबत मात्र बरीच माहिती उपलब्ध आहे. या संघटित विभागात बिगरशेती विभागातील सुमारे १/३ रोजगार सामावलेला आहे. या विभागातील आकडेवारी डायरेक्टर जनरल ऑफ एम्प्लॉयमेंट अँड ट्रेनिंग यांजकडून व शॉप्स अँड एस्टॅब्लिशमेंटस् ॲक्टस्खाली सादर केलेल्या पत्रकांमधून उपलब्ध आहे.

१९६१ व १९७१ मध्ये संघटित विभागातील रोजगाराची विभागणी खालीलप्रमाणे होती.

**संघटित विभागातील रोजगार**

**१९६१ च्या तुलनेने**

| | **१९६१ (द. ल.)** | **१९७१ (द. ल.)** | **१९७१ मध्ये शेकडा वाढ** |
|---|---|---|---|
| पशुसंगोपन, जंगले, मळे इ. | ०.८५ | १.०७ | २५.९ |
| खाण उद्योग | ०.६८ | ०.५९ | -१३.२ |
| कारखानदारी, वीज इ. | ३.६५ | ५.२४ | ४३.६ |
| बांधकाम | ०.८४ | १.०२ | २१.४ |
| दुकाने व व्यावसायिक संस्था | २.०७ | २.९३ | ४१.५ |
| वाहतूक व दळणवळण | १.०८ | २.३२ | २८.९ |
| सेवा निर्मिती | ४.०१ | ६.६० | ६४.६ |
| **एकूण** | **१३.९०** | **१९.७७** | **४२.२** |

वरील कोष्टकात दर्शविल्याप्रमाणे १९६१ ते १९७१ या दशकात संघटित विभागातील रोजगारात ४२.२ टक्के वाढ झाली. कारखानदारी, दुकाने, व्यावसायिक संस्था यांमधील रोजगारवाढ जवळ जवळ त्याच प्रमाणात असून, या दोन्हीत १९६१-७१ या दशकात ४२.८ टक्के म्हणजेच दरसाल ३.६ टक्के इतकी वाढ झाली

आहे. बांधकाम, वाहतूक इ. विभागात ०.६ टक्के पेक्षा कमी दराने रोजगारवाढ झाली आहे. परंतु त्यातील मोठा हिस्सा शासकीय सेवांचा आहे व ही रोजगारवाढ अर्थव्यवस्थेच्या इतर क्षेत्रांत होणाऱ्या बदलांशी असंबद्ध व स्वयंप्रेरित आहे.

संघटित क्षेत्रातील रोजगारात स्त्रियांचा वाटा फक्त १० टक्के आहे. आपण फक्त पुरुषश्रमिकांपुरताच विचार करीत असल्याने संघटित क्षेत्रातील स्त्रियांचा रोजगार त्यातून वगळणे योग्य ठरेल. यामुळे संघटित क्षेत्रातील पुरुष श्रमिकांची संख्या १९६१ मध्ये १२.५ दशलक्ष व १९७१ मध्ये १७.८ दशलक्ष इतकी भरते. ही वाढ शेकडा ४२.२ इतकी आहे. परंतु एकूण बिगरशेती रोजगारातील फक्त १/३ रोजगारच संघटित क्षेत्रात असून त्याची वाढ फक्त ६.९ इतकीच झाली असल्याचे आपण पाहिले आहे. यावरून १९६१ ते १९७१ या दशकात बिगरशेती क्षेत्रातील असंघटित भागात रोजगारात घट झाल्याचे आणि १९७१च्या शिरगणतीचे अंदाज प्रमाण मानल्यास ही घट ६.७ टक्के असल्याचे दिसून येते.

**पुरुषांची संख्या**

| | | | **१९७१ मध्ये** |
|---|---|---|---|
| | **१९६१** | **१९७१** | **१९६१ च्या तुलनेने** |
| | **(दशलक्ष)** | **(दशलक्ष)** | **शेकडा वाढ** |
| एकूण लोकसंख्या | २२६.३ | २८३.३ | २५.२ |
| श्रमिकांची संख्या | १२९.१ | १४८.८ | १५.२ |
| शेतीक्षेत्रातील श्रमिक | ८३.७ | १००.३ | १९.८ |
| बिगरशेतीक्षेत्रातील श्रमिक | | | |
| १) संघटित विभाग | १२.५ | १७.८ | ४२.२ |
| २) असंघटित विभाग | ३२.९ | ३०.७ | –६.७ |

वरील तक्त्यावरून दिसून येईल की, १९६१–७१ या दशकात, पुरुषांची लोकसंख्या २५.२ टक्के वाढली. पुरुष श्रमिकांची संख्या १५.२ टक्के वाढली. शेतीविभागातील श्रमिकसंख्या १९.८ टक्क्यांनी वाढली. संघटित क्षेत्रातील बिगरशेती श्रमिकांची संख्या ४२.२ टक्क्यांनी वाढली, तर असंघटित क्षेत्रातील बिगरशेती श्रमिकांची संख्या मात्र ६.७ टक्क्यांनी घटली. यापैकी संघटित क्षेत्रातील रोजगारवाढ ही खरी असली तरी ती फसवी आहे. या क्षेत्रात एकूण पुरुष श्रमिकांच्या फक्त १० टक्केच श्रमिक सामावले गेले आहेत. शेती विभागातील श्रमिकांच्या संख्येत भरीव वाढ

झालेली दिसते. परंतु ही वाढ खरोखरच रोजगार वाढल्याने आहे की कसे हे जाणणे कठीण आहे. कारण अन्य क्षेत्रातून ज्यांचा समावेश झालेला नाही अशा श्रमिकांची गणनाही यामध्ये झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. बिगरशेती विभागातील असंघटित श्रमिकांच्या संख्येतील घट ही कदाचित १९६१ पेक्षा १९७१ मध्ये 'श्रमिक' या शब्दाची व्याख्या अधिक काटेकोरपणे केल्याने दिसत असावी. अर्थात काही अंशी ती खरीही आहे. असंघटित क्षेत्रात प्रामुख्याने गृहोद्योग व सेवा-निर्मिती व्यवसायांचा समावेश होतो व संबंधित विभागातील संघटित क्षेत्रात रोजगार विस्तार घडून आल्याने या असंघटित क्षेत्रातील श्रमिक संख्या घटली असणे सहज शक्य आहे.

भारतातील रोजगार प्रश्नांची यथार्थ कल्पना येण्यासाठी याबाबतच्या आकडेवारीची अधिक फोड करू या. १९७१ मध्ये पुरुष श्रमिक वर्गाची संख्या १५० दशलक्ष होती. यापैकी १०० दशलक्ष म्हणजे जवळ जवळ २/३ शेती विभागात होते. उरलेल्या ५० दशलक्ष बिगरशेती श्रमिकांपैकी २० दशलक्ष संघटित व ३० दशलक्ष असंघटित विभागात काम करीत होते. आपल्या रोजगारविषयक कार्यक्रमाचे पहिले उद्दिष्ट शेती विभागातील श्रमिकांची संख्या निदान आजच्याच पातळीवर (म्हणजेच १०० दश लक्षावर) राखणे म्हणजेच शेती विभागावर अधिक श्रमिकांचा बोजा वाढू न देणे हे असले पाहिजे. यासाठी श्रमिकांच्या संख्येत इथून पुढे होणारी वाढ बिगरशेती विभागात सामावून घेणे आवश्यक आहे. १९७१-८१ या दशकात लोकसंख्येत आणखी २५ टक्क्यांनी भर पडेल अशी अपेक्षा आहे. म्हणजे १९८१ मध्ये पुरुष श्रमिकांच्या संख्येत आणखी ३७.५ दश लक्षाची भर पडणार आहे. आज ५० दश लक्ष श्रमिकांना रोजगार देणाऱ्या शेती क्षेत्रात हे वाढीव श्रमिक सामावून घेण्यासाठी त्या क्षेत्रातील रोजगाराची दहा वर्षात ७५ टक्के म्हणजेच दरसाल ६.८ टक्के या प्रमाणात वाढ करावी लागेल. परंतु वर आपणच पाहिलेच आहे की बिगरशेती विभागातील फक्त संघटित क्षेत्रातच रोजगारवाढ होत आहे. असंघटित क्षेत्रात तर घटच झाली आहे. याचा अर्थ उघड आहे. नवीन ३७.५ दशलक्ष श्रमिकांची सोय तर या संघटित क्षेत्रात झालीच पाहिजे; एवढेच नव्हे तर असंघटित क्षेत्रातून बाहेर पडणाऱ्या २.५ दश लक्ष बेकार - श्रमिकांनाही त्याने सामावून घ्यायला हवे. आज संघटित क्षेत्रात फक्त २० दशलक्ष श्रमिकांस रोजगार मिळतो. त्यात नव्याने येणाऱ्या ४० दश लक्ष श्रमिकांना १९७१-८१ या काळात काम पुरविण्यासाठी त्या क्षेत्राचा या दहा वर्षांच्या काळात एकूण २०० टक्क्यांनी अगर दरसाल ११.६ टक्के एवढ्या वेगाने विकास व्हावा लागेल. औद्योगिक रोजगारवाढ

ही बिगरशेती क्षेत्रातील रोजगारवाढीचा पाया आहे असे मानल्यास औद्योगिक रोजगार दरसाल ११.६ टक्के एवढ्या वेगाने वाढणे अत्यावश्यक ठरते. हे घडणे अशक्य नाही. काही देशांनी ते करून दाखविले आहे. परंतु वर सांगितल्याप्रमाणे, आपण गेल्या दशकात दरसाल फक्त ३.६ टक्के इतकीच औद्योगिक रोजगारवाढ करू शकलो आहोत. आपल्या अर्थव्यवस्थेत आवश्यक असणारा आर्थिक विकास व प्रत्यक्षात आपण केलेला विकास यामधील तफावत ही इतकी मोठी आहे.

केवळ धडक योजनांच्या सहाय्याने ही परिस्थिती सुधारू शकणार नाही. तरीही अशा योजना ही आजची फॅशन बनली आहे. कारखान्यांनी आठवड्यातून सातही दिवस काम करावे, हीच अशीच एक धडक योजना कल्पना आहे. आज जे सहा दिवस काम चालते त्याऐवजी सात दिवस काम करण्याने उत्पादन आणि रोजगार १६.६६ टक्के (म्हणजे आवश्यक व प्रत्यक्ष विकास वेगांच्या तफावतीच्या दुप्पट वेगाने) वाढेल असे एक साधे गणित मांडले जाते. अन्नधान्याची कमतरता ७ टक्के असल्यास आपण आठवड्यातून फक्त एक जेवण टाकून तिच्यावर मात करू शकतो. जर ती यंदाप्रमाणे १५ टक्के असेल तर एकाऐवजी फक्त दोन जेवणे टाकली की काम भागेल अशी मागे एक सूचना करण्यात आली होती. त्याच धर्तीचे हे साधे आणि सोपे गणित आहे.

अशा धडक योजनांपेक्षा कोणत्याही अल्पकालीन उपाययोजना या कामी प्रभावी ठरतील. आजच्या परिस्थितीच्या संदर्भात, सात दिवसांचा आठवडा करणे यापेक्षा प्रचलित उत्पादनक्षमतेचा परिपूर्ण वापर करणे हा प्रमुख हेतू आहे. आजच्या उपलब्ध उत्पादनक्षमतेचा परिपूर्ण वापर करण्याचे उपाय वापरल्यास अल्प काळातच उत्पादन व रोजगारात, विशेष भांडवल गुंतवणूक न करताही, वाढ करता येईल अशी मुख्य कल्पना आहे. प्रस्थापित उत्पादनक्षमतेचा वापर अपुरा होण्याची करणे अनेक, तसेच गुंतागुंतीची आहेत. सोईसाठी आपण त्याचे दोन गट करू शकू : १) कारखान्यांतर्गत कारणे २) इतर बाह्य कारणे. कारखान्यांतर्गत यंत्रसामुग्री आणि संयंत्र (plant) यामध्ये असणारा असमतोल, त्यामुळे निर्माण होणारे अडसर हे कारखान्याच्या उत्पादनक्षमतेच्या अपुऱ्या वापराचे प्रमुख कारण आहे. अशा परिस्थितीत 'उत्पादन क्षमते'ची व्याख्या दुरुस्त करणे आवश्यक ठरते. परस्परसंबंधित यंत्रसमूहाची प्रत्येकाची अशी एक उत्पादनक्षमता असते. ज्याप्रमाणे साखळीची ताकद तिच्यातील सर्वांत दुबळ्या दुव्यावरून ठरते, तद्वतच कारखान्याची उत्पादनक्षमता ही अशा सर्व यंत्रसमूहांच्या कमाल उत्पादनक्षमतेऐवजी किमान उत्पादनक्षमतेच्या वरून ठरत असते.

एखाद्या यंत्राचा अपूर्ण वापर होत असेल तर तो वाढवण्यासाठी इतर यंत्रांची क्षमताही वाढवावी किंवा सुधारावी लागते. म्हणून आज उपलब्ध असलेल्या तथाकथित उत्पादनक्षमतेचा संपूर्ण वापर हा पूरक भांडवल गुंतवणूक केल्याशिवाय होणार नाही आणि अशी गुंतवणूक ही बहुधा बरीच मोठी असते. कारखान्याची यंत्रे, साधनसामुग्री व विशिष्ट कौशल्ये यांमध्ये असे असमतोल असण्याची कारणेही अनेक आहेत. त्यांतील काही प्रमुख कारणे म्हणजे, १) खाजगी व सार्वजनिक अशा दोन्ही क्षेत्रांतील कारखान्यांचे सदोष उत्पादन – नियोजन. २) उत्पादनाचे आकारमान व प्रमाण यांच्याशी विसंगत अशा उत्पादन तंत्राची निवड. ३) आवश्यकता नसतानाही केवळ मिळू शकतात या सबबीखाली केलेली महागड्या व आयात यंत्रसामुग्रीची खरेदी व उभारणी ही होत. असमतोल दूर करणे म्हणजे एक प्रकारे अशा सदोष उद्योगांची पुनर्रचना करण्यासारखेच आहे. परंतु आधीच सदोष का होईना परंतु केली गेलेली भांडवल गुंतवणूक वाया जाऊन देण्यासाठी हे करावेच लागेल. यासाठी करावी लागणारी जादा भांडवल गुंतवणूक अगदीच लहान असणार नाही. तसेच यासाठी तत्कालिक स्वरूपाचे उपाय योजून भागेल असे जे वाटते तेही खरे नाही.

कारखान्याच्या उत्पादनक्षमतेचा वापर पूर्णपणे न होण्यास जी बाह्य कारणे असतात, त्यात एक म्हणजे आवश्यक त्या आदानांची (Input) व सामुग्रीची (Supplies) टंचाई व दुसरे म्हणजे उत्पादित मालासाठी असणारा मागणीचा अभाव. आदानामध्ये कच्चा माल, इंधन व वाहतूक यांचा अंतर्भाव होतो. उत्पादित मालासाठी असणारी मागणी दोन प्रकारची असते. इतर कारखान्यांकडून येणारी मागणी आणि प्रत्यक्ष ग्राहकांकडील मागणी. यांपैकी दुसऱ्या प्रकारच्या मागणीचा विचार वेगळा करावा लागतो. परंतु एका बाजूला कच्चा माल, इंधन, शक्ती, वाहतूक इ. आदानांची असलेली टंचाई व दुसऱ्या बाजूला इतर कारखान्यांकडून उत्पादित मालासाठी येणाऱ्या मागणीची कमतरता असणे, ही विविध उद्योगधंद्यांच्या उत्पादनक्षमतांमधील विसंवादाचीच लक्षणे आहेत. जर एखाद्या उद्योगात आदानाची टंचाई भासत असेल तर त्याचा अर्थ अन्य कुठल्या तरी उद्योगात (यात शेतीही येते) उत्पादनक्षमता अपुरी आहे असा होतो. कारण हे इतर उद्योगच त्या विशिष्ट उद्योगासाठी आदाने पुरवीत असतात; त्याप्रमाणे एखाद्या उद्योगधंद्यास, इतर उद्योगधंद्यांकडून येणाऱ्या मागणींची कमतरता भासते; याचाच अर्थ, ज्या अन्य उद्योगधंद्यास हा उद्योग आपला तयार माल 'आदान' म्हणून पुरवतो, त्या दुसऱ्या उद्योगांच्या उत्पादनक्षमता तुलनेने अपुऱ्या असतात, असा होतो. विविध उद्योगांच्या उत्पादनक्षमतांमधील असमतोल दूर करणे

सोपे नाही आणि तत्कालिक उपाय योजून ते जमणारही नाही. परंतु मुळातच उत्पादनक्षमता मर्यादित असलेल्या अर्थव्यवस्थेतील अशा प्रकारचे असमतोल व त्यातून निर्माण होणारा उत्पादनक्षमतेचा अपव्यय ही गंभीर बाब आहे हे निश्चित. आपण याचा विचार पुढे करणारच आहोत.

उपभोक्त्यांकडून मागणी कमी येणे हेही काही उद्योगधंद्यातील उत्पादनक्षमता पुरी वापरली न जाण्याचे कारण असते. इथेच खरा विरोधाभास आहे. एकीकडे अपुऱ्या उत्पादनामुळे उपभोक्त्यांची मागणी पुरविली जात नाही, तर त्याच वेळी दुसऱ्या उद्योगांकडून मागणी अभावी उत्पादनक्षमता अपुरी वापरली जाते. आपल्या अर्थव्यवस्थेतील असमतोलाचे हे दुसरे ठळक उदाहरण आहे. परंतु आता हा असमतोल भिन्न उद्योगांच्या उत्पादनक्षमतेमधील नाही; तर ग्राहकांच्या उपभोग्य मालाच्या गरजा व उद्योगातील प्रचलित उत्पादनक्षमता यामधील आहे. हा असमतोल तर विविध कारखान्यांतर्गत असणाऱ्या असमतोलापेक्षा अधिक गंभीर स्वरूपाचा असून तो कोणत्याही अल्पकालीन उपायांनी दुरुस्त होणारा नाही. याचाही विचार आपण पुढे करू.

उत्पादनक्षमतेचा अपुरा वापर होण्याचे आणखी एक कारण सांगितले जाते, ते म्हणजे 'औद्योगिक अशांतता' हे होय. कामगारांस शिस्त लावून औद्योगिक अशांतता कमी करण्यासाठी त्वरित कारवाई करावी अशी यासाठी सूचना केली जाते. अर्थात हा उपाय अल्पकालीन की दीर्घकालीन म्हणून सुचविला जातो हे सांगणे कठीण आहे. आपल्या देशात मालक वर्ग कामगारांच्या तुलनेने प्रबळ आहे व जोपर्यंत बेकारांची सेना सहज उपलब्ध आहे तोपर्यंत तो तसाच रहाणार आहे. बेकारी सतत वाढत असताही औद्योगिक कामगार अधिकाधिक संघटित होत असून मालक-वर्गाबरोबरील स्वतःची सौदाशक्ती सुधारीत आहेत. औद्योगिक क्षेत्रात होणारे वाढीव उत्पादन, मालक आणि श्रमिक यांमध्ये म्हणजेच नफा न वेतन यामध्ये कसे वाटले जावे याबद्दल हा खरा झगडा आहे. सनातनी अर्थाने हा 'वर्गकलह' असून एका बाजूला संयोजक, भांडवलदार, उच्च प्रतीचे कुशल कामगार व व्यवसाय संचालक; तर विरुद्धपक्षी कामगार असे हे झगडणारे वर्ग आहेत. एक युक्तिवाद नेहमी केला जातो की संयोजकांस रास्त नफा, भांडवलदारास रास्त व्याज व लाभांश, संचालकास रास्त वेतन, भत्ते आणि इतर सोयी सवलती उपलब्ध झाल्याशिवाय त्यांच्यामध्ये अधिक उत्पादनासाठी प्रेरणा उरणार नाही. मी मान्य करतो की हे खरेही आहे. परंतु त्याचबरोबर श्रमिकांना योग्य मजुरी मिळाल्याशिवाय त्यांच्यामध्येही उत्पादनवाढीची

प्रेरणा निर्माण होणार नाही, हेही खरे आहे. 'रास्त' मोबदला कोणता याबाबत उभयपक्षी मतैक्य होत नाही, ही खरी अडचण आहे. औद्योगिक क्षेत्रात निर्माण होणाऱ्या एकूण उत्पादनापेक्षाही प्रत्येक वर्गास 'रास्त' वाटणाऱ्या मोबदल्यांची गोळाबेरीज अधिक होते आणि त्यातूनच सर्व झगडा निर्माण होतो. अशा परिस्थितीत वर्गकलहाने औद्योगिक उत्पादनावर विपरीत परिणाम होतो हे उघड आहे. दोन्हीही पक्ष उत्पादन पूर्णतः थांबवू शकत नसले तरी कमी करण्यास समर्थ आहेत आणि ते, याचा एकंदर अर्थव्यवस्थेवर व प्रचंड संख्येने असणाऱ्या बेकारांवर काय परिणाम होईल याची तमा न बाळगता असे करीत असल्याचे दिसून येते. आजच्या अवघड परिस्थितीत हा वर्गकलह आपणास परवडण्यासारखा नाहीं हे निःसंशय; पण आर्थिक स्वातंत्र्याच्या व्यासपीठावर हा झगडा कसा मिटवावा हेही अगम्य आहे. मुक्त आर्थिक स्वातंत्र्य हे संयोजक भांडवलदार यांच्यापुरतेच मर्यादित ठेवून चालणार नाही; तर यात कामगारांचाही समावेश झाला पाहिजे. ही समाधानाची बाब आहे की आपल्याला वाटते त्यापेक्षाही मुक्त स्वातंत्र्याचा वापर मालकापेक्षा कामगार व त्यांच्या संघटनाच आज अधिक करत आहेत. सामूहिक सौदा हा अशा स्वातंत्र्याच्या वापराचा एक भाग आहे. त्यामुळे औद्योगिक अशांततेचा सर्व दोष कामगारांच्या माथ्यावर मारता येणार नाही. हा हितसंबंधांचा संघर्ष असून त्याची सोडवणूक मुक्त आर्थिक स्वातंत्र्याने होऊ शकणार नाही.

हा प्रश्न वर उपस्थित केलेल्या एकंदर आर्थिक असमतोलाशी संबंधित असा असून त्याचा विचार आपण नंतर करू. या मुद्यापुरते बोलायचे म्हणजे, आजच्या उत्पादनक्षमता परिपूर्णतेने वापरून उत्पादन आणि रोजगार वाढविण्याच्या कोणत्याही धडक अगर तत्कालीक उपाय योजण्यास माझा तात्त्विक विरोध बिलकूल नाही. फक्त त्या व्यवहार्य असल्या म्हणजे झाले. परंतु वर दाखविल्याप्रमाणे अशा उपाययोजनांमुळे बरेच काही साधेल असे नाही. उलटपक्षी तत्कालीक उपायावरच आपण अतिरिक्त लक्ष केंद्रित केल्यास (आणि असे होण्याचा संभव आहे) अर्थव्यवस्थेत निर्माण झालेल्या मूलभूत असमतोलाकडे (म्हणजे विविध उद्योगातील उत्पादनक्षमता व एकूण उपभोगाची गरज आणि उपलब्ध उत्पादनक्षमता यामधील असमतोल) दुर्लक्ष होण्याची भीती आहे.

अधिक मूलभूत प्रश्नांकडे वळण्यापूर्वी बेकारीविषयक प्रचलित विचारातील एका प्रवृत्तीचा उल्लेख करावासा वाटतो. वर आपण पाहिले की १९६१-७१ मध्ये संघटित औद्योगिक क्षेत्रातील रोजगार ४३.६ टक्क्यांनी वाढला. परंतु त्यांच काळात

औद्योगिक उत्पादन मात्र ७५ टक्क्यांनी वाढले. साहजिकच औद्योगिक उत्पादन सुमारे ७५ टक्क्यांनी वाढले असता औद्योगिक रोजगार केवळ ४३.६ टक्क्यांनीच का व कसा वाढला असा प्रश्न निर्माण होतो. उत्पादनवाढ आणि रोजगारवाढ यांतील या विसंगतीबाबत मीही बुचकळ्यात पडलो आहे आणि उद्योगनिहाय उत्पादन आणि रोजगारविषयक माहितीची छाननी केल्याशिवाय याबाबत कारणमीमांसा करणे कठीण आहे, हे कबूल करावे लागते. मात्र सकृत्‌दर्शनी दोन कारणे संभवतात. एक तर औद्योगिक उत्पादन घटकांचे संमिश्रण तरी बदलले असावे आणि या बदललेल्या संमिश्रणात रोजगारास पूर्वीपेक्षा वाव कमी असावा. कदाचित, उद्योगांतर्गत उत्पादनाचे तंत्रच बदललेले असावे. कारण अलीकडे पूर्वीपेक्षा कमी श्रमप्रधान तंत्राचा अवलंब होत असल्याचे दिसून येते. ही दोन्ही कारणे संभवनीय आहेत. परंतु केवळ दहा वर्षांच्या काळात औद्योगिक उत्पादन घटकांचे संमिश्रण आणि तंत्र यांमध्ये आणि परिणामी उत्पादनवाढ आणि रोजगार यामध्ये एवढा मोठा फरक पाडणारे बदल झाले किंवा कसे याबाबत मी साशंक आहे. परंतु हे असे बदल झाले असे चर्चेसाठी गृहीत धरू या.

अशा परिस्थितीत असे सुचविण्यात येते की औद्योगिक उत्पादनाचे योग्य संमिश्रण व योग्य उत्पादन तंत्र अगर तंत्र मिश्रणाचा अवलंब केला गेला तर १९६१-१९७१ या काळात गुंतविल्या गेलेल्या भांडवलाच्या सहाय्याने औद्योगिक रोजगार वाढविता आला असता. जर औद्योगिक उत्पादनाचे संमिश्रण आणि उत्पादन तंत्र यातील बदलामुळेच फक्त रोजगारक्षमता घटली असेल तर योग्य उत्पादन संमिश्रण व उत्पादनतंत्राच्या निवडीने रोजगारक्षमता वाढविणे सहज शक्य होते. म्हणूनच या मुद्याची अधिक छाननी करणे आवश्यक आहे.

योग्य उत्पादन - संमिश्रणाची निवड म्हणजे सिमेंट, लोह, साखर, कागद, वस्त्र इत्यादी परस्पर उद्योगांमधून करावयाची निवड आहे. अशी निवड कशी करावी? आजच्या (बेकारीच्या) परिस्थितीत, ज्या द्वारे रोजगारवाढ सर्वोच्च होईल, तीच निवड योग्य होय असे याबाबत सांगितले जाते. विविध उद्योगांची रोजगार - निर्मितिक्षमता, त्यांच्या भांडवल-श्रम गुणोत्तरावरून म्हणजेच एका व्यक्तीस रोजगार देण्यास लागणाऱ्या भांडवलावरून ठरते. उदा. साखर व्यवसायात, सिमेंटशी तुलना करता दरमाणशी भांडवलाची गरज कमी असेल तर सिमेंटपेक्षा साखर अधिक निर्माण करावी असा याचा सरळ अर्थ होतो. रोजगारप्राधान्य असणारे ओद्योगिक धोरण असे याला म्हणतात. परंतु प्रत्यक्षात प्रसंगी दरडोई भांडवल तुलनेने जास्त

लागणारे परंतु आवश्यक असे उद्योग असतात. या धोरणाप्रमाणे प्रत्येक उद्योगधंद्याचा विचार फक्त रोजगारनिर्मितीच्या कसोटीवर करावा लागेल. अडचणीतून पळवाट म्हणून उद्योगाची फक्त प्रत्यक्ष रोजगारनिर्मितिक्षमता न पाहता अप्रत्यक्ष रोजगारनिर्मितिक्षमताही विचारात घ्यावी असे सुचविले जाते. म्हणजे विशिष्ट उद्योग ज्या इतर उद्योगाशी संबंधित आहे, इतर उद्योगांचा तयार माल आपला कच्चा माल म्हणून वापर करतो अगर आपला तयार माल त्यास कच्चा माल म्हणून देतो अशा सर्व उद्योगांमध्ये निर्माण होणाऱ्या संकल्पित रोजगारांचा अंतर्भाव करावा, असा हा प्रस्ताव आहे. परंतु यामुळे अशी वेळ येईल की प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मितीच्या निकषावर जवळ जवळ प्रत्येकच उद्योगास प्राधान्य द्यावे लागेल. त्यांमुळे एकंदर विचार करता या म्हणण्यात काही अर्थ नाही; कारण जवळ जवळ प्रत्येक उद्योग अन्य उद्योगांशी अशा प्रकारे संबंधित असतो आणि यातून कोणताही एक उद्योग १ टक्का प्रत्यक्ष आणि ९९ टक्के अप्रत्यक्ष रोजगार निर्माण करून राष्ट्रातील संपूर्ण रोजगारास कारणीभूत ठरतो असे दाखविता येईल. खरे असे आहे, रोजगार निर्मितिक्षमतेचा हा निकष उद्योग - संमिश्रण निवडीस निरुपयोगी ठरतो; कारण उद्योगधंद्याचे प्रयोजन फक्त रोजगार पुरविणे हेच नसून लोकांच्या तत्कालीक आणि भविष्यकालीन गरजा भागविणे हे असते आणि या गरजा स्वतंत्रपणे ठरत असतात.

उद्योगधंद्यासाठी उत्पादनतंत्राची निवड ही अधिक गुंतागुंतीची समस्या आहे. प्रत्येक उद्योगात श्रमप्रधान तंत्राचा अवलंब केला असता तर आपण जेवढे भांडवल गुंतविले आहे त्याच्याच सहाय्याने अधिक रोजगार निर्माण करता आला असता हे विधान शब्दार्थाने खरे आहे. कारण जे काम एक कामगार करतो त्यासाठी दोन माणसे लावल्यास रोजगार वाढेल हे उघड आहे. परंतु असे करण्यात एक धोका संभवतो; तो असा की यातून प्रत्येकास सकाळपासून संध्याकाळपर्यंत आठवड्याचे सातही दिवस आणि सतत वर्षभर राबवून देखील प्रत्येकास किमान जीवनमान लाभणे शक्य होणार नाही व एकूण अर्थव्यवस्था एका कनिष्ठ पातळीवर घसरून आर्थिक हलाखी दिवसेंदिवस वाढतच जाईल. प्रत्येक देशात विशिष्ट उत्पादन तंत्रास युक्त असे भांडवल व श्रम यांचे परस्परप्रमाण उपलब्ध असते हे विधान तितकेसे बरोबर नाही. कारण एक म्हणजे श्रम व भांडवल हे उत्पादन घटक एका उद्योगातून दुसऱ्यात व भिन्न उद्योगातून परस्परांऐवजी पर्यायी म्हणून वापरले अगर विभागले जाऊ शकतील असे व एकजिनसी घटक नाहीत. तसे ते आहेत असे मानले तरीही सर्व उद्योगातून एका श्रमिकापोटी समान भांडवलाचा वापर झाला की

पर्याप्त वापराचा प्रश्न सुटला असेही होत नाही. प्रत्येक उद्योगात व एकाच उद्योगामध्ये विविध उत्पादनस्तरांवर श्रम आणि भांडवल यांच्या पर्याप्तेच्या प्रमाणात भिन्नता असते व पर्याप्तेचे हे भिन्न दर लक्षात घेऊनच विविध उद्योगातील जादा भांडवल गुंतवणूक ठरवावी लागते. तसेच विशिष्ट वेळी, विशिष्ट उद्योगात एकच एक उत्पादनतंत्र वापरात असते हेही खरे नाही.

श्रमभांडवलाच्या भिन्न प्रमाणांचा अंतर्भाव असणारी, भिन्न उत्पादनतंत्रावर अधिष्ठित, विविध प्रकारची यंत्रसामुग्री एकाच वेळी वापरात असल्याचे दिसून येते व अशा जुनाट अगर कमी कार्यक्षम उत्पादनतंत्र वापरणाऱ्या उद्योगसंस्था श्रम भांडवलावर कमी मोबदले घेऊनही टिकून असल्याचे दिसते. ही प्रचलित उत्पादनतंत्रे व श्रमभांडवलासाठी मिळणारे भिन्न मोबदले विचारात घेऊन नवीन भांडवल गुंतवणूक करावी लागते. अशा प्रकारच्या परिस्थितीत श्रमशक्ती आणि भांडवलास मान्य न होण्याइतके कमी मोबदले निर्माण करणारे तंत्र रूढ करणे व टिकवून धरणे शक्य नसते व तसे करावयाचे झाले तर प्रचंड आर्थिक सहाय्याचा टेकू देऊनच ते करावे लागेल.

वरील सर्व विवेचनावरून हा प्रश्न किती गुंतागुंतीचा आहे याची सहज कल्पना येते. रोजगारवाढ व्हावी व प्रत्येकास काम दिले जावे हा दृष्टिकोन श्रमप्रधान उत्पादनतंत्राचा आग्रह धरणारांचा असतो आणि उत्पादनतंत्राची निवड गुंतागुंतीची आहे एवढ्याच कारणासाठी रोजगारवृद्धीकडे दुर्लक्ष करणेहि योग्य ठरणार नाही. परंतु फक्त श्रमप्रधान उत्पादनतंत्राचा अवलंब ही सर्वास रोजगार पुरविण्याची गुरुकिल्ली नव्हे. 'मागेल त्याला काम' हे एक स्वतंत्र मूल्य आहे आणि त्याची चर्चा, मान्यता, अंमल इ. विषय स्वतंत्रतणे हाताळले पाहिजेत.

आपण यामुळेच रोजगार प्रश्नाच्या अधिक मूलभूत अंगाचा विचार केला पाहिजे. त्यासाठी सुरुवातीस उद्योगांची संमिश्र रचनेची निवड किंवा उत्पादनाची रचना यांच्या प्रश्नापासून पाहू या. आर्थिक नियोजनाच्या परिभाषेत विविध वस्तूंचे उत्पादन उद्दिष्ट निश्चित करण्याचा हा प्रयत्न आहे. ही उद्दिष्टे ठरविताना जनतेच्या वर्तमान व भविष्य काळातील उपभोगाच्या गरजा हा आधार मानण्यात आला पाहिजे. परंतु नियोजन मंडळ ही उद्दिष्टे कसे ठरविते? प्रथम वस्तूंच्या चालू उपभोगाचा अंदाज घेण्यात येतो; नंतर त्यावरून भविष्यकाळात दरडोई राष्ट्रीय उत्पन्नात जी वाढ होणे संभवनीय असते, त्यायोगे उपभोगात होणारी वाढ ठरविण्यात येते. अशा दोन्ही अंदाजांनुसार भविष्यकालीन उपभोग गरजांचे अंदाज व उद्दिष्टे ठरविली जातात. आता परिस्थिती बदलली आहे आणि गरिबांच्या हितास प्राधान्य द्यावयाचे असल्याने

राष्ट्रीय उपभोगाचे अंदाज व उत्पादन उद्दिष्टे वरील पद्धतीने न ठरवता प्रत्येकास किमान राष्ट्रीय उपभोग पातळीइतका उपभोग मिळेलच हा निकष मानून ठरविले गेले पाहिजे. हे तत्त्व म्हणून मान्य केल्यास आपल्या साधनसंपत्तीचा विनियोग प्रत्येकास उपभोगाची किमान राष्ट्रीय पातळी शक्यतो लवकर गाठता येईल इतकेच नव्हे तर ही किमान पातळीहि शक्यतो त्वरेने उंचवण्याची क्षमता निर्माण होईल, अशा तऱ्हेने केला पाहिजे. यातून राष्ट्रीय साधनसामुग्रीच्या विविध उद्योगांतील वाटपासाठी निवड करताना भांडवलश्रम गुणोत्तर सर्व उद्योगांत समान होईल अगर श्रमप्रधान उत्पादनतंत्राचा अवलंब प्रत्येक उद्योगात होईल असे नाही. उपभोगाचे वरील उद्दिष्ट गाठण्यासाठी काही भांडवल-श्रम गुणोत्तर मोठे असणारे व भांडवलप्रधान उद्योग, तर काही भांडवल-श्रम गुणोत्तर कमी असणारे श्रमप्रधान उद्योग अशी संमिश्र निवड करावी लागेल. उत्पादनतंत्राची सरमिसळ उद्दिष्टांशी सुसंगत अशीच ठरवावी लागेल.

आवश्यक वस्तूंच्या निर्मितीचे वरीलप्रमाणे नियोजन केले की किमान आवश्यक वस्तू आपोआपच मिळतील अशी हमी मात्र देता येणार नाही. हे साध्य करण्यासाठी राष्ट्रातील एकूण खर्चाचा आपणास दोन भागांत विचार करावा लागेल.

अ) खाजगी खर्च म्हणजे खाजगी उपभोक्त्याचा खर्च व खाजगी भांडवल गुंतवणूक.

ब) सामाजिक खर्च म्हणज शासकीय उपभोग खर्च व सामाजिक भांडवल गुंतवणूक.

खाजगी खर्च खाजगी अगर व्यक्तिगत उत्पन्नातून होतो. दिलेल्या उत्पन्नातून उपभोक्ते आपणाला आवश्यक त्या गोष्टी बाजारातून अगर शासकीय वाटपव्यवस्थेतून रूढ किमतीनुसार खरेदी करीत असतात. उत्पन्न व किंमती यांच्या आधारे उपभोक्ता एकूण उपभोग किती घ्यावयाचा, कोणत्या वस्तू किती विकत घ्यायच्या व (बचत) गुंतवणूक किती करायची याचे निर्णय घेत असतो. राष्ट्रीय किमान उपभोगाच्या वस्तू खरेदी करता येतील इतके किमान उत्पन्न प्रत्येकास मिळवून देण्यापलिकडे या क्षेत्रात फारसे काही करता येणार नाही. यामुळे किमान उपभोगाची हमी देणे याचा अर्थ प्रचलित किंमतीला किमान उपभोगाच्या वस्तू इच्छा असल्यास विकत घेता येतील इतके किमान उत्पन्न उपलब्ध करून देणे असाच होतो. इतके उत्पन्न मिळूनहि काही लोकांनी ते वाटेल तसे उधळले तर याबाबतीत फारसे काही करता येणार नाही. 'ग्राहक हाच सार्वभौम असतो' असे जे म्हटले जाते ते याच अर्थाने होय!

शासकीय अगर सामाजिक खर्चाची आवश्यकता दोन कारणांनी उद्‌भवते. काही आवश्यक सोयीवरील खर्च (उदा. रस्ते, दळणवळण, संरक्षण इ.) करण्यास खाजगी व्यक्ती पुढे येणार नाहीत. म्हणून त्यांचे सामाजीकरण अपरिहार्य ठरते. दुसरे म्हणजे

शिक्षण, सार्वजनिक आरोग्य इत्यादी आवश्यक गोष्टींसाठी खर्च करण्याची क्षमता असली तरीही खाजगी व्यक्ती पुढे येत नाही व मग तो खर्च शासनालाच करावा लागतो. अशा सामाजिक खर्चासाठी लागणारा सामाजिक निधी हा खाजगी व्यक्तींच्या उत्पन्नातूनच उभा करावा लागतो. किमान उपभोगासाठी आवश्यक अशा निवडक वस्तुंच्या उत्पादनाची क्षमता उपलब्ध असली तरी त्यांचे उत्पादन होणे व उपभोग घेतला जाणे हे दोन गोष्टींवर निर्धारित असते. पहिली गोष्ट म्हणजे, व्यक्तिगत उत्पन्नातील काही भाग सामाजिक उपभोगावरील खर्चासाठी वळवला पाहिजे; दुसरे म्हणजे कर इ. वजा जाता उरणाऱ्या व्यक्तिगत उत्पन्नाचे वाटपसुद्धा असे असावे की किमान राष्ट्रीय उपभोगाच्या वस्तू विकत घेण्याइतके किमान उत्पन्न प्रत्येकाकडे उपलब्ध असेल. या दोन गोष्टींची जर पूर्तता झाली नाही तर उत्पादनाची साधने व उत्पादनक्षमता असूनहि नियोजित उत्पादन होऊ शकणार नाही. माझ्या मतानुसार आपल्या येथे आतापर्यंत हेच घडत आले आहे. आपल्या देशातील उत्पादन हे नियोजन, नियंत्रण याद्वारे अपेक्षित व्हावे यावर आपल्या आर्थिक नियोजनात अतिरिक्त भर दिला गेला. याउलट जे उत्पादन होत होते अगर होणे शक्य होते त्याचा उपभोग होणे शक्य आहे की नाही याकडे जवळजवळ दुर्लक्षच केले गेले. अशा प्रकारे उत्पादन नियोजनास प्रभावी मागणीचे संतुलन न मिळाल्यामुळे प्रत्यक्ष उत्पादन नियोजकास अभिप्रेत उत्पादनापासून भिन्न स्वरूपाचे झाले. अशा स्थितीत प्रत्यक्ष उत्पादन बाजारपेठ मागणीनुसार होते आणि ते तसे होणे अपरिहार्यच असते. उत्पादनाचे नियोजन, नियंत्रण इत्यादीमुळे उत्पादनाचे स्वाभाविक प्रवाहात अडथळे निर्माण होतात आणि तरीहि उत्पादन चालूच रहाते आणि या अडथळ्यामुळे उद्‌भवणारे खर्च व इतर दुष्परिणाम मात्र समाजाचे माथी मारले जातात. उत्पादन संमिश्रण विपरीत बनते. उत्पादनतंत्राची निवडहि अर्थव्यवस्थेत एक 'लहानसा मर्यादित जास्त उत्पन्न विभाग' निर्माण करण्याच्या हेतूने केली जाते. अर्थव्यवस्थेतील एकंदर औद्योगिक उत्पादन या विभागाच्या वाढत्या उत्पन्न व गरजांचे अनुषंगाने होते. आज आपला संघटित औद्योगिक विभाग याच प्रकारचा आहे. संयोजक, भांडवलदार, व्यवस्थापक व कामगार संघटनांचे नेतृत्वाखालील कामगार हे या वर्गाचे घटक असून एकूण श्रमिकांच्या फक्त सुमारे १० टक्के इतक्यांचाच त्यात समावेश आहे. एकंदर अर्थव्यवस्थेवर त्याची जबरदस्त पकड असून, आपल्या मक्तेदारी सत्तेचा वापर स्वतःच्या लाभासाठी हे लोक निर्दयपणे करीत आहेत. समाजवादी नियोजनामुळे या त्यांच्या कृत्यास सहाय्य होते. हा एक वर्गविग्रह आहे आणि औद्योगिक कामगार हे

समाजवादी मार्गाने वाटचाल करीत आहेत असे हे बाह्यतः दर्शवितात; परंतु वस्तुस्थिती अशी आहे की राजकारणी मंडळींनी मदत केलेला एक लहानसा संघटित गट इतर बहुसंख्य असंघटित वर्गास वगळून आपलाच स्वार्थ साधण्यात गर्क आहे.

याउलट राष्ट्रीयदृष्ट्या योग्य अशा उपभोगासाठी प्रभावी मागणी निर्माण करण्यात आली, तर उत्पादन आपोआपच त्या मागणीशी सुसंगत असे होईल. हे घडण्यासाठी प्रत्येकाला किमान उत्पन्नाची हमी निर्माण होणे आवश्यक आहे. याच आधारावर पूर्ण रोजगाराचा विचार करावा लागतो. कारण किमान उत्पन्नाची हमी निर्माण करावयाची असेल तर ती उत्पादक रोजगाराच्या आधारेच करावी लागेल. या 'पूर्ण रोजगार' उद्दिष्टामुळे कमाल उत्पादन पातळी गाठता येईल व उत्पादनक्षमतेचा परिपूर्ण वापर होईल; इतकेच नव्हे तर एकूण उत्पादनही अपेक्षित पद्धतीने होईल! आवश्यक ती प्रभावी मागणी एकदा निर्माण झाली की उत्पादन बाजारातील मागणीप्रमाणे किंवा पूर्ण स्वातंत्र्याच्या पद्धतीने होऊ शकेल. अशा परिस्थितीत उत्पादन नियोजन व उत्पादनतंत्राची निवड या फक्त तांत्रिक गोष्टी राहातील. अशा परिस्थितीत संयोजक व व्यवस्थापक वर्ग उत्पादनासंबंधी विचार नोकरशहा आणि राजकारणी लोकांपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे करू शकतील. म्हणून शासनाने आपले लक्ष राष्ट्रीयदृष्ट्या आवश्यक उपभोगासाठी जरूर ती प्रभावी मागणी निर्माण करण्यावर व त्यासाठी व्यक्तिगत उत्पन्नातील आवश्यक तो भाग ताब्यात घेऊन सामाजिक उपभोगाची सोय करण्याकरता व उत्पादक रोजगारामार्फत प्रत्येकाला किमान उत्पन्न उपलब्ध करून देण्यावर केंद्रित करावे. हे घडून येण्यासाठी श्रमिक वर्गांपैकी फक्त दहा टक्के श्रमिकास आश्रय देणाऱ्या छोट्या संघटित विभागाने काही काळापुरते तरी आपले राहाणीमानात थोडीशी घस सोसण्याची, म्हणजेच संयोजक भांडवलदारांनी आजच्या तुलनेने कमी नफा, व्यवस्थापकांनी कमी पगार (संघटित), श्रमिकाने कमी वेतन स्वीकारण्याची आवश्यकता आहे. असे घडून आल्यास उत्पादनाचे स्वातंत्र्य उत्पादकांना बहाल करावे व नोकरशहा व राजकारण यांच्या हस्तक्षेपापासून व पिळवणुकीपासून उत्पादक मुक्त असावे असा मीही आग्रह धरीन!

*(पूर्वप्रसिद्धी : ज्ञानविलास प्रकाशन, ठाणे. अर्थशास्त्रमाला-८, मे १९७५)*

*(टीप : शुद्धलेखन मूळ लेखाबरहुकूम)*

# पुरवणी

## दीक्षान्त भाषण

**माननीय कुलगुरू, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाते,**
**प्राध्यापक, अध्यापक, व इतर विद्वज्जन आणि स्नातकहो,**

सर्व प्रथम मी सर्व स्नातकांचे अभिनंदन करून, त्यांस आशीर्वाद देऊन, त्यांना भावी आयुष्यात सुयश चिंतितो. या दीक्षांत समारंभाचे निमित्ताने आजच्या महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षणासंबंधी अनेक विचार मनात येतात. त्यांतील काही आपणांसमोर मांडण्याचे धाडस मी करणार आहे.

आज महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांत मिळून साडेतीन लक्षांहून अधिक विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेत आहेत. पैकी सुमारे २५,००० विधिशाखेत, २०,००० वैद्यकीय शाखेत, १२,००० अभियांत्रिकी व तांत्रिक शाखेत, ६,००० शेती व पशुवैद्यक शाखेत, ३,००० व्यवसायव्यवस्थापन शाखेत, २,००० ललितकला शाखेत आणि सुमारे ५,००० इतर व्यावसायिक विद्याशाखांतून शिक्षण घेत आहेत. या व्यावसायिक शिक्षणाची उद्दिष्टे सुस्पष्ट आहेत आणि स्थूलमानाने त्यानुसार त्यांचे अभ्यासक्रम आखलेले आहेत. या शिक्षणाची उद्दिष्टे विद्यार्थीवर्गासही स्पष्ट आहेत. त्यामुळेच या विद्याशाखांत प्रवेशाकरता ते धडपडतात. परंतु या शिक्षणाच्या सोयी मर्यादित असल्याने सर्वांस प्रवेश मिळत नाही. यांपैकी विधिशाखा सोडल्यास बाकीचे बहुतेक व्यावसायिक शिक्षण कमीअधिक खर्चाचे असल्याने या शिक्षणाची समाजास जेवढी गरज तेवढ्याच प्रमाणात त्याचा विस्तार करावा आणि बाकीच्या विद्यार्थ्यांकरिता बऱ्याच कमी खर्चाचे असे कला, शास्त्र व वाणिज्य या शाखांतील शिक्षण उपलब्ध करून द्यावे असे आजचे धोरण आहे. परिणामी, कला, शास्त्र व वाणिज्य या शाखांचे शिक्षण देणारी चारशेहून अधिक महाविद्यालये आज महाराष्ट्रात आहेत आणि त्यात सुमारे २,७०,००० विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेत आहेत.

कला, शास्त्र व वाणिज्य या शाखांपैकी वाणिज्यशाखेतील शिक्षणाचे उद्दिष्टही बरेचसे स्पष्ट आहे आणि स्थूलमानाने त्यानुसार त्याचे अभ्यासक्रमही आखलेले आहेत. म्हणूनच व्यावसायिक शिक्षणशाखांत प्रवेश न मिळालेल्या उर्वरित विद्यार्थ्यांचा वाणिज्य शाखेकडे ओढा असतो. कला, शास्त्र व वाणिज्य या तीन शाखांत शिक्षण घेणाऱ्या २,७०,००० विद्यार्थ्यांपैकी सुमारे निम्मे विद्यार्थी वाणिज्यशाखेत आणि निम्मे कला व शास्त्र या शाखांत आहेत. महाविद्यालयातील या विद्यार्थ्यांखेरीज विद्यापीठातील कला व शास्त्र शाखांत सुमारे १५,००० विद्यार्थी आहेत. तात्पर्य, कला व शास्त्र या दोन शाखांत आज सुमारे १,५०,००० विद्यार्थी आहेत. त्यांपैकी सुमारे ९०,००० कला शाखेत आणि ६०,००० शास्त्रशाखेत आहेत.

या दोनही शाखांतील शिक्षणाचे उद्दिष्ट त्यात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना तर ज्ञात नाहीच परंतु हे विषय शिकविणारे प्राध्यापक व इतर शिक्षणतज्ज्ञ यांनाही स्पष्ट आहे असे दिसत नाही. या शाखांतील पदव्युत्तर अभ्यासक्रम पाहिले म्हणजे त्या त्या विषयांतील अद्ययावत ज्ञान आत्मसात केलेले जिज्ञासू, विद्याव्यासंगी प्राध्यापक व संशोधक निर्माण करून या विद्याशाखांतील ज्ञानांत (मौलिक भर घालणे हे या शाखांतील शिक्षणाचे उद्दिष्ट असावे असे वाटते. एका अर्थी ते योग्यही आहे. कारण ज्ञानविज्ञानाच्या या शाखाच सर्व व्यावहारिक, व्यावसायिक व तांत्रिक जीवनोपयोगी शिक्षणाला मूलभूत आहेत. कला व शास्त्र या शाखांतील शिक्षण त्या अर्थाने लगोलग जीवनोपयोगी नाही. ते तसे नाही याविषयी कोणासच संदेह नाही. संकोचही नाही. किंबहुना ते तसे जीवनोपयोगी असण्याचे कारण नाही असेच या क्षेत्रांतील शिक्षणतज्ज्ञ मानतात. म्हणूनच या शाखांतील अभ्यासक्रम आखताना हे शिक्षण विद्यार्थ्यांना जीवनोपयोगी ठरणार नाही याविषयी खबरदारी घेतलेली दिसते. परंतु हे शिक्षण घेऊन ज्ञानविज्ञानाच्या भांडारात आपण काही मौलिक भर घालू अशी ईर्षा बाळगणारे, जिज्ञासू, विद्याव्यासंगी, प्राध्यापक व संशोधक हाताच्या बोटावर मोजण्या एवढेही या शिक्षणातून निर्माण होत नाहीत. म्हणूनच या शिक्षणाचे उद्दिष्ट काय आहे असा प्रश्न उपस्थित होतो. आज या शाखांतील बहुसंख्य स्नातकांच्या मनात हा प्रश्न उभा आहे.

कला व शास्त्र या विद्याशाखाच सर्व जीवनोपयोगी शिक्षणास मूलभूत असल्याने या शाखांच्या ज्ञानभांडारात मौलिक भर घालू शकतील असे प्राध्यापक व संशोधक निर्माण करणे हे या शाखांतील शिक्षणाचे उद्दिष्ट असावे हे खरे. परंतु म्हणून या शाखांत शिक्षण घेणाऱ्या साऱ्या दीड लक्ष विद्यार्थ्यांना या उद्दिष्टाने शिक्षण देणे हे त्यातील बहुसंख्य विद्यार्थ्यांना तर उपयुक्त नाहीच परंतु या विद्याशाखांनाही हानीकारक

आहे. बहुसंख्य विद्यार्थ्यांना लगोलग उपयुक्त असे जीवनोपयोगी शिक्षण दिलेच पाहिजे आणि त्याचबरोबर या विद्याशाखांच्या ज्ञानांत भर घालून त्यांची प्रगती करू शकतील असे मोजकेच का होईना पण काही विद्याव्यासंगी प्राध्यापक संशोधक निर्माण झाले पाहिजेत. ही दोन उद्दिष्टे एकाच अभ्यासक्रमाने साधणार नाहीत. ती स्वतंत्र ठेवली पाहिजेत आणि त्यांना उपयुक्त व आवश्यक असे स्वतंत्र अभ्यासक्रम तयार केले पाहिजेत.

कला व शास्त्र या शाखांपैकी शास्त्रशाखेशी मी फारसा परिचित नाही, सबब मी माझे विवेचन कलाशाखेपुरतेच मर्यादित ठेवणार आहे. त्याला दुसरेही एक कारण आहे. शास्त्रशाखेतील शिक्षणाकरिता प्रयोगशाळा आवश्यक असतात. त्यामुळे ते शिक्षण बरेच अधिक खर्चाचे होते म्हणून त्यात प्रवेश मर्यादित असतो. त्याला दिवसाचा पूर्ण वेळही द्यावा लागतो. खेरीज हे विषय पुष्कळ विद्यार्थ्यांना अवघड वाटतात, इत्यादी कारणांनी या शाखेत प्रवेश घेणारे विद्यार्थी त्यातल्या त्यात आर्थिक व बौद्धिकदृष्ट्या बऱ्या कुवतीचे असतात. या उलट, थोडे अपवाद सोडल्यास इतरत्र कोणत्याही शाखांत प्रवेश न मिळालेले विद्यार्थी कलाशाखेत प्रवेश घेतात. या शाखेत प्रवेश घेणारा विद्यार्थी एका अर्थाने महाविद्यालयीन शिक्षणातील तळाचा गाळ आहे. म्हणून कलाशाखेतील शिक्षण या विद्यार्थ्यांना काहीतरी जीवनोपयोगी कसे होऊ शकेल याचा विचार करणे निकडीचे आहे.

कलाशाखेचे प्रामुख्याने दोन विभाग आहेत. एका विभागात सर्व भाषा येतात. त्यात अर्वाचीन व प्राचीन, देशी व विदेशी सर्व भाषा समाविष्ट आहेत. दुसऱ्या विभागात इतिहासादी मानव्य शास्त्रे आणि अर्थशास्त्रादि समाजविज्ञानशास्त्रे येतात. पदवी अभ्यासक्रमात हे सर्व विषय कमीअधिक प्रमाणात सरमिसळ येतात. त्यांपैकी एखाद्या विषयात विद्यार्थ्यांची विशेष प्रगती होण्याची शक्यता आहे की नाही हे पाहण्यापुरते एकदोन विषयांवर अधिक भर देण्याची ही व्यवस्था असते. पदवी अभ्यासक्रमाची ही रचना ठोकळमानाने ठीक आहे असे मला वाटते. परंतु पदव्युत्तर अभ्यासक्रमात हे तारतम्य दिसत नाही. हे अभ्यासक्रम बहुधा एकाच विषयावर आधारीत असतात. शिकणारा विद्यार्थी फक्त भाषाच शिकतो आणि त्यातही बहुधा एकच भाषा शिकतो. तसेच मानव्य व समाजविज्ञान शास्त्रे शिकणारा विद्यार्थी केवळ ह्याच शास्त्राचा आणि त्यातही बहुधा एकाच शास्त्राचा अभ्यास करतो. पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेला प्रत्येक विद्यार्थी पदव्युत्तर अभ्यासक्रमात कोणत्या ना कोणत्या एका विषयावर संपूर्ण प्रभुत्व प्राप्त करून घेण्यास समर्थ असतो असे

समजून हे सारे अभ्यासक्रम आखलेले असतात. परंतु बहुसंख्य विद्यार्थ्यांबाबत हे खरे नसते. त्यांच्या डोक्यावर एकाच विषयाच्या अद्ययावत संपूर्ण ज्ञानाचा भार टाकून त्यांच्या आवाक्यात आहे तेवढेही ज्ञान आपण त्यांचे हाती लागू देत नाही. आणि त्यांना या संकटातून कसेबसे ओढून बाहेर काढण्याकरता त्याविषयाचीही ओढाताण व आबाळ करतो. कलाशाखेतील आजचे पदव्युत्तर शिक्षण जीवनोपयोगीही नाही आणि त्या शास्त्रांची प्रगती करण्यास समर्थही नाही. या दुहेरी अपयशाच्या बुडाशी हे एकांगी अभ्यासक्रम आहेत.

आज महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयांत कलाशाखेत जवळजवळ १०,००० पदव्युत्तर विद्यार्थी आहेत. खेरीज, विद्यापीठातील या विषयांच्या विभागात आणखी ५००० पदव्युत्तर विद्यार्थी आहेत. या १५,००० विद्यार्थ्यांपैकी फार तर दहा टक्के म्हणजे हजार पंधराशे विद्यार्थीच शास्त्रीय जिज्ञासेने, ज्ञानलालसेने एखाद्या विषयात विशेषज्ञ होऊ इच्छितात आणि त्या करता आवश्यक त्या तयारीचे असतात. त्यांच्या करता आजचे एकविषयी पदव्युत्तर अभ्यासक्रम थोड्या फार फरकाने चालू ठेवावेत. परंतु बाकी बहुसंख्य विद्यार्थ्यांकरता हे अभ्यासक्रम निरुपयोगी आहेत.

या बहुसंख्य विद्यार्थ्यांकडे आपण अत्यंत अपराधी मनाने पाहिले पाहिजे. दहा अधिक दोन अधिक तीन या आकारबंधात त्यांच्या आयुष्याची पंधरा वर्षे गेली आहेत. या पंधरा वर्षांत त्यांना आपण कोणताच विषय धड शिकविलेला नाही. परीक्षांचा आट्यापाट्या खळत ते पदवीपर्यंत पोहचले आहेत. सर्व व्यावहारिक, व्यावसायिक, जीवनोपयोगी विद्याशाखांत त्यांना प्रवेश नाकारल्याने, नाईलाजाने ते कलाशाखेत आले आहेत. आणि पदवीपर्यंतच्या शिक्षणाने भागेना म्हणून अगतिकपणे ते पदव्युत्तर अभ्यासक्रमात दाखल झाले आहेत. त्यांना कोण्या एका विषयाचे पदवीपर्यंतचे ज्ञान अवगत झाले आहे असे मानून आता त्यांचे शिरावर त्या विषयांच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा भार टाकणे उचित नाही. त्या ऐवजी कला शाखेतील सर्व विषयांच्या प्राध्यापकांनी असा विचार करावा की या विद्यार्थ्यांची शिक्षणाची पंधरा वर्षे गेली. आणखी दोन वर्षे ते शिकू म्हणतात. मग आपल्या विषयात त्यांना उपयुक्त असे सांगण्यासारखे आपल्या जवळ काही आहे का? ते त्यांना सांगू या. आपल्या शास्त्राचे व आपल्या विद्वत्तेचे अवडंबर न माजवता सांगू या. कला शाखेतील प्रत्येक विषयविभागाने या हेतूने एका अभ्यासपत्रिकेचा अभ्यासक्रम तयार केला तर आजच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या आठ अभ्यासपत्रिकांच्या चौकटीत एक उपयुक्त अभ्यासक्रम होऊ शकेल.

या विद्यार्थ्यांना भाषेचे ज्ञान हवे, इंग्रजीचे हवे आणि मराठीचेही हवे. पण त्या करता आता शेक्सपिअर-मिल्टन वा महानुभाव - कुसुमाग्रज यांनी सुरवात करू नये. त्या ऐवजी त्यांचे कडून सद्यःपरिस्थितीचे संदर्भात काही लिहून घ्यावे व ते शुद्ध सुबोध व सुस्पष्ट नसेल तर दुरुस्त करून द्यावे. त्यांना गणिताचे ज्ञान हवे म्हणजे अंकगणिताचे हवे. ते त्यांना केंव्हातरी शाळेत झालेले आहे. ते त्यांना येतेच. निदान पदव्युत्तर अभ्यासक्रमात ते शिकवण्याजोगे नाही असे मानू नये. ते त्यांना येते का ते तपासून पहावे. येत नसेल तर त्यांच्या मनात न्यूनगंड निर्माण न करता ते त्यांचेकडून पुनश्च करून घ्यावे. तीच गोष्ट सर्व मानव्य व समाजविज्ञानशास्त्रांची. या विद्यार्थ्यांना शास्त्राच्या चौकटीत न अडकता ज्या त्या शास्त्रात जीवनोपयोगी असे जे सामान्यज्ञान असेल ते त्यास सांगावे. असे अभ्यासक्रम केले तर शिक्षणाच्या शेवटच्या दोन वर्षात या विद्यार्थ्यांना काही जीवनोपयोगी उपयुक्त ज्ञान मिळू शकेल. हवे तर या पदवीस एम. ए. (सामान्यज्ञान) असे म्हणावे.

कला शाखेतील पदव्युत्तर अभ्यासक्रमात आणखी एक प्रकारचा अभ्यासक्रमही उपयुक्त ठरेल असे वाटते. आजच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमात भाषा आणि मानव्य व समाजविज्ञानशास्त्रे यांची जी फारकत केली आहे ती दोघांच्याही प्रगतीस उपकारक नाही. आज आपण शिकवतो ती सर्व मानव्य व समाजविज्ञानशास्त्रे पाश्चात्य देशात प्रगत झाली आहेत. त्यांचा गाभा व त्यांची शास्त्रीय चौकट तेथूनच घेणे अपरिहार्य आहे. ते आवश्यक व हितावहही आहे. परंतु या शास्त्रांची प्रगती आपल्या सामाजिक संदर्भात करावयाची तर ही शास्त्रे प्रथम देशी भाषांत उतरली पाहिजेत. हे नीट करावयाचे तर या शास्त्रांची थोडी फार ओळख पाहिजे आणि भाषेवरही किमान प्रभुत्व हवे. पदव्युत्तर अभ्यासक्रमात भाषा आणि मानव्य व समाजविज्ञानशास्त्रांची जी फारकत झाली आहे त्यामुळे अशी दुहेरी क्षमता असलेली माणसे आज निर्माण होत नाहीत. परिणामी, मानव्य व समाजविज्ञानशास्त्रांत आज देशी भाषेतून फारसे लिखाण होत नाही. जे थोडे होते ते, अपवाद सोडले तर, परकी वळणाचे वा दुर्बोध असते.

भाषेची वृद्धी व प्रगती याकरताही हे महत्त्वाचे आहे. भाषा म्हणजे केवळ ललित साहित्य नव्हे. शास्त्रास आवश्यक तो बारकावा व काटेकोरपणा न सोडता शास्त्रीय विवेचन सुबोधपणे मांडणारी भाषाही तेवढीच महत्त्वाची आहे. तिचा स्वतंत्र डौल आहे. तिची जोपासना करावयाची तर भाषेच्या अभ्यासकांनी एखाद्या मानव्य व समाजविज्ञानशास्त्राची तोंडओळख करून घेतली पाहिजे. म्हणून माझी सूचना अशी की भाषा शिकू इच्छिणाऱ्या बहुसंख्य विद्यार्थ्यांकरता करावयाच्या पदव्युत्तर

अभ्यासक्रमात निम्मी भाषा आणि निम्मे एखादे मानव्य किंवा समाजविज्ञानशास्त्र अशी जोड असावी. निव्वळ भाषिक अभ्यासक्रमापेक्षा असे संयुक्त अभ्यासक्रम अधिक जीवनोपयोगी ठरतील. शिवाय मानव्य व समाजविज्ञानशास्त्रे आणि भाषा अशा दोहोंच्याही प्रगतीस ते उपकारक होतील.

कलाशाखेत प्रवेश घेणाऱ्या बहुसंख्य विद्यार्थ्यांस उपयुक्त असे हे अभ्यासक्रम तयार केल्यानंतर या शाखेतील पदव्युत्तर शिक्षणाचे जे मुख्य उद्दिष्ट त्याकडे आवश्यक ते लक्ष देणे सुलभ होईल. ते उद्दिष्ट म्हणजे या विषयांच्या ज्ञानभांडारात मौलिक भर घालू शकतील, निदान त्याकरता प्रयत्नशील रहातील असे विद्याव्यासंगी प्राध्यापक व संशोधक निर्माण करणे. या करता अर्थातच विषयविशिष्ट अद्ययावत ज्ञानाचा बारकाईने शास्त्रशुद्ध अभ्यास झाला पाहिजे. आणि तसे चिकित्सक अभ्यासक्रम तयार केले पाहिजेत. हे अभ्यासक्रम झेपतील असे जिज्ञासू व ईर्षा व तयारी असलेले विद्यार्थी कोणत्याही विषयात थोडेच असतात. त्यांचेवरच लक्ष केंद्रित करून, अव्यभिचारी ज्ञाननिष्ठेने कसून अध्ययन-अध्यापन केले तरच त्यातून काही किमान दर्जाचे विद्याव्यासंगी प्राध्यापक व संशोधक निर्माण होतील. आजच्या विद्यापीठीय शिक्षणाची ही नितांत गरज आहे.

आपल्या विद्यापीठांतून ही अव्यभिचारी ज्ञाननिष्ठा व परंपरा अजून निर्माण झालेली नाही. होताना दिसत नाही. दुर्दैवाने त्याकरता कोणी फारसे प्रयत्नशीलही नाही. आता हे नव्याने करावयाचे तर त्याकरता महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांचे बळ व साधनसामुग्री एकत्र करून संयुक्त प्रयत्न झाला पाहिजे. सुदैवाने व्हिडीओद्वारा ज्ञानप्रसाराचे एक नवीन समर्थ साधन उपलब्ध झाले आहे. त्यायोगे विद्यापीठांच्या स्वायत्ततेस धक्का न लावता, उच्चशिक्षणांत सत्तेचे केंद्रीकरण न करता, संयुक्त प्रयत्न करणे शक्य आहे.

विविध विषयांच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमावर, विशेषतः त्यातील अवघड भागावर, सर्व विद्यापीठातील जेष्ठ प्राध्यापकांनी व्याख्याने तयार करावीत. ती दृकश्राव्य मुद्रित करण्याची व्यवस्था विद्यापीठांनी करावी. कनिष्ठ प्राध्यापकांपैकी ज्यांना आपणांस एखादा विषय विशेष समजला आहे आणि आपणांस जे समजले ते आपण विद्यार्थ्यास सांगू शकतो असा विश्वास आहे त्यांनाही काही व्याख्याने दृकश्राव्य मुद्रित करून घेण्याची संधी असावी. अशा सर्व व्याख्यानांच्या प्रती सर्व विद्यापीठात ठेवाव्यात आणि विद्यार्थ्यांच्या मागणीप्रमाणे त्या दाखविण्याची व्यवस्था असावी. एखाद्या प्राध्यापकास त्याच्या विषयावर उपलब्ध असलेल्या दृक्श्राव्य व्याख्यानांपैकी काही व्याख्याने विशेष उद्बोधक वाटली तर त्याने स्वतः नव्याने व्याख्यान देण्याऐवजी हीच

तज्ज्ञ व्याख्याने स्वतः उपस्थित राहून विद्यार्थ्यांस दाखवावीत आणि विद्यार्थ्यांचे शंकानिरसन करावे. असे करण्यास मुभा असावी. इतकेच नव्हे तर त्यास प्रोत्साहन असावे. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांस तज्ज्ञ व्याख्याने ऐकण्याची संधी मिळेल. शिवाय जिज्ञासू व प्रामाणिक प्राध्यापकांचे त्यांच्या विषयाची उजळणी होऊन प्रबोधन होईल. विद्यापीठांतून अव्यभिचारी ज्ञाननिष्ठा व परंपरा निर्माण करावयाची तर प्राध्यापकांचे निरंतर प्रबोधन होत राहिले पाहिजे.

आज महाविद्यालयांतून आणि विद्यापीठांतून चालू असलेल्या शिक्षणपद्धतीत हे होत नाही. दहापैकी कोणतेही पांच प्रश्न सोडवून त्यांपैकी तीन प्रश्नांची जेमतेम उत्तरे देणारा विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण होतो आणि लगोलग प्राध्यापक होऊ शकतो व होतो. एकदा तो प्राध्यापक झाला की त्याचे शिक्षण थांबते. प्रशिक्षणाचा प्रश्नच नाही. वर्गात विद्यार्थ्यांसमोर त्याच्या मुखातून निघेल ते ज्ञान. ते ज्ञान की अज्ञान हे सांगणारा कोणी नसतो. जो विषय प्राध्यापकाला नीट कळलेला नाही तो समजावून घेण्याऐवजी तो शिकविण्याचे तो टाळतो. अशी ही अर्धवट व्याख्याने ऐकून, निम्मे अधिक प्रश्न आधीच माहित असलेल्या परीक्षेस बसून, दहापैकी पांच प्रश्न सोडवून त्यांपैकी तीन प्रश्नांची उत्तरे जेमतेम देऊ शकणारा विद्यार्थी नव्याने प्राध्यापक होतो आणि आणखी नवीन प्राध्यापक निर्माण करण्याच्या प्रयत्नास लागतो. ही प्रक्रिया थांबली पाहिजे. शेतीमध्ये बियाणाचे जे महत्त्व तेच शिक्षणक्षेत्रात प्राध्यापकांचे आहे. 'जे पेरावे ते उगवते' हा सृष्टीचा नियम आहे. म्हणून जे पेरायचे त्याचा दर्जा राखला पाहिजे. सतत सुधारला पाहिजे.

प्रथमच सांगितल्याप्रमाणे महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षणाचे उद्दिष्ट दुहेरी आहे. एक म्हणजे बहुसंख्य विद्यार्थ्यांना जीवनोपयोगी ज्ञान देणे. दुसरे म्हणजे सर्व जीवनोपयोगी ज्ञानास मूलभूत जी कलाशास्त्रे त्यांची उपासना करतील असे विद्याव्यासंगी, ज्ञानोपासक, प्राध्यापक व संशोधक निर्माण करणे. त्याखेरीज विद्यापीठाचे गुरुकुल होणार नाही. आज विद्यापीठातून या गुरुकुलाचा अभाव जाणवतो. गुरुकुलाचे अभावी कुलगुरू, विद्याशाखा, त्यांचे अधिष्ठाते, प्राध्यापक, अध्यापक, स्नातक हे सारे शब्द निरर्थक झाले आहेत ते सार्थ केले पाहिजेत.

*(पूर्वप्रसिद्धी : दीक्षान्त भाषण, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, दिनांक २१-१-१९८४)*

*(टीप : शुद्धलेखन मूळ लेखाबरहुकूम)*

# पुरवणी

## वंचितांचा विकास प्रयत्न

प्रस्तुत अभ्यासाची पार्श्वभूमी स्पष्ट करताना डॉ. देशपांडे म्हणतात : आपल्या समाजात पूर्ण परिवर्तन घडवून आणण्यासाठी ज्यांनी कंबर कसली आहे त्यांच्यापुढील अत्यंत अवघड समस्या म्हणजे जातिव्यवस्थेतून निर्माण झालेली सामाजिक विषमता. अशा परिस्थितीत न्यायाधिष्ठित समाजव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी सर्वस्व वेचून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या ज्या स्वयंसेवी संस्था आहेत व ज्यांचा मानवाच्या समानतेवर विश्वास आहे अशांकडूनच खरे सामाजिक व राजकीय कार्य घडू शकेल. या संदर्भात महाराष्ट्रातील म्हैसाळ (जि. सांगली) येथील श्री. मधुकर देवल यांनी अस्पृश्यांमध्ये जे काम केले आहे ते अशा स्वयंसेवी संस्थेने केलेल्या सामाजिक-राजकीय कार्याचे एक उत्तम उदाहरण असल्याचे ते नमूद करतात. डॉ. देशपांडे यांचा या कार्याशी जसजसा परिचय होत गेला तसतशी त्यांची या कार्याच्या दूरगामी महत्वाबद्दल खात्री पटली. जर असे प्रकल्प इतर ठिकाणी सुरू होणार असतील तर त्यासाठी या प्रकल्पाची तपशीलवार चर्चा व टीकात्मक परीक्षण जरूर आहे असे त्यांना वाटले. प्रस्तुत अभ्यास या हेतूने केलेला आहे हे वाचकांच्या लक्षात येईल.

म्हैसाळ गावाची लोकसंख्या १९७१ मध्ये ८८८५ होती, त्यात १२६७ कुटुंबे होती; त्यापैकी १२१० कुटुंबांच्या मालकीची एकूण जमीन ३४२० हेक्टर होती. म्हणजे फक्त ५७ कुटुंबे भूमिहीन होती. कृष्णा नदीच्या काठी गाव असले तरी १९६० पर्यंत बहुतेक जमिनी जिरायती होत्या. परंतु त्या सुमारास सांगली येथे एक सहकारी साखर कारखाना सुरू झाला. या खेड्यातील जमिनी त्या कारखान्याच्या क्षेत्रात आल्या. यामुळे नदीवर उपसा सिंचन सोयी चालू करण्यास चालना मिळाली. सध्या तेथे २००च्या वर विजेच्या मोटारी व पंप असून गावाची सुमारे ९० टक्के जमीन बागायती आहे. म्हैसाळ हे आता सर्वार्थाने संपन्न गाव असून तेथे सर्व सुखसोयी आहेत. तेथे बेकारीही बहुधा नाही.

मधुकर देवल आज ६५ वर्षांचे आहेत. ते या गावातीलच असून त्यांची स्वतःच्या मालकीची सुमारे १२५ एकर जमीन आहे. प्रथम काही विशिष्ट कामामागे त्यांनी पुष्कळ धाव घेतली व त्यात त्यांचा भ्रमनिरास झाला असे दिसते. नंतर काही ध्येयाने प्रेरित होऊन बरीच भ्रमंती करून १९५०च्या दरम्यान ते आपल्या गावी परतले. सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीच्या पहिल्या टप्प्याशी त्यांचा संबंध होता. तसेच गावातील पहिली सहकारी उपसा सिंचन योजना– धनकलक्ष्मी– सुरू करण्यात त्यांचा पुढाकार होता. या कारणाने गावकऱ्यांच्या आदरास व विश्‍वासास ते पात्र झाले होते.

त्यानंतर देवलांनी १९६२ मध्ये म्हैसाळ दूध पूरवठा सहकारी संस्था स्थापन केली. पुस्तकातील चौथ्या प्रकरणामध्ये या संस्थेचे कामकाज व त्यांचा गावातील अस्पृश्यांना कितपत लाभ झाला आहे हे स्पष्ट केले आहे. त्या प्रकरणाचे दुधाची शेती / दुग्धव्यवसायावर आधारित शेती (Dairy Farm) हे शीर्षक थोडेसे फसवे आहे. वास्तविक सहकारी दूध योजना ही सरकारने पुरस्कार केलेल्या आणि सहकारी दूध पुरवठा संस्थांमार्फत राबवल्या जाणाऱ्या योजनेचाच भाग आहे. या योजनेचा पुरेपूर फायदा घेऊन तिचे फायदे अस्पृश्यांपर्यंत पोहोचतील अशी काळजी देवलांनी घेतली. सन १९६२ ते १९६८ या काळात दुभती जनावरे घेण्यासाठी संस्थेने ९० अस्पृश्य कुटुंबांना कर्जे दिली. परिणामतः १९७९ मध्ये त्यांच्याकडे १४० म्हशी व ९७ गायी होत्या. एखादी सरकारी योजना राबवण्यासाठी स्वयंसेवी संस्था कशी मदत करू शकतील व समाजातील दुर्बल घटकांपर्यंत त्या योजनेचे फायदे पोहोचावेत म्हणून त्या कशा दक्ष राहू शकतील याचे हे चांगले उदहरण आहे. दूध उत्पादनाची परंपरा असलेल्या भागातच म्हैसाळ वसलेले आहे व तेथे सध्या अनेक सहकारी दूध पुरवठा संस्था काम करीत आहेत. म्हैसाळ येथील अस्पृश्यांना दूध पुरवठा योजनांमधून जसा समान फायदा मिळाला तसा त्या भागातील इतर गावातील अस्पृश्यांना मिळाला का याची पाहणी करणे उपयुक्त होईल.

देवलांचे पुढचे काम म्हणजे त्यांनी तेथील अस्पृश्यांसाठी एक सामूहिक शेती संस्था– श्री विठ्ठल संयुक्त सहकारी शेती संस्था– सुरू केली. देवलांच्या कार्याचा हा केंद्रबिंदू आहे व याकडे अनेकांचे लक्ष वेधले गेले आहे. पाचव्या व सहाव्या प्रकरणात याचे तपशील दिलेले आहेत. या कार्याच्या मर्यादांचीही जाणीव डॉ. देशपांडे यांना आहे तथापि ‘या कार्यातील सामाजिक व आर्थिक लाभ नेत्रदीपक आहेत’ असा निष्कर्ष त्यांनी काढला आहे. यावर थोडा अधिक चिकित्सक विचार होणे जरूरीचे आहे.

म्हैसाळच्या अस्पृश्यांकडे सुमारे १२५ एकर जमिनीची मालकी आहे. पण त्यातील बहुतेक जमीन सावकारांकडे एकूण रु. १,५०,००० कर्जासाठी गहाण होती. या जमिनीच्या काही भागाची- सुमारे ५० एकर सावकारांनी सुधारणा केली. तेथे विजेच्या सहाय्याने उपसा सिंचन व पाईप लाईनची सोय केली. १९६५ मध्ये देवलांनी कर्जाची रक्कम व सुधारणेचा खर्च देऊन जमिनी ताब्यात घेतल्या व त्यावर सामूहिक शेती सुरू केली. त्यासाठी त्यांनी रु. २,००,००० इतकी रक्कम उभी केली. डॉ. देशपांड्यांनी तपशील दिला आहे त्याप्रमाणे यात देवलांनी स्वतःचे रु. ७०,००० घातले. रु. २५,००० च्या देणग्या गोळा केल्या व बाकीचे पैसे ठेवींमधून उभे केले. पैकी ठेवी रीतसर परत करण्यात आल्या आहेत. देवलांची स्वतःची रक्कम ही बिनव्याजी ठेव म्हणूनच मानण्यात आली आहे व ती अजून परत गेलेली नाही. अधिक खोलात पाहता असे दिसते की, देवलांची स्वतःची रक्कम रु. १,००,०००पेक्षा थोडी जास्त होती व त्यापैकी रु. २५,००० हे परत केलेले आहेत. या सुरवातीच्या रकमेशिवाय तूट भागविण्यासाठी देवल हे दरवर्षी सुमारे रु. १०,००० इतकी रक्कम संस्थेस देत आहेत. असे सुमारे १० वर्षेपर्यंत- म्हणजे १९७७ पर्यंत- घडत होते. पण त्या वर्षी संस्था प्रथमच स्वयंपूर्ण झाली. सौजन्यामुळे बहुधा देवलांच्या या सर्व रकमा हिशेबात नीट दाखविल्या गेलेल्या नाहीत. हे औदार्य कौतुकास्पद असले तरी त्यामुळे स्वयंसेवी संस्थांचे आर्थिक व्यवहार हिशेबी रहात नाहीत. भोंगळ हिशेबामुळे अनेक स्वयंसेवी संस्थांना फटका बसला आहे व अनेक नष्ट झाल्या आहेत.

१९७७-७८ मध्ये सामूहिक शेती संस्थेमध्ये १०५ सभासद होते व सुमारे १४५ एकर जमीन सामूहिक तत्त्वावर कसली जात होती. १०५ सभासदांपैकी ६४ किंवा ६६ च फक्त जमीनमालक होते. उरलेले बहुधा भूमिहीन किंवा जमीनमालकांच्या कुटुंबातील होते, नेमकी परिस्थिती येथे स्पष्ट नाही. जमीनमालक असणाऱ्या सभासदांपैकी निम्म्याहून अधिक सभासदांकडे एक पंचमांशापेक्षाही कमी जमीन होती. फक्त ५ जणांकडे ५ एकरापेक्षा जास्त जमीन होती व फक्त एका सभासदाकडेच बहुधा २० एकरापेक्षा अधिक जमिनीची मालकी होती. तात्पर्य, सभासदांमध्ये जमिनीचे वाटप अगदी विषम आहे.

लागवडीखाली असलेल्या १४५ एकरांपैकी १०० एकर बागायती जमीन आहे. १९७०-७१ ते १९७७-७८ या आठ वर्षांसाठी असणारा नक्त वाढावा किंवा नक्त नफ्याची आकडेवारीही देण्यात आली आहे. चार वर्षे नक्त वार्षिक नफा रु. १०,००० होता, तर उरलेल्या वर्षी तो सुमारे रु. ५,००० होता. जरी रु. १०,००० हा मोठा

नफा विचारात घेतला तरी बागायती जमिनीत दर एकरामागे रु. १००/- नफा असे प्रमाण पडले. जिरायती ४५ एकरांचा विचार तूर्त बाजूला ठेवला तरी पीकवार लागवडीची दरवर्षीची आकडेवारी वेगळी दिलेली नाही; फक्त १९७६-७७ या वर्षासाठी ती दिलेली आहे. बागायती किंवा जिरायती मिळून ९० एकर हिशेब आहे. डॉ. देशपांड्यांच्या म्हणण्यानुसार सामूहिक शेतीचा मूळ हेतू सभासदांच्या दुभत्या जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न सुटावा असा होता. १९६६-७७ साली चारा देऊ करणारे कोणतेच पीक घेतलेले आढळत नाही. उलट नेहमीच्या नगदी पिकांवरच भर दिला गेला आहे. सन १९७६-७७ मध्ये २७.६ एकरात ऊस, १.१ एकरात द्राक्षे व १० एकरात कापूस लावला होता. तसेच २९ एकर ज्वारीखाली व २३ एकर गव्हाखाली होते. या सगळ्यातून तसेच तपशील न दिलेल्या ५० एकरामधून एकूण रु. १०,००० नक्त नफा त्या वर्षी झाला.

उत्पादन व त्यासाठी आलेला खर्च नोंद ठेवण्यात आलेली नाही. तेव्हा शेतीवरील उत्पादनाची कार्यक्षमता व व्यापारी तत्त्वावरील लाभप्रदता हे काढता येत नाही; व गावातील खाजगी शेतीशी तुलनाही करता येत नाही. गावात देवलांची स्वतःचीही मोठी शेती आहे. त्या शेतीची कार्यक्षमता व लाभप्रदता यांची सामूहिक शेतीशी तुलना करणे उपयुक्त ठरेल.

पीकवार पद्धतशीर आकडेवारी जरी उपलब्ध नसली तरी डॉ. देशपांडे सांगतात की १९७७-७८ मध्ये १० एकर जमिनीत ज्वारी लावली होती व त्यातून रु. ११,००० नक्त नफा झाला, यात स्थिर खर्चाचा विचार केलेला नाही. परंतु त्या वर्षी संपूर्ण सामूहिक शेतातून रु. १०,००० इतका नक्त नफा मिळाला. म्हणजेच बहुतेक इतर सर्व पिकामधून- ऊस, द्राक्षे इ.- नक्त तोटाच झाला असणार.

नक्त नफा अगदी कमी होण्यामागील एक कारण असे की सभासदांना त्यांच्या जमिनीवर तुलनेने बराच जादा खंड दिला जातो. १९७७-७८ या वर्षी एकूण खंड रु. २८,७२३ दिल्याची नोंद डॉ. देशपांडे यांनी केली आहे. पुस्तकात तक्ता क. ६.३ मध्ये निरनिराळ्या दर्जाच्या जमिनींना जो दर एकरी खंड दिलेला दाखवला आहे त्याच्याशी हा एकूण खंडाचा आकडा जुळत नाही. त्या तक्त्यात दिलेल्या दरानुसार एकूण खंड रु. ४४,३०० इतका होईल. शिवाय यातही एक चूक असावी : अ दर्जाच्या जमिनीला एकरी रु. ४००/- खंड दाखवला आहे. पण ब दर्जाच्या जमिनीला तो एकरी रु. ५०० दाखवला आहे. जर हा मुद्रणदोष आहे असे मानले व त्यानुसार जरूर तेथे तो सुधारून घेतला तर एकूण खंडाची रक्कम रु. ४७,३०० येते.

तक्ता क्र. ६.४ मध्ये सभासदांना कशा प्रकारे खंड मिळाला हे तपासले तर मात्र खंडाची रक्कम जवळपास रु. २८,७२३ येते. म्हणून आपण हीच रक्कम विचारात घेऊ. जमिनीची मालकी अगदी विषम आहे. तीच विषमता सभासदांना मिळणाऱ्या खंडात दिसते. वर सांगितल्याप्रमाणे १०५ सभासदांपैकी फक्त ६६ जणच जमिनीचे मालक आहेत; व त्यांनाच फक्त जमिनीचा खंड मिळतो. यापैकी सहाजणांना एकूणापैकी निम्मा खंड मिळतो व उरलेल्या साठांना निम्मा मिळतो!

याशिवाय विचारात घेण्याजोगा आणखी एक मुद्दा म्हणजे शेतावर मिळणारी मजुरी. सन १९७८-७९ मध्ये एकूण मजुरी रु. ५१,८६७ दिली गेली: रु. ३२,८१० हे पुरुष मजुरांच्या ८९१३ श्रमदिवसांसाठी व रु. १९,०५७ हे स्त्री मजुरांच्या ८२७६ दिवसांसाठी. म्हणजे एकूण श्रमदिवस झाले १७१८९. लागवडीखाली एकूण जमीन १४५ एकर होती. त्यापैकी १०० एकर बागायती होती. म्हणजे असे दिसते की बागायती जमिनीने दर एकरी १५० मजूरदिवसांचा रोजगार व जिरायती जमिनीने सरासरी एकरी ५० मजूरदिवसांच्या रोजगार निर्माण केला.

शेतावर दिली गेलेली मजुरी, खंड व नफा एकत्र केला तर शेतीतील मूल्यवाढ रु. ५०,००० + रु. ३०,००० + रु. १०,००० = रु. ९०,००० इतकी दिसते. म्हणजे एकूण मूल्यवाढीत खंडाचा भाग सुमारे एक तृतीयांश राहिला. सामूहिक शेतीवर जमीनमालकांचा पगडा आहे हे उघड आहे. याच्या मुळाशी जमीन-मालकीतील विषमता आहे. परिणामी खंड वाढविण्याची मागणी आहे. डॉ. देशपांडे म्हणतात: ''सोसायटीच्या अधिकाऱ्यांनी या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्याचे ठरवले आहे.'' मात्र ते म्हणतात की ''खंड वाढवणे किंवा वाढाव्यातून जादा भाग जमीनमालकांना देणे सध्या शक्य नाही. कारण सोसायटीने जमिनीत मोठी गुंतवणूक केली आहे; त्यासाठी बँकांकडून व इतर मार्गांनी कर्ज उभारले आहे. जोपर्यंत हे कर्ज पूर्ण फेडले जात नाही तोपर्यंत सभासदांना खंड वाढवणे किंवा वाढावा सभासदांमध्ये वाटणे याचा विचार करता येत नाही. मात्र सोसायटीच्या लोकांना असे ठामपणे वाटते की काही वर्षातच भांडवली गुंतवणुकीसाठी अगदी कमी पैसा लागेल व त्यामुळे कर्जफेड करूनही सोसायटी सभासदांना एकरी रु. १५०० पर्यंत खंड देऊ शकेल.'' मात्र जमिनीवर किती व कशी गुंतवणूक केली आहे, यासाठी कर्ज कसे उभारले गेले आहे व त्याच्या परतफेडीची सोय काय याबाबत तपशील दिलेला नाही. बहुतेक गुंतवणूक ही देणग्या व बिनव्याजी ठेवीमधूनच झाली आहे असे दिसते. ते काही असले तरी शेतीत आज जो रु. १०,००० चा थोडा वाढावा अथवा

नक्त नफा दिसतो त्यातूनच हे सर्व भागवावे लागणार. म्हणजे वाढावा पुष्कळ वाढविल्याशिवाय, पर्यायाने व्यवस्थापन अधिक कार्यक्षम केल्याशिवाय अधिक खंड देता येणे शक्य नाही. एकदा जास्त वाढावा – नफा – झाला की तो वाढीव मजुरी देण्याऐवजी वाढीव खंड देण्यासाठी वापरावा यावर मात्र सगळ्यांचे एकमत दिसते. तात्पर्य सामूहिक शेतीत जमीनमालकांचे हितसंबंध प्रबळ आहेत. शेतीत दिल्या जाणाऱ्या कमी मजुरीवरूनही हेच सिद्ध होते. रोजगार व मजुरीचे जे आकडे वर दिले आहेत त्यावरून पुरुषासाठी सरासरी रोजी मजुरी रु. ३.६८ व स्त्रियांसाठी रु. २.३० इतकी निघते. गावात प्रचलित असणाऱ्या दरापेक्षा हे दर कमी असल्याचे डॉ. देशपांडे यांनी मान्य केले आहे.

परिणामी सामूहिक शेतीबाबत सभासदांमध्ये फारसा उत्साह नाही. सामूहिक शेतीत काम करणारांमध्ये सभासदांपैकी किती याची वेगळी नोंद नाही पण ते प्रमाण निम्म्याहून अधिक नसावे असा डॉ. देशपांडे यांचा अंदाज आहे. मजुरीची गरजच नाही असे नाही. १९७८–७९ या वर्षी सभासदांचे मजुरीचे उत्पन्न रु. ९६,५०५ होते. यातील बहुधा फक्त चौथा हिस्साच सामूहिक शेतीत मिळाला असावा. सारांश परिस्थिती खेदकारक आहे. अधिक न बोलणे बरे. सामूहिक शेती किती सामूहिक आहे हाच प्रश्न आहे.

डॉ. देशपांडे लिहितात की गटबाजी व वशिलेबाजी यामुळे सोसायटीच्या व्यवस्थापनात ढिलेपणा वाढतो आहे. याचे उदाहरण म्हणून त्यांनी द्राक्षलागवडीचा विस्तार करण्याच्या प्रयत्नांची कहाणी सांगितली आहे. विचार असा होता की द्राक्षबाग १० एकरांपर्यंत वाढवावी. त्यातून वार्षिक सुमारे रु. १,००,००० चे नक्त उत्पन्न मिळेल. यातून सभासदांच्या घरबांधणीचा खर्च भागवावा. या हेतूने देवलांनी रु. २ लाखांची देणगी व रु. १ लाखाची बिनव्याजी ठेव मिळविली. १९७९ मध्ये काम सुरू झाले. डॉ. देशपांडे यांनी सांगितलेला वृत्तांत अपुरा आहे पण सुस्त व्यवस्थापनामुळे अपेक्षेनुसार प्रगती झाली नाही असे दिसते.

डॉ. देशपांडे लिहितात की बेशिस्त वाढत आहे व शेतावरील पिकांच्या चोऱ्यांच्या तक्रारी आहेत. सध्या सभासदांनी आपल्या जमिनी सामूहिक शेतीसाठी भाडेपट्टयाने दिल्या आहेत. हा करार १९९० मध्ये संपेल. त्यानंतर बरेच सभासद आपला भाडेपट्टा करार वाढवून देणार नाहीत व सोसायटी संपुष्टात येईल अशी डॉ. देशपांड्यांना भीती वाटते.

या अपयशाच्या पार्श्वभूमीवर डॉ. देशपांड्यांची चिकित्सा पटत नाही. ते म्हणतात की देवल यांच्या कामाची दोन आगळी वैशिष्ट्ये आहेत : एक असे की अस्पृश्यांची आर्थिक स्थिती आता सुधारली आहे. इतकेच नव्हे तर ते आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाले आहेत. अस्पृश्यांमध्ये जी सामाजिक दुर्बलता आहे ती दूर करण्यासाठी अस्पृश्यांना स्वावलंबी केले पाहिजे यावर देवलांचा भर आहे, तो रास्तच आहे. त्यासाठी त्यांनी स्वतःचे श्रम व पैसा ओतला आहे. बाहेरून भरपूर आर्थिक मदतही आणली आहे. गरीब व दुर्लक्षितांचे दृष्टीने देवलांचा हाच महत्त्वाचा गुण असावा. पण त्यातून ते लोक स्वावलंबी होण्याचा संभव नाही!

सामूहिक शेती संस्था देवलांनी तिचा पहिला कार्याध्यक्ष या नात्याने वाढविली आहे. त्यांनी हे पद १९७५ मध्ये सोडून दिले. त्यानंतर सोसायटीच्या रोजच्या कामकाजापासून ते हेतूतः दूर राहिले आहेत. सोसायटीच्या कामातून दूर राहणे म्हणजे देवलांची अलिप्तता किंवा त्यांनी स्वतःच सुरू केलेल्या कामाबद्दल त्यांचा उत्साह ओसरत चालला आहे असा अर्थ काढू नये असे डॉ. देशपांडे आग्रहाने सांगतात. देवलांचा विश्वास असा की गरीब किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनी स्वतःचा संसार स्वतः चालविल्याशिवाय ते स्वावलंबी होणार नाहीत. परंतु हे वाटते तितके सोपे नाही. डॉ. देशपांड्यांनी सामूहिक शेतीची किंवा देवलांच्या इतर कार्याची किंवा दुर्बल घटकासाठी घरबांधणी योजनेची जी कहाणी सांगितली आहे त्यावरून हे स्पष्ट आहे. या सर्व विवेचनाचा हाच गाभा आहे असे वाटते. गरीब व दुर्बल घटकांना कसे साहाय्य करावे की ज्यायोगे ते परावलंबी होणार नाहीत ? म्हैसाळ येथील देवलांचे कार्य व डॉ. देशपांड्यांनी या कार्याचा घेतलेला सहानुभूतीपूर्ण पण चिकित्सक आढावा या दोन्हीतून हे सिद्ध होते की हे काम अवघड आहे. देवल करीत आहेत त्या प्रकारच्या विधायक कार्याचा हेतू गरिबांचे कसे तरी भले साधायचे हा नसून त्यांचे प्रश्न त्यांनीच सोडविण्यात साहाय्य करून त्यांना स्वतःचे पायावर उभे करणे हा आहे.

*(सांगली जिल्ह्यातील म्हैसाळ गावी श्री. मधुकर देवल है गेली कित्येक वर्षे तेथील दलित कुटुंबियांना विकासप्रवण करण्यासाठी झटत आहेत. त्यासाठी त्यांनी तेथे दूध पुरवठा सहकारी संस्था, सहकारी शेती संस्था, अशा दलितांच्या संस्था उभ्या केल्या आहेत. ग्रामीण भागातील उपेक्षित, पददलित यांच्या विकासाचा हा अभिनव प्रयोग अभिनंदनास आणि समाजाच्या कृतज्ञतेस पात्र आहे यात शंका नाही. परंतु अशा प्रयोगाकडे केवळ भाबडेपणाने न पाहता त्यांचे शास्त्रीय दृष्टीने*

*मूल्यमापन करण्याची गरज आहे हे कोणीही मान्य करील. श्री. देवल यांच्या म्हैसाळ येथील कार्याचे सहानुभूतीपूर्वक मूल्यमापन करण्याचा प्रयत्न पुणे येथील इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन या संस्थेतील प्राध्यापक डॉ. वसंत देशपांडे यांनी त्यांच्या अलि- कडील एका ग्रंथात केला आहे. त्या ग्रंथाचा तपशील खालीलप्रमाणे आहे: Struggle of the Deprived for Development, The Mhaisal Untouchables (Dastane Ramchandra and Co.), 1983. या ग्रंथास नामवंत अर्थतज्ज्ञ प्रा. वि. म. दांडेकर यांनी प्रस्तावना लिहिली आहे. या प्रस्तावनेचा मराठी अनुवाद आम्ही येथे प्रसिद्ध करीत आहोत.)*

*(पूर्वप्रसिद्धी : अर्थसंवाद, जुलै-सप्टेंबर १९८४, खं. ८, अं.२)*
*(टीप : शुद्धलेखन मूळ लेखाबरहुकूम)*

# पुरवणी

## पूर्ण रोजगार :
## नवीन नियोजन आयोगाचा दृष्टिकोन

भारताच्या नवव्या लोकसभेसाठी सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाल्यानंतर राष्ट्रीय आघाडीने २१ ऑक्टोबर १९८९ रोजी आपला निवडणूक जाहिरनामा प्रसिद्ध केला. त्यामध्ये आघाडीने प्रत्येक नागरिकाच्या रोजगाराचा हक्क प्रस्थापित करण्याचे आश्वासन दिले. जाहिरनाम्यात म्हटले आहे की, ''प्रत्येक नागरिकाला अर्थपूर्ण आणि सन्मानपूर्वक जीवन जगता यावे यासाठी त्याला उत्पादक आणि उत्पन्नदायी रोजगाराचा हक्क मिळाला पाहिजे. याकरिता राष्ट्रीय आघाडीचे सामाजिक आणि आर्थिक धोरण हे 'रोजगाराचा हक्क' हा नागरिकांचा मूलभूत हक्क बनेल या दृष्टीने आखले जाईल मानवी गरजा भागवून सन्मानाने जगण्याकरिता आवश्यक ते वेतन मिळवून देणारा उत्पादक रोजगार सर्वांना मिळाला पाहिजे. हे साधणे आपल्या आवाक्याबाहेरचे नाही. त्याकरिता प्रथम एक नवी रोजगार हमी योजना देशभर हाती घेतली जाईल. नंतर पूर्ण रोजगार निर्माण करण्याकरिता सामाजिक आणि आर्थिक विकासाचा एक नवा कार्यक्रम हाती घेतला जाईल. या कार्यक्रमात शेती आणि संबंधित व्यवसायांच्या विकासाला अग्रक्रम देऊन खेडी आणि लहान गावे यातून भौतिक आणि सामाजिक सेवांसाठीच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याकडे लक्ष दिले जाईल. जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन कुटिरोद्योग व लहान उद्योगामार्फतच केले जाईल.''[१]

अधिकारावर आल्यानंतर पंतप्रधानांनी ३ डिसेंबर १९८९ रोजी राष्ट्राला उद्देशून केलेल्या पहिल्याच आकाशवाणी आणि दूरदर्शनवरील भाषणात सांगितले की, ''मानवी साधनसंपत्ती ही आपल्या देशाची सर्वात महत्त्वाची संपत्ती आहे. बेकारीमुळे तिचा योग्य वापर होत नाही. म्हणून आम्ही रोजगाराचा हक्क हा भारतीय राज्यघटनेचा भाग बनवू. याचा अर्थ असा नव्हे की, प्रत्येकाला शासकीय नोकरी मिळेल. मात्र बेकारांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी पोषक होईल असे धोरण अनुसरण्याचे बंधन शासनावर राहील.'' त्यानंतर १ जानेवारी १९९० रोजी केंद्र शासनाने घोषणा

केली की, मूलभूत हक्कांमध्ये रोजगाराच्या हक्काचाही समावेश करण्यासाठी संसदेच्या आगामी अर्थसंकल्पी अधिवेशनात घटनादुरुस्ती विधेयक मांडले जाईल.

भारताच्या राज्यघटनेमध्ये रोजगाराचा हक्क हा मूलभूत हक्क म्हणून समाविष्ट करण्याची मागणी तशी नवी नाही. रोजगाराचा हक्क एक घटनात्मक हक्क बनावा यासाठी वेळोवेळी राजकीय पक्ष, कामगार संघटनांचे पुढारी आणि इतर अनेक क्षेत्रातील व्यक्तींनी मागणी केलेली आहे. सहाव्या लोकसभेच्या अंदाज समितीच्या अहवालात (१९७८-७९) अधिकृतपणे ही मागणी केल्याचे आढळते. त्यामध्ये म्हटले आहे, ''आता अशी वेळ येऊन ठेपली आहे की, शासनाने नागरिकांचा रोजगाराचा हक्क मान्य करावा, त्यांना काम देण्याची जबाबदारी स्वीकारावी आणि काम देणे शक्य झाले नाही तर त्यांना बेकार भत्ता द्यावा आणि या रितीने राज्यघटनेच्या एक्केचाळीसाव्या कलमात अंतर्भूत असलेल्या, परंतु दीर्घकाळ दुर्लक्षित राहिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचा आदर करावा.''[२] आता महत्त्वाचा फरक एवढाच झाला आहे की, सध्याच्या शासनाने ही जबाबदारी आपली मानली आहे. साहजिकच या विषयाचा साधकबाधक ऊहापोह आता देशात सुरू झाला आहे.

या प्रश्नाच्या दोन बाजू आहेत. एक म्हणजे, रोजगाराचा हक्क हा मूलभूत हक्क बनविल्यास त्याचे होणारे कायदेशीर परिणाम. दुसरी बाजू म्हणजे रोजगाराची परिपूर्ती करण्यासाठी प्रत्यक्षात शासन काय करू शकते. या दोन्ही बाजूंचा एकत्रितपणे विचार करावा लागेल; कारण रोजगाराचा हक्क मूलभूत हक्क बनविल्याने तो शासनाच्या कुवतीबाहेर जाणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

कामाच्या हक्कासंबंधी राज्यघटनेतील एक्केचाळीसाव्या कलमाचा नेहमी उल्लेख केला जात असला तरी प्रत्यक्षात त्याच्याशी निगडित ३९, ४१ आणि ४३ अशी तीन कलमे आहेत. एकोणचाळीसाव्या कलमानुसार प्रत्येक नागरिकास उपजीविकेची साधने प्राप्त करण्याचा अधिकार दिला आहे. रोजगारी हक्क आणि बेकारीच्या काळात शासनाकडून बेकारभत्ता मिळण्याचा हक्क एक्केचाळीसाव्या कलमात नमूद आहे. कलम ४३ रोजगाराचा हक्क आणि जीवनावश्यक वेतन (living wage) यांच्याशी संबंधित आहे ही तीनही कलमे मुळात खालीलप्रमाणे आहेत :

**कलम ३९ :** ''(अ) स्त्री आणि पुरूष नागरिकांना उपजीविकेसाठी पुरेशी साधने मिळविण्याचा सारखाच हक्क आहे; याच्या पूर्तीसाठी शासनसंस्थेने आपले धोरण राबविले पाहिजे.''

**कलम ४१ :** ''रोजगार, शिक्षण आणि बेकारी, वृद्धत्व, आजारपण, अपंगत्व आणि इतर प्रतिकूल गरजांकरिता सार्वजनिक साहयाचा हक्क मिळवून देण्यासाठी शासनसंस्थेने आपल्या आर्थिक कुवतीनुसार पुरेशी तरतूद केली पाहिजे.''

**कलम ४३ :** ''कायदे करून अथवा आर्थिक संघटना स्थापन करून अथवा इतर कोणत्याही मार्गाने सर्व शेतमजूर, औद्योगिक कामगार आणि इतर कामगारांना काम, जीवनावश्यक वेतन, चांगले जीवनमान जगता येऊन फुरसतीच्या वेळेचा तसेच सामाजिक व सांस्कृतिक संधींचा पूर्ण उपयोग करता येईल अशी रोजगाराची परिस्थिती उपलब्ध करून दिली पाहिजे. शासनसंस्थेने ग्रामीण भागात व्यक्तिगत अथवा सहकारी पद्धतीने कुटिरोद्योगांना प्रोत्साहन देण्याचा विशेष प्रयत्न केला पाहिजे.''

ही तिन्ही कलमे राज्यघटनेत मूलभूत हक्कांमध्ये न घालता शासनसंस्थेच्या धोरणात्मक मार्गदर्शक तत्त्वांमध्ये (Directive Principles of State Policy) समाविष्ट केलेली असल्यामुळे ती कायद्याच्या कक्षेत मोडत नाहीत. आताच ती मूलभूत हक्कांमध्ये समाविष्ट करून कायद्याच्या कक्षेत आणावी अशी सूचना आहे. त्याकरिता कलम ३९ मधील 'उपजीविकेसाठी पुरेशी साधने मिळविण्याचा हक्क' आणि कलम ४३ मधील 'चांगले जीवनमान जगता येऊन फुरसतीच्या वेळेचा तसेच सामाजिक व सांस्कृतिक संधींचा पूर्ण उपयोग करता येईल अशी रोजगाराची परिस्थिती' या शब्दरचना अधिक काटेकोरपणे मांडाव्या लागतील एवढेच नव्हे तर त्यामुळे, कलम ४१ मध्ये स्पष्ट उल्लेख केल्याप्रमाणे, शासनसंस्थेच्या आर्थिक कुवतीच्या मर्यादेपलीकडे नागरिकांचे हक्क जाणार नाहीत याची खबरदारी घ्यावी लागेल. उदाहरणार्थ, 'उपजीविकेसाठी पुरेशी साधने' ही सरासरी दरडोई राष्ट्रीय उत्पन्न जेवढे देऊ शकेल त्यापेक्षा अधिक असू शकणार नाहीत आणि 'वाजवी वेतन' (fair wage) काम करण्याच्या वयोगटातील दर प्रौढ व्यक्तिगणिक असणाऱ्या राष्ट्रीय उत्पन्नाइतकेच असेल. हे सुद्धा साध्य करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाची पूर्णतया समान वाटणी व्हावी लागेल; आणि तसे करणे राजकीयदृष्ट्या अशक्य, आर्थिकदृष्ट्या अयोग्य अथवा अंमलबजावणीच्या दृष्टीने अव्यवहार्य वाटत असेल तर जे काही कायद्यानुसार आश्वासित केले जाईल ते सरासरी राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा बरेच कमी असावे लागेल.

राष्ट्रीय आघाडीच्या निवडणूक जाहिरनाम्यात असेच संदिग्ध आणि भव्यदिव्य शब्दप्रयोग वापरले आहेत. 'अर्थपूर्ण आणि सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा हक्क' आणि 'मानवी गरजा आणि सन्मान यानुसार वेतन' हे शब्दप्रयोग वानगीदाखल सांगता येतील. निवडणूक जाहिरनामा आणि विधिमंडळातील विधेयक यामधील फरक शासनाच्या ध्यानात येईल अशी आशा आहे.

कलम ४१ मध्ये जेव्हा रोजगाराचा हक्क आणि बेकारीच्या काळात बेकारभत्ता देण्यासंबंधी शासनसंस्थेने तरतूद करावी असे सांगितले त्याचवेळी हे सारे शासनसंस्थेच्या आर्थिक कुवतीला पेलणारे असले पाहिजे हेही सांगितले. राष्ट्रीय आघाडीच्या निवडणूक जाहिरनाम्यात मात्र राज्याच्या आर्थिक कुवतीच्या मर्यादेची जाणीव आढळत नाही. याउलट, मोठ्या आत्मविश्वासाने जाहिरनामा सांगतो, ''रोजगाराचा हक्क प्रत्यक्षात आणण्यासाठी आवश्यक तो रोजगार निर्माण करणे आपल्या आवाक्याबाहेरचे नाही.''

कलम ४३ मध्ये कुटिरोद्योगांचा संदर्भ आहे. त्यावरून कामगारांना रोजगार, जीवनावश्यक वेतन आणि चांगले जीवन जगता येऊन फुरसतीच्या वेळेचा तसेच सामाजिक व सांस्कृतिक संधींचा पूर्ण उपयोग करता येईल अशी रोजगाराची परिस्थिती साध्य करण्यासाठी कुटिरोद्योग हा एक मार्ग आहे असे घटनाकारांना वाटत होते असे दिसते. चाळीस वर्षानंतरदेखील राष्ट्रीय आघाडीच्या जाहीरनाम्याचा मसुदा लिहिणाऱ्यांना असेच वाटते; कारण, ते सुचवितात की, ''मूलभूत ग्राहकोपयोगी वस्तूंचे उत्पादन कुटिर आणि लघु उद्योगांमार्फत केले जाईल.''

राष्ट्रीय आघाडीच्या जाहीरनाम्यात काही नव्या गोष्टींचा अंतर्भाव केलेला आहे. 'नवी रोजगार हमी योजना' देशभर कार्यान्वित करणे, 'शेती आणि संबंधित व्यवसायांच्या विकासाला अग्रक्रम देणारा सामाजिक आणि आर्थिक विकासाचा पर्यायी कार्यक्रम' आणि 'खेडी आणि लहान गावे यातून भौतिक आणि सामाजिक सेवांसाठीच्या पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करणे', अशा प्रकारच्या सूचना मांडलेल्या आहेत. नव्या नियोजन मंडळाने मे १९९० मध्ये प्रसृत केलेल्या 'आठव्या पंचवार्षिक योजनेची दिशा (१९९०-९५) ' या पुस्तिकेत या सूचना विस्ताराने मांडल्या आहेत. यथावकाश आपण त्यांचा विचार करू.

पंतप्रधानांनी ३ डिसेंबर १९८९ रोजी राष्ट्राला उद्देशून प्रसारित केलेल्या पहिल्याच भाषणात दूरदर्शीपणाने म्हटले आहे की, ''आम्ही रोजगाराचा हक्क हा भारतीय राज्यघटनेचा भाग बनवू. मात्र याचा अर्थ असा नव्हे की, प्रत्येकाला शासकीय नोकरी मिळेल.'' मात्र बेकारांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी पोषक होईल असे धोरण अनुसरण्याचे बंधन शासनावर राहील.'' पंतप्रधानांनी आपले शब्द अगदी काळजीपूर्वक वापरल्याचे ध्यानात येईल. आपले शासन रोजगाराचा हक्क राज्यघटनेत मूलभूत हक्कात समाविष्ट करील असे म्हणत नाहीत; आपले शासन रोजगाराचा हक्क हा 'भारतीय राज्यघटनेचा एक भाग' बनवेल एवढेच ते सांगतात. परंतु शासनसंस्थेच्या धोरणात्मक मार्गदर्शक तत्त्वामध्ये मुळातच रोजगाराच्या हक्काचा उल्लेख केलेला

असल्याने तो राज्यघटनेचा एक भाग आहेच. पंतप्रधानांच्या वक्तव्याप्रमाणे रोजगाराचा हक्क हा 'राजकीय' हक्क आहे, 'कायदेशीर' हक्क नाही. कदाचित त्यांना तसे सुचवायचे नसेलही म्हणून असे मानू की, पंतप्रधानांना अभिप्रेत आहे की, त्यांचे शासन रोजगाराचा हक्क राज्यघटनेतील मूलभूत हक्कांमध्ये समाविष्ट करून त्याला कायद्याच्या कक्षेत आणील. परंतु त्याचबरोबर ते असेही स्पष्ट करतात की, हा हक्क राजकीय असो अथवा कायदेशीर, 'याचा अर्थ असा नव्हे की, प्रत्येकाला शासकीय नोकरी मिळेल'; अर्थ एवढाच आहे की, 'बेकारांना काम उपलब्ध करुन देण्यासाठी पोषक होईल असे धोरण अनुसरण्याचे बंधन शासनावर राहील.' हे ठीक वाटते. परंतु यायोगे शासनावर कायदेशीर बंधन वा जबाबदारी काय येते ते कळत नाही.

राष्ट्रीय आघाडीचा निवडणूक जाहिरनामा तयार करणाऱ्यांखेरीज इतर काहींना रोजगाराचा हक्क राज्यघटनेतील मूलभूत हक्कात समाविष्ट करावा असे वाटते. परंतु, राज्याच्या आर्थिक शक्तीला काही मर्यादा असतात याची जाणीव घटनाकारांना असली तरी या व्यक्ती मात्र अशा मर्यादा मानायला तयार नाहीत. कारण, त्यांची जवळीक संयुक्त राष्ट्रसंघाशी आहे आणि त्यांच्या प्रेरणा मानवी हक्कांच्या जागतिक जाहिरनाम्यापासून (Universal Declaration of Human Rights) घेतल्या आहेत. भारतीय राज्यघटनेच्या मसुद्यावर ज्यावेळी शेवटचा हात फिरविला जात होता त्याचवेळी, म्हणजे १९४८ मध्ये, संयुक्त राष्ट्रसंघाने मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा एकमताने संमत केला. या जाहिरनाम्याच्या कलम २३ (१) मध्ये म्हटले आहे की, ''प्रत्येकाला रोजगाराचा हक्क आहे, रोजगाराच्या निवडीचा हक्क आहे, रोजगाराच्या न्याय्य आणि अनुकूल परिस्थितीचा हक्क आहे आणि बेकारीच्या काळात बेकारभत्त्याचा हक्क आहे.''[३] माल्कम आदिशेशय्या म्हणतात की, भारताने केवळ या जाहिरनाम्याच्या बाजूने मतदान केले नाही, तर प्रत्यक्षात तो जाहिरनामा तयार करण्याच्या कामात भारत सहभागी झाला होता एवढेच नव्हे तर, संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेच्या ज्या बैठकीत तो सर्वमान्य झाला त्या बैठकीचे अध्यक्षस्थानही भारतीय प्रतिनिधीकडे होते म्हणून आदिशेशय्या, म्हणतात, ''रोजगाराच्या हक्काचा राज्य घटनेत आणि कायद्यात समावेश करण्याची नैतिक जबाबदारी भारतावर आहे.''[४]

संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वच सदस्य राष्ट्रांनी मानवी हक्काच्या जाहिरनाम्याच्या बाजूने मतदान केले होते. त्यातील किती भांडवलशाही राष्ट्रांनी आपल्या राज्यघटनेत मूलभूत हक्कांमध्ये रोजगाराच्या हक्काचा समावेश केला आहे हे विचारले पाहिजे. जपानची राज्यघटना १९४६ मध्ये तयार झाली. त्यात कलम २६ मध्ये रोजगाराचा

हक्क मूलभूत हक्क असल्याचे नमूद केले आहे. परंतु, संयुक्त राष्ट्रसंघाचा मानवी हक्कांचा जाहिरनामा तयार होण्यापूर्वी हे घडले आहे. शिवाय, तो हक्क कायद्याच्या कक्षेत मोडतो किंवा नाही, घटनेच्या तरतुदीच्या आधारे एखादी बेकार व्यक्ती न्यायालयाकडे धाव घेऊन आपल्याला रोजगार देण्यास शासनाला भाग पाडू शकेल का, याविषयी संदेह आहे. बहुतेक विकसित भांडवलशाही देशांत रोजगाराच्या हक्काची हमी दिलेली आहे ती या अर्थाने की, तिथे सामाजिक सुरक्षा आणि बेकारी विमा या योजना आहेत. काम निर्माण करून पुरविणे ही बाब यापेक्षा वेगळी आहे.

केवळ समाजवादी देशांमध्येच नागरिकांना खऱ्या अर्थाने रोजगार हक्क आहे. परंतु इथेदेखील हा हक्क कायद्याच्या कक्षेत येतो किंवा नाही याबद्दल शंका आहे. उदाहरणार्थ, सोविएत रशियाच्या १९७७ च्या राज्यघटनेतील कलम ४० मध्ये 'रोजगाराच्या हमी'च्या हक्काचा उल्लेख केलेला आहे; परंतु त्या पाठोपाठ येणाऱ्या परिच्छेदात तो हक्क मिळवून देण्यासाठी शासनसंस्था काय करेल याचे स्पष्टीकरण दिलेले आहे. तो मजकूर असा : ''उत्पादक शक्तींची दमदारपणे वाढ घडवून, धंद्याचे आणि व्यवसायाचे मोफत प्रशिक्षण देऊन, कौशल्यात सुधारणा घडवून, नव्या उद्योग- व्यवसायांचे प्रशिक्षण देऊन आणि व्यवसाय मार्गदर्शन व नोकऱ्या देणे यासंबंधीच्या व्यवस्थेचा विकास करून समाजवादी आर्थिक व्यवस्थेत हा हक्क मिळवून दिला जाईल.'' प्रत्येक नागरिकाला रोजगारासाठी योग्य बनविणे हे शासनसंस्थेचे कर्तव्य आहे, एवढेच यावरून स्पष्ट होते. सोविएत संघराज्यातदेखील, एखादी बेकार व्यक्ती न्यायालयाकडे धाव घेऊन आपल्याला रोजगार देण्यास शासनसंस्थेला भाग पाडू शकेल, असे वाटत नाही.[५] आपल्यालाही हे करता येईल. कामाच्या हक्काचा मूलभूत हक्कात समावेश केल्यानंतर, पंतप्रधानांनी म्हटल्याप्रमाणे 'बेकारांना काम उपलब्ध करून देण्यासाठी पोषक धोरणाचा अवलंब करून शासनसंस्था या हक्काची खात्री देईल,' अशी पुष्टी केली म्हणजे झाले. असे केल्याने शासनसंस्थेवर कायदेशीर कोणतीच जबाबदारी पड़त नसल्याने नवे प्रश्न उभे राहणार नाहीत. पण काय सांगावे. कुणीतरी सर्वोच्च न्यायालयाकडे प्रादेश याचिकेच्या (writ petition) आधारे धाव घेईल आणि 'बेकारांसाठी काम उपलब्ध होईल अशी धोरणे' शासन राबवीत नाही अशी तक्रार करील. यावर सर्वोच्च न्यायलयाला विचार करून काही ना काही निकाल द्यावा लागणार. न्यायालयाच्या कक्षेबाहेर असलेल्या विषयांवर निर्णय देण्याकडे आजकाल न्यायालयांची प्रवृत्ती दिसते.

कसेही असले तरी, रोजगाराचा हक्क कायद्याच्या कक्षेत आणला नाही आणि प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी केली नाही, तर आदिशेशय्यांना ते मान्य होणार नाही. त्यांचा आग्रह आहे की, रोजगाराचा हक्क परिणामकारकरीत्या प्रत्यक्षात यावयाचा असेल तर तो 'कायद्याच्या कक्षेत यावयासच हवा. त तरच कुणीही व्यक्ती प्रादेश याचिकेद्वारे न्यायालयात जाऊन त्या हक्काची अंमलबजावणी करून घेऊ शकेल. लोकहितासाठीचा दावा असेही त्याचे स्वरूप राहू शकेल. त्यानुसार एखाद्या नागरिकाच्या अथवा समाजाच्या मूलभूत हक्कांची अमलबजावणी करण्यासाठी न्यायालयाकडे दाद मागता येईल. असे केल्याने काय होईल याचा तपशील आदिशेशय्या यांनी सांगितला आहे. ते म्हणतात :– घटनेतील मूलभूत हक्कांच्या परिच्छेदात रोजगाराच्या हक्काचा समावेश केल्याने या हक्काची न्यायप्रविष्टता मान्य होईल. देशातील दारिद्र्याच्या व्यापक प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी ही न्यायप्रविष्टता जरूरीची आहे. या तरतुदीमुळे. आपल्या हक्काची परिपूर्तता न केल्याबद्दल कुणीही व्यक्ती केन्द्र अथवा राज्य सरकारला न्यायालयात आव्हान देऊन त्या हक्काची पूर्ण आणि तातडीने अंमलबजावणी अथवा योग्य असा भरपाईचीही मागणी करू शकेल. त्यामुळे त्या हक्काची पूर्तता करण्यासाठी शासनाला सदैव तत्पर राहावे लागेल. त्याकरिता जिल्हा, गट आणि खेडे या पातळीवर रोजगार आणि बेकारी याविषयीच्या अद्यावत माहितीचे संकलन आणि तिचे पुनर्विलोकन सातत्याने करीत राहावे लागेल. त्याचबरोबर कामाच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी गटपातळीवरील योजना सतत तयार ठेवाव्या लागतील. काम देता येत नसेल तर पर्यायी व्यवस्था म्हणून सामाजिक सुरक्षा व्यवस्थेची आखणी करून त्यामार्फत बेकार व्यक्ती आणि तिच्या कुटुंबाला आवश्यक असणाऱ्या अन्न, वस्त्र आणि निवाऱ्यासाठीची तरतूद करावी लागेल.''[६] रोजगाराचा हक्क कायद्याच्या कक्षेत आणल्यानंतर तो कसा बजावला जाईल याचे हे निखळ वर्णन आहे. परंतु ते त्रोटक आहे; ते विस्ताराने मांडावयास हवे.

आदिशेशय्या म्हणतात, त्याप्रमाणे 'कोणीही: न्यायालयात जाऊ शकेल.' खरे तर, बहुधा प्रत्येकजणच न्यायालयात जाईल; रोजगाराचा हक्क बजावण्यासाठी नव्हे तर बेकार राहिल्याबद्दल मिळेल ती भरपाई आणि मिळेल तो बेकारभत्ता घेण्यासाठी. परिणामी, देशाच्या संपूर्ण न्यायव्यवस्थेतील सार्वजनिक वा खाजगी, औपचारिक वा अनौपचारिक, 'रोजगारात' वाढ होईल. हे आव्हान पेलावयाचे असेल तर, आदिशेशय्या म्हणतात त्याप्रमाणे शासनाला 'सदैव तत्पर राहावे लागेल; त्याकरिता जिल्हा, गट आणि खेडे या पातळीवर रोजगार आणि बेकारी याविषयीच्या अद्यावत माहितीचे,

संकलन आणि तिचे पुनर्विलोकन सातत्याने करीत राहावे लागेल. त्याचबरोबर रोजगाराच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी गट पातळीवरील योजना सतत तयार ठेवाव्या लागतील.' आमची शंका एवढीच की, एवढी जय्यत तयारी करण्याकरिताच देशातील सर्व बेकारांना काम मिळेल, आणखी योजनांची गरज पडणार नाही. आखलेल्या योजना तशाच फडताळात पडून राहतील.

राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला रोजगाराचा हक्क मिळवून देण्याविषयी चाळीस वर्षापूर्वीच आदेश दिलेला असूनही तो प्रत्यक्षात आणून 'उशीरा का होईना, दारिद्र्याच्या व्यापक प्रश्नाची सोडवणूक' करण्याच्या या साध्यासुध्या विधिसिद्ध तरतुदीकडे गेल्या चाळीस वर्षांत सर्वांनीच दुर्लक्ष करावे याबद्दल दुःख आणि आश्चर्य वाटते. आदिशेशय्या म्हणतात, ''स्वातंत्र्य मिळून चाळीस वर्षे उलटली तरीदेखील रोजगाराचा हक्क भारतीय राज्यघटनेत मूलभूत हक्क म्हणून समाविष्ट झालेला नाही, हेच आपले. दारिद्र्य आणि विपन्नावस्था यांचे महत्त्वाचे कारण आहे.''[७] बेकारी व दारिद्र्य नष्ट करण्याचा आदिशेशय्या यांनी सुचविलेला एवढा सुलभ व हमखास उपाय अजूनही अमलात आणता येईल. रोजगाराचा हक्क मूलभूत व कायदेशीर केला म्हणजे झाले.

रोजगाराचा हक्क मूलभूत करून कायद्याच्या कक्षेत आणावयाचा असेल तर, तो अधिक तपशिलात मांडून त्याची कायदेशीर अंमलबजावणी कशी करता येईल ते पाहिले पाहिजे. या संदर्भात रोजगाराच्या हक्कात रोजगाराच्या निवडीच्या हक्काचाही समावेश असेल काय, हे प्रथमतः स्पष्ट व्हावयास हवे. उदाहरणार्थ, संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्कांच्या जाहिरनाम्यात म्हटले आहे की, प्रत्येकाला रोजगाराचा हक्क आहे त्याचप्रमाणे रोजगाराच्या निवडीचाही हक्क आहे. आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांच्या आंतरराष्ट्रीय कराराच्या (International Covenant of Economic, Social and Cultural Rights) सहाव्या कलमानेसुद्धा रोजगाराच्या निवडीचा हक्क मान्य केलेला आहे. त्यात म्हटले आहे : ''या कराराला मान्यता देणारी सर्व राष्ट्रे रोजगाराचा हक्क मान्य करतात; या हक्कामध्ये प्रत्येकाला आपल्या चरितार्थासाठी आपल्या निवडीनुसार रोजगाराची संधी मिळविण्याच्या हक्काचाही समावेश आहे.'' या सर्व करारमदारांत भारत सहभागी आहे. म्हणून, आदिशेशय्या म्हणतात तसे त्यांचे नैतिक बंधन आपणावर आहे.

तार्किकदृष्ट्या, जी माणसे अगोदरच रोजगारात आहेत त्यांनादेखील रोजगाराची नवी निवड करण्याचा हक्क मिळाला पाहिजे, कारण बहुसंख्य माणसे आपापल्या प्राप्त रोजगारात समाधानी नाहीत. त्यांना आपापली आवडती क्षेत्रे न मिळण्याचे महत्त्वाचे

कारण म्हणजे काही प्रकारच्या रोजगाराची मागणी पुरवठ्यापेक्षा बरीच अधिक असते. आता जर प्रत्येकाला त्याच्या आवडीनुसार रोजगार द्यावयाचा असेल तर त्यासाठी नव्यानेच सुरुवात करावी लागेल आणि सबंध शासनसंस्थेलाच एका अवाढव्य रोजगार विनिमय केंद्राचे स्वरूप येईल. मुळात रोजगारात असलेले आणि बेकार असलेले या सर्वांना केवळ रोजगाराचा हक्क नव्हे तर त्यांच्या त्यांच्या निवडीनुसार रोजगार उपलब्ध करून द्यावयाचा म्हणजे हा प्रश्न किती व्यापक आणि जटिल आहे याची कल्पना येईल.

तात्पर्य, रोजगाराच्या हक्कामध्ये रोजगाराच्या निवडीचा हक्क समाविष्ट करणे अशक्य आहे. सुदैवाने, हे आता अधिकृतपणे मान्य करण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या श्रम मंत्रालयाने राष्ट्रीय विकास मंडळाच्या विचारार्थ जे टिपण अलीकडेच तयार केले आहे त्यात म्हटले आहे : 'काही मर्यादेतच रोजगाराच्या हक्काचा समावेश मूलभूत हक्कांच्या यादीत करणे शक्य होईल. कारण प्रत्येकाला त्याची कुवत आणि आवड यानुसार रोजगाराची हमी देणे शक्य नाही. त्या टिपणात पुढे म्हटले आहे :' म्हणून, जेव्हा रोजगाराच्या हक्काचा मूलभूत हक्कांत समावेश करण्यासाठी घटनादुरुस्तीचा प्रस्ताव आणला जाईल तेव्हाच ज्या परिस्थितीत आणि ज्या पद्धतीने रोजगाराची हमी दिली जाणार आहे ते स्पष्ट करणारा स्वतंत्र कायदा संमत करून घेणे अत्यंत आवश्यक आहे.''[११] प्रत्यक्षात अशा स्वतंत्र कायद्याची अंमलबजावणी करण्यात अडचणी निर्माण होतील. कारण, ज्या परिस्थितीत आणि ज्या मर्यादांमध्ये एखाद्या मूलभूत हक्काची हमी कायद्याने दिली जाते त्यावेळी त्या कायद्यालाच वेळोवेळी न्यायालयात आव्हान दिले जाऊन ती परिस्थिती आणि त्या मर्यादा कितपत 'रास्त' आहेत याविषयीच वाद निर्माण होईल. हे सर्व टाळावयाचे असेल तर रोजगाराच्या हक्काचा मूलभूत हक्कांत समावेश करताना हे स्पष्ट करावे लागेल की, आपला हा हक्क बजावताना प्रत्येकाने देऊ केलेले काम स्वीकारले पाहिजे. देऊ केलेले काम ज्यांना पसंत नसेल ते रोजगाराचा हक्क बजावू शकणार नाहीत. देऊ केलेले काम जे पत्करतील ते अतिगरजू असणार, त्यांनाच प्राधान्य मिळाले पाहिजे. इतरांना काही काळ थांबावे लागेल. श्रममंत्रालयाच्या टिपणात जवळपास हेच म्हटले आहे. ''या तरतुदीमुळे सदरच्या कार्यक्रमातून कोणालाही वगळले जाणार नसले तरी, खरोखरीच गरजू आणि गरीब व्यक्ती याचा स्वीकार करतील असे गृहीत धरले आहे; खरे तर, प्राधान्ये करून, याच गटाचा समावेश सदरच्या कार्यक्रमात करावयास हवा.''[१२] जेव्हा एखादी कायदेशीर तरतूद एखाद्या मूलभूत हक्कासाठी काही अटी आणि मर्यादा

घालते तेव्हा साहजिकच काही लोकांना तो हक्क बजावता येत नाही. त्यामुळे, या तरतुदींमुळे कोणालाही वगळले जाणार नाही या म्हणण्याला काही अर्थ नाही. ती मंत्रालयाची भाषा आहे एवढेच.

सोविएत युनियनमध्ये रोजगाराच्या हक्काबरोबर व्यवसायनिवडीचा हक्क आहे; परंतु तिथे तो वेगळ्या संदर्भात मांडण्यात आला आहे. त्या देशाच्या १९७७ च्या राज्यघटनेतील चाळीसाव्या कलमात नागरिकांच्या हक्कांचा उल्लेख आहे. त्यानुसार नागरिकांना रोजगाराचा हक्क, केलेल्या कामाचे परिमाण आणि गुणवत्ता यानुसार वेतन मिळविण्याचा हक्क आणि व्यापार, व्यवसाय आणि नोकरी यांची निवड करण्याचा हक्क असे हक्क देण्यात आलेले आहेत. मात्र त्याचबरोबर 'समाजाच्या गरजांची योग्य ती दखल घेऊन' अशी पुस्तीही जोडलेली आहे. एवढेच नव्हे तर, कलम ६० नुसार निवडलेल्या व सामाजिकदृष्ट्या उपयुक्त व्यवसायात काळजीपूर्वक काम करण्याचे तसेच शिस्तपालनाचे बंधनही सर्वांवर आहे. या संदर्भात दोन गोष्टी विशेषेकरून ध्यानात घ्यावयास पाहिजेत. पहिली म्हणजे, व्यवसाय निवडीच्या हक्काला 'समाजाच्या गरजां'चे बंधन आहे; त्याचबरोबर निवडलेला व्यवसाय 'समाजोपयोगी' असावयास हवा. अशा रितीने, व्यक्तीच्या हवकाचा तिच्या सामाजिक कर्तव्याशी मेळ घालण्यात आला आहे. कामाचा हक्क आणि व्यवसायनिवडीचा हक्क प्रत्येक व्यक्तीला देता येईल, परंतु ते काम समाजोपयोगी असावयास हवे. भारतीय राज्यघटनेच्या ३९, ४१ आणि ४३ कलमांमध्ये हा मुद्दा आढळत नाही. जेव्हा रोजगाराचा हक्क मूलभूत केला जाईल तेव्हा हा मुद्दा त्यामध्ये योग्य रितीने अंतर्भूत करावयास हवा.

या अनुषंगाने, 'समाजोपयोगी' आणि 'समाजाच्या गरजा' यासारखे शब्दप्रयोग काहीसे संदिग्ध आहेत. त्यामुळे त्यांचा अर्थ स्पष्ट करण्याचा व्यापक अधिकार न्यायालयाला मिळेल. आणखी एक गोष्ट म्हणजे, 'समाजोपयोगी' काय आहे आणि 'समाजाच्या गरजेचे' काय आहे यामध्ये फरक करावा लागेल; तसेच 'समाजाच्या गरजेचे' काय आहे आणि त्याकरिता समाज किती किंमत द्यावयास समर्थ आणि उत्सुक आहे यामध्येही फरक करावा लागेल. कोणतीही गोष्ट उपयोगी असल्याखेरीज तिची गरज भासणार नाही हे खरे. परन्तु जे जे उपयोगी आहे ते ते सर्व गरजेचे असण्याची शक्यता नाही, आणि असेलच तर ज्या प्रमाणात ते उपलब्ध असेल त्याच प्रमाणात गरजेचे असण्याचा संभव नाही.

या मुद्यातूनच आपण दुसऱ्या मुद्याकडे वळू. रोजगाराचा हक्क द्यावयाचा, परन्तु त्यासाठी वेतन किती असावे? सोविएत रशियाच्या राज्यघटनेतील चाळीसावे कलम

सांगते की, 'कामाचे परिमाण आणि गुणवत्ता यानुसार वेतन मिळण्याचा हक्क' असावा. याचा अर्थ असाही होतो की, जास्त परिमाणाला आणि उच्च गुणवत्तेला अधिक मोबदला मिळेल. मात्र विशिष्ट गुणवत्तेच्या विशिष्ट परिमाणाला किती मोबदला द्यावयाचा हे या संदर्भात सांगितलेले नाही. भारतीय राज्यघटनेत वेतनाचा संदर्भ आहे खरा, परंतु त्याला जोडून कामाचे परिमाण आणि गुणवत्ता याविषयी काहीच उल्लेख केलेला नाही. कलम ३९ मध्ये व्यक्तीकडून केल्या जाणाऱ्या कामाचे परिमाण आणि गुणवत्ता यांचा संदर्भ न देता प्रत्येकाला 'जगण्यासाठी पुरेशा साधनांचा' हक्क देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे कलम ४३ मध्ये प्रत्येकाचा 'जीवनावश्यक वेतना'चा हक्क मान्य केला आहे आणि त्याचबरोबर 'चांगले जीवनमान जगता येऊन फुरसतीच्या वेळेचा तसेच सामाजिक आणि सांस्कृतिक संधींचा पूर्ण उपयोग करता येईल अशी कामाची परिस्थिती' उपलब्ध करण्याची आवश्यकता सांगितली आहे. हे सांगताना व्यक्तीने केलेल्या कामाचे परिमाण आणि गुणवत्ता यांचा संदर्भ नाही. प्रत्येक व्यक्तीला केवळ ती आहे म्हणूनच जगण्यासाठी पुरेशा साधनांचा आणि चांगले जीवनमान जगण्याचा हक्क आहे असे मानलेले दिसते. असे एकांगी हक्क आणि त्यांची हमी निवडणुकीच्या जाहिरनाम्यात शोभून जाते, परंतु शासनसंस्थेचे धोरणात्मक मार्गदर्शक तत्त्व म्हणून ती किती योग्य आहे याबद्दल विचार व्हावा. एक गोष्ट स्पष्ट आहे की, मूलभूत हक्क म्हणून अशा एकांगी तरतुदी अर्थव्यवस्थेला पूर्णपणे मारक ठरतील.

अर्थव्यवस्थेमधूनच दैनंदिन पुरेसा रोजगार निर्माण व्हावा आणि मागणीनुसार शासनाने काम देण्याचे प्रसंग कमीत कमी असावेत हे उघड आहे. ज्यावेळी अर्थव्यवस्था सर्वांना रोजगार पुरवू शकत नाही आणि त्यामुळे बेकारी उद्भवते त्याचवेळी नागरिकांच्या रोजगाराच्या हक्कांची जबाबदारी शासनावर आली पाहिजे. श्रम मंत्रालयाच्या टिपणात हा मुद्दा चांगल्या रितीने मांडलेला आहे. त्यात म्हटले आहे : ''रोजगाराचा हक्क या संकल्पनेसंबंधीचा सर्वसाधारण दृष्टिकोन असा आहे की, विकासाच्या प्रक्रियेतूनच लोकांना उत्पादक काम उपलब्ध होण्याजोगी परिस्थिती निर्माण व्हावी. परंतु हे होत नाही तोवर बेकार किंवा अर्धबेकारांना रोजगार देण्याचे बंधन शासनावर राहील. शिवाय, रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी जे विशेष कार्यक्रम आखले जातील, त्यात दिले जाणारे वेतन आणि कामाची परिस्थिती यांचा विपरीत परिणाम विकासाच्या प्रक्रियेवर होणार नाही याची दक्षता घ्यावयास हवी. श्रम मंत्रालयाच्या टिपणात याकडे दुर्लक्ष झालेले आहे. त्यात नमूद केलेल्या काही तरतुदींमुळे विकासाच्या नियमित प्रक्रियेवर प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव आहे.

उदाहरणार्थ, टिपणातील ह्या सूचना पहा : (६) प्रत्यक्ष गरज अशी आहे की, रोजगाराचा हक्क सतत अंमलात आणावयाचा असेल तर त्याकरिता खेडे / गाव पातळीवर पंचायत / नगरपालिका यासारखी कार्यदक्ष लोकनियुक्त स्थानिक संस्था असावयास हवी. कारण हमी दिलेल्या कामाचे नियोजन आणि अंमलबजावणी याच संस्थांना करावी लागणार आहे. त्यांनाच यासबंधीच्या दैनंदिन कामकाजाचे ओझे वाहावे लागेल आणि काम मागणाऱ्यांचे समाधान करावे लागेल. (12-iii) योजनेची कार्यवाही करण्यासाठी ज्या स्थानिक संस्थेवर जबाबदारी सोपविण्यात आलेली असेल त्या संस्थेच्या कार्यक्षेत्रातच सामान्यपणे काम उपलब्ध करुन द्यावे: (12 - iv) कामगारांना द्यावयाचे वेतन किमान वेतन कायदा, १९४८ नुसार त्या त्या राज्यातील / प्रदेशातील शेतमजूर / अकुशल मजूर यांच्यासाठी निर्धारित केलेल्या शेतमजूर/अकुशल किमान वेतनाइतके असावे. (12 - v) हमी दिल्याप्रमाणे काम देता न आल्यास, किमान वेतनाच्या एकतृतीयांश अथवा रुपये ५ यापैकी जी रक्कम अधिक असेल ती भत्ता म्हणून द्यावी.[१४]

तात्पर्य, रोजगाराची हमी अशी असावी की, काम प्रत्येकाच्या घराजवळ आणि शेतातील कामाइतकेच सोईस्कर असावे. मात्र मजुराला किमान वेतन कायद्यानुसार इतके वेतन मिळावे की जे त्याला शेतीमध्ये मिळत नाही आणि अल्प आणि अत्यल्प भूधारकांना स्वतःच्या शेतात काम करूनदेखील मिळत नाही. शिवाय रोजगार हमीचे काम खूपच शिथिल आणि सुलभ असते. कारण, त्याचे नियोजन आणि अंमलबजावणी स्थानिक संस्थांकडे असल्याने कामे चोख करून घेण्याऐवजी मजुरांना खूष ठेवण्याकडेच प्रवृत्ती राहणार. परिणामी माणसे शेतीच्या कामाऐवजी हमीकामांकड़े वळण्याचा संभव. एवढ्यावरच थांबणार नाही. याहीपेक्षा अनिष्ट होण्याचा धोका आहे. कारण प्रत्येक स्थानिक परिसरात प्रत्येकाला कायम स्वरूपाचे काम देता येणे अशक्य आहे, ते देता आले नाही तर किमान वेतनाच्या एक–तृतीयांश किंवा प्रतिदिन रु. ५ यापैकी अधिक असेल तेवढी रक्कम बेकारभत्ता म्हणून देल्याचा प्रस्ताव आहे. कामे काढणे आणि ती करवून घण्यापेक्षा बेकार भत्ता वाटणेच सर्व संबंधिताना अधिक सोईचे होईल आणि विकासाच्या प्रक्रियेची आणि संपूर्ण अर्थव्यवस्थेचीच अपरिमित हानी झाल्याखेरीज राहणार नाही.

हे टाळावयाचे असेल तर, कामाचा हक्क राज्यघटनेतील मूलभूत हक्कांत समाविष्ट करताना अतिशय काळजीने पावले टाकली पाहिजेत. 'जगण्याची पुरेशी साधने' किंवा 'जीवनावश्यक वेतन' यासारखे संदिग्ध शब्दप्रयोग आणि 'चांगले जीवनमान

जगता येऊन फुरसतीच्या वेळेचा तसेच सामाजिक आणि सांस्कृतिक संधींचा पूर्ण उपयोग करता येईल अशी कामाची परिस्थिती' यासारखे पोकळ शब्दप्रयोग कटाक्षाने टाळले पाहिजेत. शासन जे काम जेथे व जसे देईल ते पत्करावे लागेल हे स्पष्ट केले पाहिजे. त्याकरिता रोख वेतन मिळेल आणि प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीला शासन ते जाहीर करील. कामाचे स्वरूप व प्रकार, त्याच्याशी संबंधित कामाची परिस्थिती आणि वेतन या गोष्टींना न्यायालयात आव्हान देता येणार नाही. या बाबी न्यायालयाकरवी ठरविता वा सुधारता येणार नाहीत. ज्याला हवे त्याला काही तरी काम मिळाले पाहिजे एवढीच गोष्ट न्यायालयाधीन ठेवता येईल. शासन देईल ते काम, जशी असेल तशी कामाची परिस्थिती आणि प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीला शासन जाहीर करेल ते वेतन या गोष्टी मान्य कराव्या लागतील. त्यात सुधारणा करवून घ्यावयाच्या असतील तर त्यासाठी राजकीय पातळीवर संघर्ष करावा लागेल आणि ते करण्याचा हक्क प्रत्येक नागरिकाला आहे. रोजगाराचा हक्क हा राजकीय हक्क असे जेव्हा पंतप्रधान आपल्या भाषणात म्हणाले तेव्हा त्यांना हाच अर्थ अभिप्रेत असावा असे वाटते. अर्थव्यवस्थेला यापेक्षा अधिक परवडणारे नाही. हेही सोपे नाही. म्हणून अशा प्रकारच्या किमान हक्काने प्रारंभ करणे आणि यथावकाश अनुभवाने त्यामध्ये सुधारणा करीत जाणे हाच व्यवहारी मार्ग ठरेल.

पूर्वी म्हटल्याप्रमाणे, रोजगाराच्या हक्काला राज्यघटनेत मूलभूत हक्क म्हणून समाविष्ट करताना शक्यतो आर्थिक विकासातूनच आवश्यक तो रोजगार निर्माण होत राहील असे पाहिले पाहिजे. म्हणून अर्थव्यवस्थेत व आर्थिक विकासात अधिकाधिक किती रोजगार निर्माण होऊ शकतो आणि त्याकरिता कोणती धोरणे असावीत याचा विचार करू. त्यादृष्टीने भूतकाळातील धोरणे असमाधानकारक किंवा अगदीच चुकीची होती का आणि तसे असल्यास त्यामध्ये कोणते बदल करावे लागतील याचा प्रथम विचार करू. यासाठी 'आठव्या पंचवार्षिक योजनेचा (१९९०-९५) दृष्टिकोन' हा नियोजन मंडळाने प्रसृत केलेला मसुदा उपयुक्त आहे. हा मसुदा नव्या नियोजन मंडळाने मे १९९० मध्ये केला. त्यात भारतातील नियोजन आणि विकासाबद्दलचा आजवरचा आणि नव्या नियोजन मंडळाने सुचविलेला नवा दृष्टीकोन यावर सुस्पष्ट विवेचन आहे. जुन्या दृष्टिकोनापासून आपला दृष्टिकोन मूलगामी वेगळा आहे अशी नव्या नियोजन मंडळाची धारणा आहे. तसेच, असा बदल करण्यासाठी लोकमताची अनुकूलता आहे असा मंडळाचा विश्वास आहे. अलीकडेच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीचे निकाल आणि त्यापाठोपाठ केंद्र शासनात झालेल्या

बदलाचा उल्लेख करून नियोजन मंडळ म्हणते : ''जनतेने पुन्हा एकदा लोकशाही जागरूकता दाखवून दिली आहे. तिला बदल हवा आहे विकासाचा नवा मार्ग हवा आहे. प्रत्येकाला पुरेसा रोजगार मिळावा, त्याला अन्न, वस्त्र, निवाऱ्याच्या किमान अपेक्षित गरजा भागविता याव्यात आणि शिक्षण, आरोग्य, बालकल्याण व इतर संबंधित सुविधा मिळाव्यात यादृष्टीने विकासाची दिशा व रीती बदलावी लागेल.''

''जनतेचे औद्योगिक व्यावसायिक कौशल्य, शक्ती आणि नवनिर्मितीची क्षमता उपयोगात आणणे आणि त्याकरिता जनतेचा सहभाग मिळविणे हेच अर्थपूर्ण विकासाचे मर्म आहे. नवे नियोजन मंडळ या दृष्टीने आठव्या योजनेचे पुनर्विलोकन करीत आहे. नियोजनाची चार दशके उलटली तरी पूर्ण रोजगार निर्माण करणे, प्रत्येकाला किमान जीवनमान उपलब्ध करून देणे ही उद्दिष्टे आपणास पूर्ण करता आली नाहीत, याची खंत मंडळाला आहे. ही मूलभूत उद्दिष्टे साध्य करणे हेच १९९० च्या दशकातील विकासाचे सूत्र असले पाहिजे.''[१५]

अखेरीस सारांशाने या मसुद्यात म्हटले आहे : ''आठव्या योजनेचा भर रोजगारावर आहे. प्रत्येक नागरिकाला रोजगाराच्या हक्काची हमी दिलेली आहे ती विकासाच्या समुचित कार्यक्रमांमधून प्रत्यक्षात उतरविण्याचा ही योजना प्रयत्न करील. विकासाच्या प्रक्रियेतून बऱ्याच मोठ्या प्रमाणात आणि विस्तृत स्वरूपात नव्या रोजगाराच्या संधी निर्माण कराव्या लागतील त्यातून आजच्या बेकार व अर्धबेकार तसेच नव्याने भरती होणाऱ्या मजुरांना रोजगार देणे शक्य होईल. अशानेच पूर्ण रोजगाराचे स्वप्न साकार करता येईल. नव्या योजनेचा भर विकासाचा दर किती असावा याऐवजी विकासाचा गाभा काय असावा यावर आहे. विकास असा असावा की, त्यामुळे प्रत्येकाला लवकरात लवकर अर्थपूर्ण काम, योग्य असे किमान राहणीमान आणि आवश्यक सामाजिक सुविधा देणे शक्य होईल.''[१६]

पूर्वीच्या दृष्टिकोनांपेक्षा हा दृष्टिकोन वेगळा आहे हे खरे आहे. विकासाचा गाभा हा विकासाच्या दरापेक्षा वेगळा आहे यावर मंडळाने बोट ठेवले आहे. ही केवळ शाब्दिक कसरत नाही. म्हणूनच या नव्या दृष्टिकोनात काय वेगळेपण आहे किंवा असू शकेल हे बघावयास हवे. परंतु वेगळेपण काय आहे ते पाहण्यापूर्वी जुन्या आणि नव्या दृष्टिकोनात वरकरणी दिसणारा फरक काढून टाकावयास हवा. उदाहरणार्थ, पूर्वीच्या नियोजन मंडळांनी केवळ विकासाच्या दरावरच भर दिला असे म्हणणे योग्य नाही; तसेच आताचे नियोजन मंडळ केवळ रोजगारावरच सारा भर देऊ पाहते असे सुचविणे हेही रास्त नाही.

केवळ 'विकासासाठी विकास' म्हणजे काय आणि त्यातून काय निष्पन्न होऊ शकेल, याचा प्रथम विचार करू. विकासाकरिता विकास म्हणजे ज्यायोगे राष्ट्रीय उत्पादनाच्या वाढीचा दर महत्तम होईल असा विकास. म्हणजे उत्पादन कशाचे, ही बाब गौण होते. परंतु हेच करावयाचे तर, एकच कार्यक्रम हाती घेता येईल, तो म्हणजे उंदराचे किंवा दुसऱ्या कोणत्याही अधिक जननवेग असणाऱ्या प्राण्याचे उत्पादन करणे. यात मानवी रोजगार कमीत कमी असणार. केवळ अधिक वेगाने प्रजोत्पत्ती करू शकणाऱ्या जाती शोधून काढण्यात, उंदीर अथवा दुसऱ्या ज्या प्राण्यांची उत्पत्ती होत असेल त्या प्राण्यांना आवश्यक ते खाद्य उत्पादन करण्यात आणि या कामात गुंतलेल्या माणसांना किमान राहणीमान पुरविण्याच्या कामात माणसांना रोजगार मिळू शकेल. पूर्वीच्या नियोजन मंडळांनी अशा प्रकारच्या विकासाच्या योजना बनविल्या नाही ते त्यांना विकासाचा हा प्रकार माहीत नव्हता म्हणून नव्हे, तर केवळ राष्ट्रीय उत्पादनाच्या वाढीचा महत्तम दर गाठण एवढेच त्यांचे उद्दिष्ट नव्हते म्हणून. उंदरांच्या उत्पतीमुळे विकासाचा दर गाठता येणे शक्य असले तरी त्यांनी तो कार्यक्रम सुचविला नाही, कारण त्यामधून मानवी उपभोगाच्या वस्तूंचा पुरवठा वाढत नाही. म्हणून, समंजसपणे म्हणावयाचे तर पूर्वीच्या नियोजन मंडळांचाही उद्देश केवळ उत्पादनाच्या वाढीचा दर वाढविणे हा नव्हता. मानवी उपभोगाच्या वस्तूंच्या उत्पादनाची अधिकाधिक वाढ सतत व टिकाऊ स्वरूपाची करणे हा होता. त्यांत कोणत्या वस्तूंचे उत्पादन करावयाचे हा महत्त्वाचा भाग आहे. त्याचा तपशील आपण यथावकाश पाहू.

आता केवळ पूर्ण रोजगाराचा विचार करू. अधिकाधिक रोजगार निर्माण करील असा विकास हा त्याचा अर्थ आहे. हा हेतू साध्य करावयाचा तर, खड्डे खणणे आणि भरणे हा सुविख्यात कार्यक्रम हाती घेता येईल. अर्थात, या कार्यक्रमातदेखील काही माणसे स्वतःसाठी आणि खड्डे काढणे व पुन्हा भरणे या कामात गुंतलेल्यांसाठी अन्न आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या उत्पादनात गुंततील. नवीन नियोजन मंडळ असा विकास सुचवीत नाही. कारण, मंडळाला या शक्यतेची जाणीव नाही म्हणून नव्हे तर मंडळाला केवळ पूर्ण रोजगार साधावयाचा नसून अर्थपूर्ण कामातून पूर्ण रोजगार साधावयाचा आहे म्हणून. खड्डे खणणे आणि पुन्हा भरणे हे अर्थपूर्ण काम होत नाही, कारण त्यातून मानवी उपभोगाच्या वस्तूंचा पुरवठा वाढत नाही. म्हणून पुन्हा समंजसपणे सांगावयाचे तर मानवी उपभोगाच्या वस्तूंचा अधिकाधिक पुरवठा सातत्याने आणि टिकाऊ पद्धतीने उपलब्ध होईल अशा उपक्रमात अधिकाधिक

रोजगार निर्माण करणे हे नव्या नियोजन मंडळाचे उद्दिष्ट असावे. कोणत्या वस्तूंचे उत्पादन करावयाचे याचा तपशील महत्वाचा आहे. त्याकडे आपण यथावकाश वळू परंतु नव्या नियोजन मंडळालाही उत्पादनवाढीच्या दराकडे पूर्णपणे दुर्लक्ष करता येणार नाही. कारण, त्यांच्याच शब्दात सांगावयाचे तर, विकासातून फक्त अर्थपूर्ण कामच उपलब्ध झाले पाहिजे असे नसून प्रत्येकाला **लवकरात लवकर** (स्वराघात आमचा) योग्य किमान राहणीमान आणि आवश्यक सामाजिक सुविधा मिळावयास हव्यात. आता कोणतेही उद्दिष्ट लवकरात लवकर गाठावयाचे तर वेगाचा विचार आलाच. शिवाय आजची उद्दिष्टे साध्य होताच ती पुढे सरकतात, कारण लोकांच्या अपेक्षा वाढतात. त्याखेरीज लोकसंख्याही वाढत असते. हे सर्व लक्षात घेता नवे नियोजन मंडळ मानवी उपभोगाच्या वस्तूंच्या उत्पादनवाढीच्या दराकडे कसे दुर्लक्ष करू शकेल हे समजत नाही. मग जुन्या आणि नव्या दृष्टिकोनांत फरक तो काय?

फरक असा दिसतो. पूर्वीच्या नियोजन मंडळांचे उद्दिष्ट मानवी उपभोगाच्या वस्तूंच्या उत्पादनवाढीचा **महत्तम दर** होते. नव्या नियोजन मंडळाचे उद्दिष्ट या वस्तूंच्या उत्पादनातील **रोजगार महत्तम** असावा असे आहे. हाच फरक दुसऱ्या पद्धतीने सांगता येईल. पूर्वीची नियोजन मंडळे मानवी उपभोगाच्या वस्तूंचा उत्पादनवाढीचा दर महत्तम करण्यासाठी त्या उत्पादनांतील रोजगार कमी करावा लागला तर ते अपरिहार्य मानीत. याउलट, नवे नियोजन मंडळ वस्तूंच्या उत्पादनातील वर्तमान रोजगार महत्तम करण्याकरिता उत्पादनवाढीचा वेग काहीसा कमी करावा लागला तर ते समर्थनीय मानील.

खरोखरीच उत्पादनवाढीच्या दराचे महत्तमीकरण आणि रोजगाराचे महत्तमीकरण या दोन उद्दिष्टांमध्ये विरोध आहे का ? निदान वीस वर्षामागे तरी असा काही विरोध असेल अशी शंका नव्हती. चौथ्या पंचवार्षिक योजनेत (१९६९-७४), बेकारीच्या समस्येचा अत्यंत काळजीपूर्वक विचार करून असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते की, ''रोजगार वाढविण्याचा एकमेव मार्ग उत्पादन वाढवून आर्थिक विकास जास्तीत जास्त वेगाने साधणे हाच आहे.''[१७] हा विचार नव्या नियोजन मंडळाला पटत नाही. कारण, उत्पादनवाढीच्या प्रमाणात रोजगार वाढलेला दिसत नाही. किंबहुना, त्यातील अंतर वाढतच आहे असे दिसते. उदाहरणार्थ, १९७२-७३ ते १९७७-७८ या पाच वर्षांच्या काळात, राष्ट्रीय उत्पादनाच्या एक टक्का वाढीबरोबर रोजगारात फक्त ०.६ टक्का एवढीच वाढ झाली आहे. १९७७-७८ ते १९८२-८३ या पुढच्या पाच वर्षात हे प्रमाण ०.५५ टक्क्यांपर्यन्त घसरले आणि त्यापुढच्या

१९८२-८३ ते १९८७-८८ या पाच वर्षात ते अधिकच घसरले आहे. आज उत्पादनाच्या एक टक्का वाढीबरोबर रोजगार फक्त ०.३८ टक्क्यांनीच वाढत आहे. याचा अर्थ असा की, राष्ट्रीय उत्पादन दरसाल ५ टक्क्यांनी वाढले, आणि हे सोपे नाही, तरी रोजगार फक्त १.९ टक्क्यांनीच वाढेल. ही वाढ लोकसंख्येच्या वाढीपेक्षा कमीच आहे. यावरून हे स्पष्ट आहे की, जर विकास आहे या पद्धतीनेच होत राहिला तर आजची बेकारी नष्ट करुन नवीन मजुरांना रोजगार देण्यासाठी आर्थिक विकासाचा वेग आज आहे त्यापेक्षा बराच अधिक ठेवावा लागेल.

उदाहरणच घ्यायचे तर, लोकसंख्येची वयवारी लक्षात घेता १९९०-९५ काळात कामकरी वर्गात ३७ दशलक्षांची भर पडेल आणि १९९५-२००० या काळात आणखी ४१ दशलक्षांची भर पडेल. यामध्ये सध्याची २८ दशलक्ष बेकारांची संख्या मिळवावी लागेल. तात्पर्य, १९९५ पर्यंत पूर्ण रोजगार साधावयाचा असेल तर १९९०-९५ या काळात २८+३७=६५ दशलक्ष नवे रोजगार निर्माण करावे लागतील. याचा मेळ सध्याच्या ३०० दशलक्ष या अंदाजित रोजगाराशी घातल्यास, १९९५ पर्यंत पूर्ण रोजगार साधण्यासाठी १९९०-९५ या काळात रोजगार सालिना ४ टक्के दराने वाढवावा लागेल. उत्पादनातील १ टक्का वाढीबरोबर रोजगारात ०.३८ टक्के वाढ हेच आजचे प्रमाण पुढे चालू राहिले तर १९९५ पर्यंत पूर्ण रोजगार साधण्यासाठी १९९०-९५ या काळात उत्पादनवाढ प्रतिवर्षी १०.५ टक्के असावी लागेल. हे अशक्य आहे याबद्दल दुमत नाही. म्हणून, विकासाचा पूर्वीचा ढाचा पुढे चालू ठेवल्यास, आठव्या योजनेअखेरीस पूर्ण रोजगार साधणे हे विचारापलीकडचे आहे.

पूर्ण रोजगार २००० सालापर्यंत साधावयाचा असे ठरविले तर १९९०-२००० या दहा वर्षांत २८+३७+४१ = १०६ दशलक्ष नवे रोजगार उपलब्ध करून द्यावे लागतील. त्यासाठी रोजगारवाढीचा वेग प्रतिवर्षी ३ टक्के आणि उत्पादनवाढीचा वेग प्रतिवर्षी ८ टक्के करावा लागेल. हेदेखील अशक्य शाहे.

तात्पर्य, सन २००० पर्यंत पूर्ण रोजगाराचे उद्दिष्ट साधावयाचे असेल आणि वार्षिक उत्पादनवाढीचा दर ६ टक्क्यांपेक्षा अधिक संभवनीय नसेल तर उत्पादनवाढ आणि रोजगारवाढ यांचे प्रमाण आताच्या ०.३८ वरुन ०.५० पर्यंत न्यावे लागेल. त्याचा उत्पादन वाढीच्या वेगावर प्रतिकूल परिणाम होऊन तो प्रतिवर्षी ५ टक्क्यांपर्यंत घसरला तर हेच प्रमाण ०.६ पर्यंत वाढवावे लागेल, आणि त्यामुळे उत्पादनवाढीचा वेग ४ टक्क्यांपर्यंत उतरला, तर ते प्रमाण ०.७५ करावे लागेल. या सर्व गणिताचा मतितार्थ एवढाच की, रोजगारावर भर देताना त्याचा उत्पादनवाढीच्या वेगावर

प्रतिकूल परिणाम होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. ती न घेतल्यास, सन २००० पर्यंत पूर्ण रोजगार साधणे दुरापास्त होईल. पूर्ण रोजगारही नाही आणि आर्थिक विकासही नाही अशी परिस्थिती होईल.

रोजगार वाढविण्यासाठी विकासाचा ढाचा संपूर्णपणे बदलावा लागेल, हे नव्या नियोजन मंडळाचे मुख्य सूत्र आहे. त्याकरिता मंडळाने जी धोरणविषयक मार्गदर्शक तत्त्वे मांडलेली आहेत ती अशी : ''(१) ज्या क्षेत्रांमध्ये रोजगारनिर्मितीची अधिक शक्यता आहे अशा क्षेत्रांच्या विकासावरच भर दिला जाईल; (२) प्रत्येक मोठ्या क्षेत्रात, अधिक रोजगार निर्माण करण्याची क्षमता असलेल्या वस्तू आणि उत्पादनक्षेत्रे यांना अग्रक्रम दिला जाईल; अर्थातच हे करताना संबंधित वस्तूंचा पुरवठा व मागणी (निर्यातीसह) यांचे संतुलन साधण्याचा प्रयत्न राहील; (३) शक्य असेल त्या त्या उत्पादन कार्यक्रमात, भांडवलाच्या प्रमाणात अधिक रोजगार देणाऱ्या उत्पादनतंत्राला प्रोत्साहन दिले जाईल. नवीन भांडवल गुंतवणुकीत बेलगाम आणि अनेकदा अनावश्यक असणारी वाढ करण्याच्या प्रवृत्तीला आळा घातला जाईल; आणि (४) सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक प्रामुख्याने रोजगाराला प्रोत्साहन देणाऱ्या क्षेत्रांत आणि उत्पादनात होईल आणि वित्तीय व पतपुरवठाविषयक धोरणांचा उपयोग करून, अधिक रोजगारक्षम क्षेत्रांत व तंत्रविज्ञानात खाजगी क्षेत्रातील गुंतवणूक होईल असा प्रयत्न केला जाईल.''

वरीलपैकी पहिल्या दोन मुद्यांचा संबंध कशाचे उत्पादन करावयाचे, म्हणजे कोणत्या वस्तू वा सुविधा यांचे उत्पादन करावयाचे, याच्याशी आहे. यातील मुख्य कल्पना अशी की, मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होऊ शकेल अशा वस्तूंचे उत्पादन करावयाचे. तिसरा मुद्दा उत्पादनतंत्राशी संबंधीत आहे. ज्यामध्ये भांडवलाच्या प्रमाणात रोजगार अधिक असेल अशा उत्पादन तंत्राचा उपयोग करून इच्छित वस्तूंचे उत्पादन करावयाचे. शेवटचा चौथा मुद्दा गुंतवणूक पद्धतीविषयीचा आहे. नियोजन मंडळाला गुंतवणुकीचा ओघ जास्त रोजगारक्षमता असलेल्या क्षेत्रांकडे व तंत्रविज्ञानाकडे वळवावयाचा आहे. पूर्ण रोजगार साधण्याकरिता सांगितलेल्या या चार धोरणात्मक मार्गदर्शक तत्त्वांचा आपण आता तपशिलात क्रमाने विचार करू.

प्रथमतः पहिले दोन मुद्दे विचारार्थ घेऊ. या बाबतीत नियोजन मंडळाचा दृष्टिकोन सर्वस्वी सदोष आहे. कशाचे उत्पादन करावयाचे हे ठरविण्याचा त्यांनी निवडलेला निकष विचित्र आहे. आठव्या योजनेचा भर रोजगारावर असेल असे ठरविल्यानंतर, जास्त रोजगारक्षमता असलेल्या वस्तूंचे उत्पादन करावयाचे असे मंडळ सुचविते. खड्डे काढून ते पुन्हा बुजविण्याची शिफारस करण्यासारखेच हे आहे. आपण काय

उत्पादन करतो याकडे दुर्लक्ष करून केवळ रोजगारासाठी विकास असे याचे वर्णन करता येईल. काय उत्पादन करावयाचे हे ठरविताना पुरवठा आणि मागणीच्या सन्तुलनाचा विचार करावा लागेल असे म्हटले आहे. परंतु ते ओघाने आलेले दिसते. जणू काही नियोजन मंडळाच्या कोणीतरी आर्थिक सल्लागाराने पुटपुटावे, ''पुरवठा आणि मागणीचे संतुलन'' आणि नियोजन मंडळाने तत्परतेने प्रतिसाद द्यावा, ''अर्थातच''. याचा अर्थ आणि अन्वय काय याचा विचार केलेला दिसत नाही, अशी पुस्ती जोडून नियोजन मंडळाने पहिल्या दोन्ही मार्गदर्शक तत्त्वांना काट दिला आहे. ती दोन्ही तत्त्वे सांगतात की, जास्त रोजगारक्षमता असंलेल्या वस्तूंचे उत्पादन करावयाचे. उलटपक्षी पुरवठा आणि मागणीचे संतुलन साधावयाचे तर, कोणत्या वस्तूंचे उत्पादन करावयाचे ते वस्तूंच्या रोजगारक्षमतेने ठरत नाही तर प्रामुख्याने मागणीने ठरते. क्षणभर मानू की, ज्या वस्तूंच्या उत्पादनामुळे प्रत्येकाला योग्य किमान राहणीमान आणि आवश्यक सामाजिक सुविधा मिळतील, अशाच वस्तूंकरिता मागणी राहील. मग, त्यांच्या रोजगारक्षमतेची काळजी न करता, त्या वस्तू आवश्यक प्रमाणात लगोलग निदान लवकरात लवकर उत्पादन कराव्या लागतील. सारांश, पहिली दोन्ही तत्त्वे पूर्णतया सदोष व अशास्त्रीय आहेत. ती सोडून द्यावी लागतील.

परंतु कोणत्याही वस्तूचे उत्पादन वेगवेगळे तंत्रज्ञान किंवा तंत्रविज्ञान वापरून करता येते आणि प्रत्येकाची रोजगारक्षमता वेगवेगळी असते. त्यामुळे तिसरा मुद्दा येतो. तो असा की, शक्य असेल तिथे ज्या उत्पादनतंत्रात भांडवलाच्या प्रमाणात अधिक रोजगारक्षमता असेल अशा उत्पादनतंत्राचा उपयोग करावा. 'शक्य असेल तिथे' याचा नेमका अर्थ काय ते नियोजन मंडळ स्पष्ट करीत नाही. योग्य अर्थ निघेल या दृष्टीनेच आपण त्याचा विचार करू.

एखाद्या वस्तूचे उत्पादन करण्याकरिता श्रम आणि भांडवल यांचे वेगवेगळे प्रमाण असलेली दोन उत्पादन तंत्रे उपलब्ध असतील तरच उत्पादनतंत्राच्या निवडीचा प्रश्न उद्भवतो. नियोजन मंडळाचे म्हणणे असे की, अशा परिस्थितीत भांडवलाच्या प्रमाणात अधिक श्रम वापरणारे उत्पादनतंत्र निवडावे. हे म्हणताना अभिप्रेत आहे की, या उत्पादनतंत्रात दुसऱ्या उत्पादनतंत्राच्या तुलनेने, वस्तूचे ठराविक उत्पादन करण्याकरिता अधिक श्रम पण कमी भांडवल लागते. परन्तु हे सर्व सामान्यतः खरे नाही. अनेकदा असे आढळते की, एकच उत्पादन देणाऱ्या दोन उत्पादनतंत्रांमध्ये ज्या तंत्रात अधिक श्रम वापरले जातात त्यामध्ये भांडवल कमी वापरले जात नाही, तर श्रम आणि भांडवल दोन्हीही जास्त वापरली जातात.

टंकलेखकाचेच उदाहरण घ्या. तो टंकलेखनाची सर्व कामे हाताने करतो. तो कार्बनपेपर वापरून १+४ प्रती काढतो. कार्बन पेपरला फारसे ज्यादा भांडवल लागत नाही. परंतु कार्बनपेपरसारखे साधे साधन वापरूनही एक टंकलेखक चार इतर टंकलेखकांचा रोजगार काढून घेतो. म्हणून कार्बनपेपरवर बंदी घालून एकाऐवजी पाच टंकलेखकांना रोजगार देणे समर्थनीय आहे का याचा विचार करू. या दोन तंत्रांना आपण (अ) कार्बनपेपर सहित टंकलेखन आणि (आ) कार्बनपेपरविरहित टंकलेखन असे म्हणू. विषय सोपा करण्यासाठी (अ) तंत्रामध्ये वापरलेल्या कार्बन पेपरचा भांडवली व्यय नगण्य आहे असे मानून त्याकडे दुर्लक्ष करू. त्याचबरोबर (आ) तंत्रामध्ये लागणाऱ्या जास्तीच्या कार्यालयीन जागेच्या भांडवली व्ययाकडेही, तो नगण्य नसतानाही, दुर्लक्ष करू. या गृहितांनुसार, दोन्हीही तंत्रांमध्ये प्रतिकामगारामागे भांडवल सारखेच आहे; दर टंकलेखकामागे एक टंकलेखनयंत्र. परंतु कार्बनपेपरविरहित टंकलेखन करताना पाच टंकलेखनयंत्रे लागतात. म्हणजेच, कार्बनपेपरसहित टंकलेखनाच्या तुलनेने पाच पट भांडवल आणि पाचपट श्रम लागतात. दोन्ही तंत्राचे उत्पादन सारखेच आहे. मग कोणते तंत्र वापरावयाचे? याबाबत नियोजन मंडळाने तरी निर्णय लांबणीवर टाकण्याचे कारण नाही. कार्बनपेपरवर बंदी घालून आपल्याच कार्यालयात पाचपट टंकलेखकांना रोजगार देणे मंडळास शक्य आहे.

नियोजन मंडळ हे करणार नाही, तर ते कार्बनपेपरचा वापर चालू ठेवतील असे वाटते. अर्थात मंडळाचा निर्णय योग्य आहे, परंतु तो का योग्य आहे ते मंडळाला समजले पाहिजे. कारण साधे आहे. कार्बनपेपरविरहित तंत्रज्ञानात, उत्पादनात कोणतीही भर न घालता श्रम आणि भांडवल यांचा ज्यादा वापर होतो. त्यामुळे वापरलेले ज्यादा श्रम आणि भांडवल अनुत्पादक ठरतात. अर्थशास्त्रीय परिभाषेत हे सांगावयाचे तर उत्पादनतंत्र अकार्यक्षम आहे एवढ्याचसाठी ते त्याज्य आहे. दोन्ही तंत्रांमध्ये भांडवलश्रम प्रमाण एकच आहे हा मुद्दा अप्रस्तुत आहे. हे उदाहरण अपवादात्मक नाही. बहुतेक सर्व कालबाह्य उत्पादनतंत्रांच्याबाबतीत असेच असण्याची शक्यता आहे. उदाहरणार्थ, हातकताई आणि हातबुनाईमध्ये गिरणीतील कताई आणि बुनाईपेक्षा दर कामगारामागे कमी भांडवल लागते, म्हणून त्यांचे समर्थन होऊ शकत नाही. कारण, त्यामध्ये उत्पादन केलेल्या प्रतिमीटर कापडामागे श्रम आणि भांडवल हे दोन्हीही जास्त लागतात हे दाखवून देता येईल. तंत्राच्या निवडीत, दर मजुरामागे लागणारे भांडवल हा निर्णायक निकष असू शकत नाही. विशिष्ट उत्पादनासाठी लागणारे एकंदर श्रम आणि भांडवल हा समर्पक निकष मानला पाहिजे. दोन

उत्पादनतंत्रांपैकी, जर एक तंत्र विशिष्ट उत्पादनासाठी भांडवल आणि श्रम जास्त वापरत असेल तर ते उत्पादनसाधनांचा अपव्यय करणारे असल्यामुळे त्याज्य ठरते. एक एक उदाहरण स्वतंत्रपणे तपासून पाहिले तर, सर्वसाधारण उपभोगाच्या वस्तूंच्या उत्पादनात वापरलेल्या बहुतेक सर्व पारंपरिक उत्पादनतंत्रांची गत अशीच आहे.

आता काहीसे अधिक अनुकूल उदाहरण घेऊ, की जेथे विशिष्ट उत्पादनासाठी, दोन उत्पादन तंत्रांपैकी एका तंत्रामध्ये दुसऱ्याइतकेच भांडवल परंतु त्यापेक्षा अधिक श्रम लागतात. आपले टंकलेखनाचेच उदाहरण घेतल्यास, आपण प्रती काढण्यासाठी कार्बन पेपरच्या तंत्रापेक्षा श्रमाची अधिक बचत करणारे दुसरे तंत्र विचारात घेऊ; ते तंत्र म्हणजे नकला काढणारे यंत्र (copying machine). आता आपणापुढे निवड करण्यासाठी दोन पर्यायी उत्पादनतंत्रे आहेत; एक म्हणजे हाताने वापरावयाचे टंकलेखनयंत्र आणि दुसरे म्हणजे नकला काढणारे यंत्र. टंकलेखन यंत्राची किंमत ५,००० रुपये आणि नकला काढणाऱ्या यंत्राची १,००,००० रुपये आहे असे मानू. त्याचबरोबर, असंभवनीय असले तरी, असे मानू की, २० टंकलेखक २० टंकलेखनयंत्रांचा उपयोग करून नकला काढणाऱ्या एका यंत्राइतक्या प्रती तयार करू शकतात. अशा रितीने दोन्हीही तंत्रांचा भांडवली व्यय १,००,००० रुपये आहे. एका नकला काढणाऱ्या यंत्राला लागणाऱ्या जागेच्या २० पट जागा २० टंकलेखनयंत्रांना आवश्यक लागेल या बाबीकडे आपण दुर्लक्ष करू. उपलब्ध भांडवलात नकला काढणारे यंत्र जेवढ्या माणसांना रोजगार देऊ शकते त्याच्या २० पट रोजगार टंकलेखन यंत्रामुळे देता येईल. एका माणसाला रोजगार देण्यासाठी टंकलेखनयंत्राला ५००० रुपये भांडवल लागेल तर नकला काढणाऱ्या यंत्राला १,००,००० रुपये लागतील. तिसरे मार्गदर्शक तत्त्व इथे सरळ लागू पडते. 'भांडवल गुंतवणुकीत अनिर्बंध आणि वेळप्रसंगी अनावश्यक वाढ करण्याची प्रवृत्ती' असा नियोजन मंडळ ज्याचा उल्लेख करते त्याचे उदाहरण म्हणून नकला काढणाऱ्या यंत्राकडे बोट दाखविता येईल. त्यावर बंदी घातली तर या संदर्भात समर्थनीय ठरेल.

परंतु, आपण 'कोऱ्या पाटीवर लिहीत नाही' याबद्दल नियोजन मंडळ जागरूक आहे. म्हणून केवळ नव्या गुंतवणुकीच्या बाबतीत अग्रक्रम बदलण्याचा मंडळाचा मनोदय आहे. येथे चौथे मार्गदर्शक तत्त्व येते. ते असे : ''सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणुकीचा भर रोजगाराला प्रोत्साहन देणाऱ्या क्षेत्रांवर आणि उत्पादन तंत्रावर राहील. तसेच वित्तीय व पुरवठाविषयक धोरणांचा उपयोग करून ती अधिक रोजगारक्षम क्षेत्रांकडे आणि तंत्रविज्ञानाकडे आकर्षिली जाईल असा प्रयत्न राहील.'' आपल्या

टंकलेखनयंत्र विरुद्ध नकला काढणाऱ्या यंत्राच्या उदाहरणात, वरील धोरणानुसार सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमात नकला काढणाऱ्या यंत्रावर बहुधा बंदी येईल. याउलट, खाजगी क्षेत्रात टंकलेखनयंत्रात गुंतवणुकीस प्रोत्साहन देऊन नकला काढणाऱ्या यंत्रात गुंतवणूक अवघड केली जाईल. त्यासाठी टंकलेखन यंत्रावरील उत्पादन शुल्क कमी केले जाईल आणि नकला काढणाऱ्या यंत्रावरील वाढविले जाईल, अथवा टंकलेखन यंत्रावर विकास सूट दिली जाईल आणि नकला काढणाऱ्या यंत्रावर दिली जाणार नाही. पर्यायाने, सुलभ पतपुरवठा करून टंकलेखन यंत्राच्या उत्पादनाला प्रोत्साहन दिले जाईल, तर पतपुरवठा रोखून नकला काढणाऱ्या यंत्राच्या उत्पादनाला प्रतिबंध केला जाईल. तसेच नकला काढणाऱ्या यंत्राच्या उत्पादनासाठी विदेशी सहयोगाला परवानगी दिली जाणार नाही.

टंकलेखन यंत्र विरुद्ध नकला काढणारे यंत्र या उदाहरणात श्रमप्रधान तंत्र आणि भांडवलप्रधान तंत्र यामध्ये निवड करण्यासंबंधीचे महत्त्वाचे प्रश्न स्पष्ट होतात. वर्तमानकालीन तसेच भविष्यकालीन रोजगारावर प्रतिकूल परिणाम होणार असूनही भांडवलप्रधान तंत्रविज्ञान स्वीकारले जाते; कारण, त्यामुळे श्रमाची उत्पादकता वाढते आणि अधिक वेतन देणे शक्य होते. श्रमाची उत्पादकता वाढणे हा आर्थिक विकासाचा अत्यंत महत्त्वाचा निकष मानला जातो. मालक आणि रोजगार असलेले भाग्यवान कर्मचारी दोन्हीही भांडवलप्रधान तंत्रविज्ञानास अनुकूल असतात. कामगार व मालकांच्या दृष्टीने त्यामुळे कर्मचाऱ्यांची संख्या कमी झाल्याने त्यांना अधिक वेतन देऊन समाधानी राखता येते आणि श्रमव्यवस्थापनाचे काम सुलभ होते. कर्मचाऱ्यांना वाढीव श्रमउत्पादकतेचे लाभ वाढीव वेतनाने मिळतात.

नियोजन मंडळाला हे मान्य होणार नाही. त्यांच्या दृष्टीने, ज्या भांडवलातून २० टंकलेखकांना रोजगार देता येईल तेवढे सर्व भांडवल नकला काढणाऱ्या यंत्राच्या एका चालकावरच वापरले जाते, त्यातून उद्भवणारा फायदा त्या चालकाला आणि त्याच्या मालकाला मिळतो आणि १९ टंकलेखक बेकार होतात. या दृष्टिकोनातून, श्रमप्रधान तंत्रविज्ञानाचा गुण असा की, त्यायोगे उपलब्ध भांडवल बऱ्याच कामगारांमध्ये विभागून देता येते. असे केल्याने श्रमाची उत्पादकता कमी राहिली तरी जास्त कामगारांना रोजगार मिळतो. उदाहरणार्थ, टंकलेखन यंत्रे अशा रूपात उपलब्ध असतात की, एका नकला काढण्याच्या यंत्रात जेवढे भांडवल गुंतलेले असते, तेवढेच भांडवल एका कामगाराऐवजी २० कामगारांना वाटता येते. भांडवलाची कमतरता असताना, उपलब्ध भांडवल अशा रितीने गुंतवावे की, श्रमउत्पादकता

कितीही कमी राहिली तरी प्रत्येकाला रोजगार मिळाला पाहिजे, असेच येथे अभिप्रेत आहे. यातूनच तार्किक निष्कर्ष निघतो की, प्रत्येकजण कमी श्रमउत्पादकतेनुसार कमी वेतन घ्यायला तयार असतो. असे झाले तर तंत्रविज्ञान टप्प्याटप्प्याने प्रगत करता येईल. कुणालाही आपल्या रोजगाराला मुकावे लागणार नाही आणि उत्पादकता वाढेल त्याप्रमाणे टप्प्याटप्प्याने वेतनही वाढेल.

प्रत्यक्षात तंत्रविज्ञानाची प्रगती अशी होत नाही. जरी नियोजन मंडळाने कोऱ्या पाटीवर लिहावयाचे ठरविले तरी (आपण तसे लिहीत नाही याची मंडळाला जाणीव आहे), मंडळाला तंत्रवैज्ञानिक प्रगतीचे असे नियंत्रण करता येणार नाही. तंत्रविज्ञानाच्या प्रगतीची स्वतःची स्वतंत्र गती असते. तंत्रविज्ञानाची प्रगती अर्थव्यवस्थेत सर्वत्र सारखी आणि प्रमाणबद्ध होत नाही. केव्हाही श्रमउत्पादकता, व त्याकारणाने वेतन, सर्व प्रकारच्या उत्पादनात तसेच एकाच उत्पादनात गुंतलेल्या सर्व उद्योगसंस्थांत सारखे नसते. कमी उत्पादक तंत्रविज्ञानात, म्हणजेच कमी वेतन मिळणाऱ्या उपक्रमात गुंतलेले कामगार समाधानी नसतात. अधिक उत्पादक तंत्रविज्ञानात गुंतलेल्या कामगारांच्या वेतनाकडे ते आशेने पाहतात आणि तेवढ्या वेतनाची मागणी करतात. परिणामी, मालक अधिक उत्पादक तंत्रविज्ञानाचा अवलंब करतात, त्यामुळे सद्य व संभाव्य रोजगार कमी होतो. त्याविषयी मालकांना आणि कामगारांनाही खंत नसते. तात्पर्य, अधिक वेतनाच्या मागणीला प्रतिसाद म्हणून किंवा तिची पूर्वतयारी म्हणून, मालक सतत अधिक उत्पादक तंत्रविज्ञानाच्या शोधात असतात. अशा रितीने तंत्रविज्ञानाची प्रगती होत असते. या परिस्थितीत, कमी उत्पादक तंत्रविज्ञानाचा हेतुपुरस्सर पुरस्कार केल्यास, त्यात गुंतलेल्या मजुरांच्या वेतनापोटी भरीव अर्थसहाय्य द्यावे लागेल आणि तरीही ते तंत्रविज्ञान टिकाव धरू शकणार नाही. वित्तीय आणि पतपुरवठ्याची धोरणे वापरून या प्रक्रियेला आळा घालण्याचा प्रयत्न केला तर ते आर्थिक विकासास बाधक ठरेल.

विकसित भांडवलशाही राष्ट्रांनी अधिक उत्पादक तंत्रविज्ञानाचा अवलंब करताना त्याला बेकारांसाठी सामाजिक सुरक्षा आणि बेकारभत्त्याची जोड दिलेली आहे. जेथे मागणीच्या अभावामुळे अथवा तंत्रविज्ञानाच्या प्रगतीत अल्पकालीन बेकारी निर्माण होते तेथे हे योग्य व शक्य आहे. भारतातील बेकारी ही भांडवलाच्या कमतरतेतून निर्माण झालेली आहे आणि म्हणून ती अविकसित अर्थव्यवस्थेला अंगभूत आहे. त्यामुळे आपण कमी उत्पादक तंत्रविज्ञानाला चिकटून राहू शकत नाही किंवा बेकारभत्ताही देऊ शकत नाही. आपण करायला हवे ते हे की, अधिक उत्पादक

तंत्रविज्ञान त्याज्य न मानता उपलब्ध भांडवल शक्य तेवढ्या जास्त लोकांमध्ये विभागणे. याचा एक मार्ग म्हणजे कामाचे तास कमी करणे. उदाहरणार्थ, पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे, १९९० मधील अंदाजित श्रमसंख्या ३२८ दशलक्ष आहे; त्यापैकी ३०० दशलक्ष श्रमिकांना रोजगार उपलब्ध असून २८ दशलक्ष श्रमिक बेकार आहेत. म्हणजे, एकंदर श्रमसंख्येपैकी ८.५ टक्के श्रमिक बेकार आहेत. यात सुधारणा करावयाची असेल तर रोजगारातील श्रमिकांच्या कामाचे तास १० टक्क्यांनी कमी करावयाचे व त्यासोबत त्याच प्रमाणात त्यांचे वेतनही घटवावयाचे. अर्थात या रितीने औपचारिकपणाने कामाचे तास व वेतन कमी करणे हे फक्त संघटित क्षेत्रातच शक्य आहे. यास्तव बेकारीचे दडपण कमी करण्यासाठी कामाचे तास व वेतनातील घट काहीशी अधिक ठेवावी लागेल. तसेच, आहे त्याच भांडवलातून जास्त लोकांसाठी रोजगार निर्माण करावयाचा तर अशी घट कामाच्या दररोजच्या तासात करून चालणार नाही तर कामाच्या वार्षिक तासात करावी लागेल. रजेचे दिवस वाढविणे किंवा निवृत्तीचे वय कमी करणे असे काही मार्ग त्यासाठी अनुसरता येतील. कार्यवाहीचा तपशील स्वतंत्रपणे ठरविता येईल. महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, अशा रितीने कामाचे तास घटवून रोजगार व्यापक केल्याने आर्थिक विकासाच्या प्रगतीला बाधा येणार नाही. शिवाय, त्यामुळे राज्यघटनेच्या कलम ४३ मध्ये अपेक्षिल्याप्रमाणे कामगारांना 'फुरसतीच्या वेळेचा आणि सामाजिक व सांस्कृतिक संधींचा पूर्ण उपभोग' घेता येईल.

हे वाटते तितके विक्षिप्त नाही. सोविएत युनियनमध्ये १९२७ साली बेकारी अस्तित्त्वात असताना कामाचा दिवस कमी करण्याचा निर्णय झाला होता. परंतु १९२७ ते १९२९ या दरम्यान वेगाच्या औद्योगीकरणाचे धोरण अंगीकारल्याने असा बदल करण्याचे कारण उरले नाही. अगदी अलीकडे, १९७० च्या दशकातील मंदीकाळात, वाढत्या बेकारीला आळा घालण्यासाठी फ्रान्समध्ये राष्ट्राध्यक्ष मितेराँ यांनी कामाचे तास कमी करण्याचा विचार मांडला आणि कामगार संघटनांनी त्याला मान्यताही दिली. परंतु, तो निर्णय कार्यान्वित करण्याच्या वेळेला शासनाच्या ध्यानात आले की, कामगार संघटनांनी, त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने, कामाचे कमी तास मान्य केले परंतु त्याला धरुन कमी वेतन मान्य केले नाही. साहजिकच ती योजना बारगळली.

भारतामध्ये सुशिक्षित महिलांच्या रोजगाराच्याबाबत हा एक चांगला व्यावहारिक उपाय होऊ शकेल. प्रत्येक कुटुंबामागे एक रोजगार असे म्हणून पद्धतशीरपणे महिलांना रोजगारापासून दूर ठेवण्याऐवजी पती व पत्नी या दोघांना काम करण्याची इच्छा असल्यास दोघांना अर्धवेळ काम देणे न्याय्य आणि रास्त ठरेल. पुरुष आणि स्त्रिया

यांच्या दर्जामधील समता प्रस्थापित करावयाची असल्यास, पुरुषांनी स्त्रियांबरोबर घराबाहेरील पगारी कामाबरोबरच घरातील बिनपगारी कामातही सारखीच भागिदारी केली पाहिजे.

ही चर्चा इथेच सोडून देऊ, कारण हे नियोजन मंडळाने सुचविलेले नाही. नियोजन मंडळाने यापूर्वी चर्चा केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांखेरीज ज्या इतर सूचना केल्या आहेत त्यांच्याकडे वळू. इथे सुदैवाने श्रमप्रधान तंत्रविज्ञानाचा पाठपुरावा कटाक्षाने केलेला दिसत नाही. सन २००० पर्यंत पूर्ण रोजगाराचे उद्दिष्ट साधण्यासाठी सुचविलेले मार्ग व अपेक्षा अशा आहेत : (१) शेतीचा जलद आणि भौगोलिकदृष्ट्या विस्तृत विकास केल्याने आतापर्यंत मागे राहिलेल्या प्रदेशांचा १९९० च्या दशकातील शेतीच्या विकासात महत्त्वाचा वाटा असेल; (२) विशेषतः तौलनिकदृष्ट्या प्रगत शेती असलेल्या प्रदेशात, धान्येतर अधिक किमती पिकांकडे लक्ष देणे; (३) लहान गावे आणि एकूण ग्रामीण भागात बिगर शेती व्यवसाय, विशेषत: कारखानदारीची वाढ होण्यासाठी आवश्यक ते सहाय्य देणे; (४) विकेंद्रित कारखानदारीवर भर देऊन उपभोग्य वस्तू आणि निर्यात करावयाच्या वस्तूंचे उत्पादन वाढविणे; (५) मूलभूत भौतिक सुविधा आणि निवासस्थाने यांच्या बांधकामांचा व्यापक कार्यक्रम हाती घेणे; (६) मुख्यतः ग्रामीण भागात मूलभूत सामाजिक सुविधा, शिक्षण आणि आरोग्य यांचा विस्तार करून त्यांना बळकटी आणणे. ही सर्व 'श्रमप्रधान असलेली क्षेत्रे आणि उपक्षेत्रे' आहेत असे म्हटले आहे. परंतु त्यापैकी बरीचशी काही वेगळ्या स्वतंत्र निकषांच्या आधारावरही निवडता येतील. उदाहरणार्थ, शेतीच्या दृष्टीने अधिक अनुकूल प्रदेशावर लक्ष केंद्रित करुन शेती उत्पादनाची विशिष्ट पातळी गाठल्यानंतर, त्यापुढील शेती विकासाचे प्रयत्न कमी अनुकूल प्रदेशात व्हावयास पाहिजेत ते तेथील विकास श्रमप्रधान आहे म्हणून नव्हे. किंबहुना, बऱ्याच प्रतिकूल प्रदेशातील विकासाकरिता मोठ्या प्रमाणावर भांडवलाची गरज लागेल. त्याचप्रमाणे, तौलनिकदृष्ट्या विकसित शेतीच्या प्रदेशात, धान्येतर अधिक किमतीच्या पिकांचे उत्पादन वाढविणे ही एक नैसर्गिक प्रक्रिया असून तिला पाठिंबा देऊन तिचा पाठपुरावा केला पाहिजे, पण ते श्रमप्रधान आहे म्हणून नव्हे तर त्या वस्तूंसाठी मागणी आहे. म्हणून ग्रामीण भागात बिगर शेती व्यवसाय, विशेषतः कारखानदारीची वाढ होणे जरूरीचे आहे; त्यामुळे ग्रामीण जीवन अधिक विविध बनेल, त्याचबरोबर ग्रामीण भागातील बेकार आणि अर्धबेकार माणसे शहरी भागात कामाच्या शोधात जाणार नाहीत. अशा प्रकारचा औद्योगिक विकास लघु आणि

विकेंद्रित उद्योगात असणेही अपरिहार्य आहे. परंतु तो श्रमप्रधान असण्याचे कारण नाही आणि तसा तो असणारही नाही. हा औद्योगिक विकास लहान परंतु आधुनिक कारखानदारीने झाला तर, त्यातील श्रमप्राधान्य शहरी भागातील कारखानदारीपेक्षा वेगळे असण्याची शक्यता नाही. थोडक्यात, नियोजन मंडळाने केलेल्या या सूचना आजवर अनुसरलेल्या मार्गापासून आमूलाग्र भिन्न आहेत असे म्हणता येत नाही. विशेष ध्यानात घ्यावयाची गोष्ट म्हणजे, यातील कोणत्याही योजनेबाबत श्रमप्रधान तंत्रविज्ञानाचा स्पष्ट आग्रह नियोजन मंडळ धरत नाही, विकासाची ही प्रक्रिया यांत्रिक शेती नको म्हणत नाही किंवा ग्रामीण भागातील बिगर शेती व्यवसाय परंपरागत ग्रामीण उद्योगच असले पाहिजेत असेही उघडपणे म्हणत नाही. कदाचित तपशिलात गेले म्हणजे श्रमप्राधान्यतंत्राचा पाठपुरावा करणे नियोजन मंडळालाही अडचणीचे होत असावे.

तात्पर्य, वर उल्लेख केलेल्या (१) ते (४) बाबींमुळे रोजगार फार वाढेल असे दिसत नाही. सध्या राष्ट्रीय उत्पादनाची वाढ आणि रोजगाराची वाढ यांचे प्रमाण जे ०.३८ आहे, ते फारतर ०.४० पर्यंत वाढेल, त्यापेक्षा अधिक नाही. त्यामुळे सन २००० पर्यंत पूर्ण रोजगाराची स्थिती निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय उत्पादनात प्रतिवर्षी ७.५ टक्क्यांची वाढ होणे जरूरीचे आहे. शासनाने अंतिमत: मंजुरी दिल्याप्रमाणे, राष्ट्रीय उत्पादनात वार्षिक ५.५ टक्के आणि रोजगारात वार्षिक ३ टक्के अशी वाढ होईल असे धरले आहे असे समजते. म्हणजे राष्ट्रीय उत्पादनाची वाढ आणि रोजगाराची वाढ यांतील प्रमाण आज ०.३८ आहे ते ०.५४५ होईल असे मानले आहे. वर उल्लेखिलेल्या (१) ते (४) बाबींमुळे हे घडून येण्याची शक्यता नाही.

तसे पाहता (५) आणि (६) या बाबींमुळेच अधिक रोजगार उपलब्ध होण्याचा संभव आहे. या बाबी म्हणजे मूलभूत प्राकृतिक आणि सामाजिक सुविधा बळकट करणे, मृद् व जलसंधारण आणि विकास, वनीकरण, रस्ते आणि इतर दळणवळण, वीज आणि इतर ऊर्जा, शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता आणि स्वच्छ पिण्याचे पाणी या आहेत. शिक्षण आणि आरोग्यासहित या सर्व बाबी गुंतवणूक स्वरूपाच्या असून त्यातील बव्हंशी गुंतवणूक सार्वजनिक असते. त्यांची रोजगारक्षमता सुपरिचित आहे. परंतु आजवर या बाबींकडे पुरेसे लक्ष दिले गेले नाही. कारण, उपलब्ध साधनसंपत्तीचा बराचसा भाग मूलभूत उद्योगांसाठी वापरला गेला. ते आवश्यकही होते. मात्र आता सार्वजनिक गुंतवणूक मोठ्या मूलभूत प्राकृतिक व सामाजिक पायाभूत सुविधांवर मोठ्या प्रमाणात झाली पाहिजे. साधनसंपत्ती मर्यादित

असल्यामुळे ज्या ज्या क्षेत्रात खाजगी गुंतवणूक होणे शक्य असेल त्या त्या क्षेत्रातील गुंतवणुकीची जबाबदारी खाजगी क्षेत्रावर सोपवावी लागेल. खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रांविषयीच्या तात्त्विक भूमिका आता बदलाव्या लागतील.

नव्याने रोजगार पुरविणारी त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील बेकारी व अर्धबेकारी नाहीशी करू शकतील अशी विकासकामे आणि त्याकरिता लागणारे भांडवल उभे करणे हे फार गुंतागुंतीचे यक्षप्रश्न आहेत. त्यांची तात्त्विक चर्चा करण्यापेक्षा, याविषयी सोविएत रशियाचा अनुभव ध्यानात घेऊन त्यापासून आपल्याला काय बोध घेता येईल हे पाहणे अधिक उपयुक्त ठरेल.

१९२० च्या दशकात, एखाद्या अविकसित कृषीप्रधान अर्थव्यवस्थेत आढळते त्याप्रमाणे, सोविएत युनियनमध्येदेखील ग्रामीण भागात छुपी बेकारी आणि शहरी भागात उघड बेकारी मोठ्या प्रमाणात होती. त्या दशकाच्या अखेरीपर्यंत बेकारीचे उच्चाटन करण्यात आले. तेव्हापासून तेथे अनैच्छिक बेकारी अशी नाहीच किंबहुना, नंतरच्या काळात सोविएत अर्थव्यवस्थेत कामगारांचा तुटवडा भासत आहे. हे सारे रोजगाराचा हक्क कायदेशीर बनवून घडले नाही तर त्यासाठी राजकीय, कधी कधी निर्दय, भार्गांचा अवलंब करून कामाची सक्ती करण्यात आली आणि स्टालिनप्रणित औद्योगीकरणात सर्व श्रमिकांना दाव्याला बांधण्यात आले. शक्य तेवढ्या वेगाने औद्योगीकरण साधणे हे उद्दिष्ट होते. त्याकरिता प्रचंड भांडवली कामे हातात घेतली, परंतु त्यात गुंतलेल्या कामगारांना लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंच्या उत्पादनाकडे लक्ष दिले नाही. याबाबत अर्थव्यवस्थेची क्षमता किती आहे तेही पाहिले नाही. असेल ती सारी साधनसंपत्ती भांडवली गुंतवणुकीकरिता खर्ची घालावयाची, एवढा एकच हव्यास होता.

भांडवलाची गुंतवणूक वाढविणे एवढे एकच उद्दिष्ट सोविएत आर्थिक व्यवस्थेचे केंद्रीय नियोजन मंडळ, मध्यस्थ संस्था आणि आर्थिक उपक्रम या सर्व पातळ्यांवर स्वीकारले होते. बांधकाम उपक्रमांना त्यांची लक्ष्ये ठरवून दिलेली होती आणि ती पूर्ण करण्यासाठी सढळ अर्थसंकल्पी तरतूद केलेली होती. उद्योगांना उत्पादन वाढविण्यासाठी अतिभव्य योजना दिल्या जात व त्याचबरोबर मुक्तपणे वित्तपुरवठाही केला जाई. साधनसामग्रीच्या किमती व वेतन हेतुपुरस्सर कमी ठेवण्यात आले होते. लक्ष्ये कितपत गाठली जातात यावरून उपक्रमांच्या यशाचे मोजमाप केले जाई. त्यामुळे सर्व उपक्रम अधिकाधिक साधनसामग्री आणि कामगार यांची मागणी करू लागले. सर्व गोष्टींची टंचाई निर्माण होऊन त्यांचे नियंत्रित वाटप करावे लागले.

त्यातून काळाबाजार सुरू झाला. जे साधनसामग्रीचे तेच श्रमशक्तीचे म्हणजे कामगारांचे. सर्वत्र जादा कामगार कामावर लावून घेतले गेले. अशा रितीने बेकारी नष्ट झाली एवढेच नाहीतर सर्वत्र कामगारांची टंचाई भासू लागली.

केवळ भांडवली बांधकामाकडेच लक्ष दिल्याकारणाने ग्राहकोपयोगी वस्तू व सेवांच्या उत्पादनाकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे कामगारांचे वेतन कमी असतानाही ग्राहकोपयोगी वस्तूंचा पुरवठा मागणीपेक्षा कमी होत राहिला. पण किमती नियंत्रित होत्या. परिणामी नियंत्रित वाटप, दुकानांसमोर मोठाल्या रांगा, काळाबाजार आणि असंतुष्ट व निराश ग्राहक. खरेदी करण्यासाठी बाजारात पुरेशा वस्तूच नसल्यामुळे बचत मात्र वाढत राहिली.

एका बाजूने अतिवित्तपुरवठा आणि दडपून खाली ठेवलेल्या किमती यांचा एक परिणाम असा झाला की, कामगारांमधील शिस्त आणि नीतिमत्ता कमी झाली. भांडवलशाही स्पर्धात्मक अर्थव्यवस्थेत कामगारांत शिस्त राहते, कारण तिथे कामावरून काढून टाकण्याचा धाक असतो आणि अधिक वेतन आणि लाभांशाचे आकर्षण असते. सोविएत अर्थव्यवस्थेत बेकारी नष्ट झाली, पण माणसे काम करेनाशी झाली. एकेकाळी कृषीप्रधान अविकसित रशियात छुपी बेकारी शेतीत व ग्रामीण भागात होती. ती आता आधुनिक कारखान्यात आली. माणसे बेकार होती या अर्थाने की, त्यांना पुरेसे काम नव्हते. परंतु त्यांना बेकारभत्त्याऐवजी वेतन मिळत होते. त्यामुळे कामाची अळंटळं, अनियमित हजेरी, सतत चहाच्या सुट्या, परवानगीशिवाय गैरहजेरी हे नित्याचे झाले. कामगारांतील बेशिस्त ही आता रशियातील समाजजीवनात खोलवर रुजली आहे. तिची मुळे ज्या पद्धतीने बेकारी नष्ट केली त्या पद्धतीतच आहेत हे ओळखले पाहिजे.

हे टाळून आपल्याला मार्ग काढता येतो का ते पाहू. सोविएत युनियनने वेगाने औद्योगीकरणासाठी भांडवलनिर्मितीवर भर दिला. त्याऐवजी आपण सामाजिक व प्राकृतिक मूलभूत सुविधा निर्माण करण्याकडे लक्ष देता येते का ते पाहू. याकरिताही भांडवलनिर्मिती लागतेच. त्यामुळे तत्त्व तेच राहते. परंतु आपल्या आवाक्यात काय आहे आणि ते साधण्याकरिता आपण कोणत्या संघटनासंस्था निर्माण कराव्यात याचा विचार करता येईल. त्याकरिता आपण रशियाचे अनुकरण करण्याचे कारण नाही. सुदैवाने आपण भांडवलवादी किंवा समाजवादी अशी कोणतीच एकांगी समाजरचना स्वीकारलेली नाही. त्यामुळे अजूनही आपणास पुष्कळच विचाराचे आणि कृतीचे स्वातंत्र्य आहे.

सामाजिक सुविधांमधील रोजगार आणि प्राकृतिक सुविधा निर्माण करण्यातील रोजगार यामध्ये फरक आहे. पहिला फरक म्हणजे, सामान्यतः सामाजिक सुविधांमधील रोजगार – शिक्षक, डॉक्टर, परिचारिका, सार्वजनिक आरोग्यतज्ज्ञ इत्यादी– हा सुशिक्षितांचा व कुशल व्यक्तींचा असतो; अर्थात, साफसफाईसारख्या रोजगारामध्ये काही अकुशल व्यक्ती असणारच आहेत. दुसरा फरक म्हणजे, या क्षेत्रांतील रोजगार कायम स्वरूपी असणार; कोणतीही सामाजिक सेवा एकदा निर्माण केली की ती पुढे चालू ठेवावी लागते. तिसरा फरक म्हणजे, असा रोजगार सामान्यतः विशिष्ट ठिकाणी स्थिर असतो; बदलीच्या कारणानेच त्यात कधीतरी बदल होतो. यादृष्टीने हा रोजगार स्थायी असतो.

सामाजिक सुविधांचा विस्तार आणि त्यांची दैनंदिन कार्यवाही यासंबंधी पुष्कळ अनुभव आहे. शिक्षण, सार्वजनिक आरोग्य आणि पिण्यासाठी स्वच्छ पाण्याचा पुरवठा या सुविधा अगदी अल्प प्रमाणात वाढविल्या आणि सुधारल्या तरीसुद्धा आपल्याकडील जवळजवळ सर्व सुशिक्षित बेकारांना रोजगार मिळेल. गरज आहे ती त्यांचे पगार देण्यासाठी पुरेशा पैशाची. त्यामानाने आजवर आपण ग्रामीण भागातील सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता आणि सफाई याकडे पुरेसे लक्ष दिले नाही. कारण, आपल्या समाजात खोलवर रुजलेली काही सदोष सांस्कृतिक मूल्ये आहेत. सर्व खेडी स्वच्छ ठेवण्यासाठी किमान दहा लाख अगदीच सुशिक्षित नसली तरी तशी प्रेरणा असलेली माणसे लागतील. त्यांना प्राथमिक शाळेतील शिक्षकाइतका पगार द्यावा. त्यामुळे एक तर या प्रकारच्या कामातील निरिच्छेची भरपाई होईल आणि दुसरे म्हणजे त्यांचे काम फक्त रस्ते झाडण्याचे नसून लोकांना सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता यांचे समान शिक्षण देणे हे आहे हे प्रस्थापित करणे शक्य होईल. स्वच्छता हे एक सांस्कृतिक मूल्य आहेच. शिवाय अर्थशास्त्रच पाहावयाचे तर सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छता यावर खर्च होईल त्यापेक्षा औषधपाण्याच्या खर्चात अधिक बचत होईल. नियोजन मंडळाने सुचविले आहे त्याप्रमाणे यातील बरीच कामे स्थानिक शासनाच्या योग्य त्या पातळीवर सोपविता येतील. केंद्र आणि राज्य शासनांनी त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्वीकारावी. या निधीमध्ये केंद्र व राज्य यांचा वाटा किती असेल ते त्यांनी आपसात ठरवावे.

याउलट प्राकृतिक सुविधा निर्माण करण्यातील रोजगार वेगळ्या प्रकारचा असतो. तो सामान्यत: अकुशल आणि अस्थायी असतो; रस्ते, मृद् व जल संधारणाची कामे इत्यादींवरील रोजगार त्या कामांबरोबर संपुष्टात येतो. अर्थात, इथेही वरच्या पातळीवर

सुशिक्षित व कुशल व्यक्ती रोजगारात असतीलच. वास्तू, जलसिंचन, विद्युत अभियंते वगैरे आणि काही अस्थायी रोजगाराचे रुपांतर यथावकाश स्थिर रोजगारात होते; पूर्ण झालेल्या प्रकल्पांची दैनंदिन कार्यवाही आणि देखभाल यासाठी त्यांची जरूरी असते. मात्र नवीन कामावरील रोजगार बहुतांशी अकुशल व्यक्तीचा आणि अस्थायी असाच असणार.

महाराष्ट्र शासनाच्या रोजगार हमी योजनेमुळे अशा प्रकारच्या कार्यक्रमाचा पुष्कळसा अनुभव आज जमेस आहे. या योजनेचे श्रेय वि. स. पागे यांच्या निष्ठेला द्यावे लागेल. त्यांनी निष्ठेने या योजनेच्या कार्यवाहीचा तपशील ठरविला आणि त्यासंबंधीच्या नियमावलीला कायद्याचे अधिष्ठान दिले. त्यामुळेच ही योजना बऱ्याच चांगल्या रीतीने प्रत्यक्षात उतरविता आली. केंद्रातील पूर्वीच्या शासनावर तिचा बराच प्रभाव पडला होता. या योजनेला काही कल्पनारम्य किंवा लोकप्रिय अशा ग्रामशासन आणि ग्रामपातळीवरील नियोजन या कल्पना चिकटविण्यात आल्या आणि त्यातून जवाहर रोजगार योजना उदयाला आली. पूर्वी उल्लेख केलेल्या श्रम मंत्रालयाच्या रोजगाराच्या हक्कासंबंधीच्या टिपणावरून याविषयी अधिक विचार झालेला दिसत नाही.

श्रम मंत्रालयाच्या टिपणात या कार्यक्रमाच्या कार्यवाहीसंबंधी ज्या सूचना केल्या आहेत त्यांचा यापूर्वी उल्लेख केलाच आहे. एका सूचनेचा पुन्हा उल्लेख करावयास हवा. ती म्हणजे, हमी कामांचे नियोजन आणि कार्यक्रमाची अमलबजावणी करण्याची जबाबदारी ग्रामपंचायत आणि नगरपालिका यांसारख्या लोकनियुक्त स्थानिक संस्थांकडे सोपवावी, हे व्यवहार्य नाही. सार्वजनिक खर्च करून करण्याजोगी कामे प्रत्येक स्थानिक क्षेत्रात उपलब्ध होऊ शकणार नाहीत. तसेच प्रत्येक व्यक्तीला कायमचे तिच्या घराच्या जवळपास काम देता येणे शक्य नाही. सतत रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी एकामागून एक अशी कामे काढावी लागतील आणि एका कामावरून दुसऱ्या कामावर कामगारांना जावे लागेल. जिथे काम उपलब्ध आहे तेथे जाण्यास कामगार तयार असतील तरच सतत रोजगार देता येईल. अर्थातच वाहतूक आणि कामाच्या ठिकाणी निवारा यांची सोय करावी लागेल. याकरिता, कामांचे प्राथमिक नियोजन ग्रामपंचायतीऐवजी निदान जिल्हा परिषदेच्या पातळीवर व्हावयास हवे. अशा कामांचे नियोजन व कार्यवाही अंतिमत: केंद्र आणि राज्य शासनाकडेच राहिली पाहिजे. पुढील दहावीस वर्षे जवळपास एक कोटी लोकांना या रीतीने रोजगार पुरवावा लागेल, हे लक्षात घेऊन कामगारांच्या संघटना उभ्या कराव्या लागतील. तरच कामगारांत किमान शिस्त ठेवून कामे करून घेता येतील आणि खर्च अनाठायी होणार नाही.

या बाबतीत आपल्याला पुरेसा अनुभव नाही. म्हणून दोन प्रकारच्या कामगार संघटना उभारून पहाव्या लागतील. एक तर कामगारांच्या सहकारी संघटना त्या जिल्ह्यातील कामे कंत्राटी पद्धतीने घेऊन पूर्ण करतील. आजवर रोजगार हमी कार्यक्रमात या संघटनांना योग्य वाव दिला गेला नाही. या संस्थांचे अध्यक्ष हे खाजगी कंत्राटदारच असतात. असे कारण त्यासाठी पुढे केले जाते. काही अंशी हे खरे आहे; आणि त्याकरिता या संघटनांकडून कामगारांचे शोषण होणार नाही याकरिता आवश्यक ती कायदेशीर तरतूद केली पाहिजे. परंतु कामगारांचे शोषण फक्त खाजगी व सहकारी कंत्राटदारच करतात असे नाही. रोजगार योजनांचा अनुभव पाहता महसूल विभाग, विकास विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा स्थानिक संस्था यांपैकी कोणीही रोजगार योजनांची कार्यवाही केली तरी कामगारांचे शोषण टळत नाही असे दिसते. म्हणून, रोजगार दिला तर शोषण होते, या भीतीपोटी गरीब माणसाला बेकार ठेवणे हे योग्य होणार नाही. बेकारीमुळे गरीब माणसे असंघटित व असहाय्य राहतात. उलट, रोजगार मिळाला तर तीच माणसे संघटित होऊन शोषणाविरूद्ध संघर्ष करू शकतात. कामगार सहकारी संघटनेचा अध्यक्ष तत्त्वतः का असेना, कामगारांनीच निवडून दिलेला असल्यामुळे त्याच्याविरुद्ध बंड करणे कामगारांना शक्य आहे; सरकारी अधिकाऱ्याविरूद्ध सहज शक्य नाही, कारण त्याला खालून वरपर्यंत संरक्षण असते.

शासनाच्या दृष्टीनेही काम मागणाऱ्या प्रत्येक व्यक्तीबरोबर संपर्क साधण्यापेक्षा कामगारांच्या सहकारी संस्थांशी संपर्क साधणे सोपे जाईल. उत्पादक रोजगाराला आवश्यक विविध कौशल्ये आणि क्षमता असलेला सुमारे ५० कामगारांचा एक असे गट तयार केले पाहिजेत. याकरिता कामगार सहकारी संस्थांसंबंधीचा कायदा आहे. गरज आहे ती या संघटनांना ठराविक किमतीने सतत काम उपलब्ध करून देण्याची. दिलेले काम वेळेत करून देऊन हवे असेल तर पुढचे काम घेणे ही या संस्थांची मुख्य जबाबदारी राहील. या रीतीने रोजगाराची हमी मिळाल्यास या संस्थांची संख्या वेगाने वाढून बरेच बेकार कामगार संघटित होतील. त्यातून, संघटन आणि संबंधित व्यावसायिक बाबी यांचा अनुभव घेतलेले तळातले नेतृत्व उदयाला येईल. उत्पादक कामे शोधणे, त्यासंबंधीच्या योजना तयार करणे आणि त्यांच्या कार्यवाहीसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देणे, ही शासनाची जबाबदारी राहील. कामे शोधणे, त्यासंबंधी प्राथमिक पाहणी करणे आणि त्यांच्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे ही कामे योग्य पातळीवरील स्थानिक शासनाकडे सोपविता येतील. कामांचे अंतिम

नियोजन आणि त्यांची सहकारी संस्थामार्फत अंमलबजावणी ही राज्य शासनाची जबाबदारी असेल. वित्तीय जबाबदारी केंद्र शासनाची असेल; त्यातील राज्य शासनांचा वाटा परस्पर विचाराने ठरविला जाईल.

कामगार संघटनांचा दुसरा पर्याय म्हणजे भूसेना. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात याचा उल्लेख आहे. केंद्र, राज्य, जिल्हा अशा तऱ्हेच्या विविध स्तरांवर तिची उभारणी करता येईल. ज्या बेकार कामगाराला सहकारी कामगार संस्थेमध्ये सहभागी व्हावयाचे नसेल त्याला या सेनेत भरती होता येईल; मात्र त्यासाठी त्याला किमान शारीरिक क्षमतेच्या कसोटीला उतरावे लागेल आणि विशिष्ट काम व वेतन मान्य करावे लागेल. याला भूसेना म्हटले तरी त्याचा प्रत्यक्ष संरक्षण खात्याशी संबंध असावा असे नाही. तरीही अर्धी चड्डी आणि अर्ध्या हाताची पैरण असा पुरुषाचा पोषाख आणि सेनादलातील शिस्तीचे वातावरण असणे उपयुक्त व आवश्यक आहे. दर वर्षी कित्येक हजार बिगरहुद्याचे (non commissioned) अधिकारी सैन्यातून निवृत्त होत असतात; त्यांना पुन्हा रोजगार हवा असतो. या तरूण माणसांना सैन्यदलातला पंधरा वर्षांचा अनुभव असल्याने ते सहजपणे पन्नासेक लोकांचा गट सांभाळू शकतात. त्यांच्या अनुभवाचा तसेच क्षमतेचा उपयोग भूसेनेत उत्तम रीतीने होऊ शकेल. भूसेनेत भरती होणाऱ्यांना दरमहा पगार मिळेल. त्यामुळे हा खर्च फुकट जाऊ नये म्हणून केंद्र शासनाला दक्ष रहावे लागेल. केंद्र आणि राज्य शासन दर वर्षी कामे शोधून त्यांचा संपूर्ण तपशील तयार करतील, ती कामे जिथे असतील तिथे जाऊन भूसेना ती हातात घेऊन पूर्ण करील. त्याकरिता यंत्रे वापरण्यास कोणताही प्रत्यवाय नसावा. किंबहुना, यंत्रे वापरल्यास संघटन अधिक चांगले होईल आणि कामगाराच्या कौशल्यात सुधारणा होईल. अकुशल कामगार नेमल्यास कमी भांडवल लागते या कारणाने कुणालाही कायमचे अकुशल ठेवता कामा नये.

शेवटी या कार्यक्रमांना लागणारा वित्तपुरवठा कसा करावयाचा याचा विचार करावा. कामाचा हक्क मूलभूत केल्या कारणाने, जी कोणती कामगारांची सहकारी संस्था काम मागेल तिला काम देण्याचे, त्याचप्रमाणे अपेक्षित शारीरिक क्षमता असून देईल ते काम व वेतन स्वीकारणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला भूसेनेत दाखल करून घेण्याचे बंधन शासनावर राहील. या उपक्रमांचा वित्तीय बोजा किती असेल ते पुढील तीन ते पाच वर्षांच्या अनुभवावरूनच सांगता येईल. दरम्यान, केंद्र व राज्यांच्या अर्थसंकल्पात यासाठी भरपूर तरतूद करणे उचित ठरेल. शासन किती साधनसंपत्ती उभी करू शकते त्याची सर्वसाधारण कल्पना आपल्याला आहेच.

त्यामध्ये भरीव वाढ करण्यासाठी श्रीमंतांवर कर बसवावे लागतील, तर दुसऱ्या बाजूने, संघटित मजुरांना नियंत्रणाखाली ठेवावे लागेल. यापैकी काही करणे आपल्याला शक्य आहे काय, हे शासनाने अवतीभोवती पाहून ठरवावे. त्यातील फारसे शक्य दिसत नाही. त्यामुळे शासनाने आपले कार्यक्षेत्र मर्यादित करावे हे अपरिहार्य आहे. खाजगी क्षेत्र जे करण्यास तयार आहे ते त्याला करून देणे आणि जे खाजगी क्षेत्राकडून होणार नाही तेवढ्याची जबाबदारी सार्वजनिक क्षेत्राने उचलणे हाच मार्ग आहे.

खाजगी क्षेत्र पूर्ण रोजगार निर्माण करू शकत नाही. ती जबाबदारी शासनाचीच आहे, आणि ती लहान नाही. त्याकरिता करावयाच्या वित्तपुरवठ्याचे अर्थव्यवस्थेवर अनिष्ट परिणाम संभवतात. त्याचे भान ठेवले पाहिजे. नव्याने रोजगार प्राप्त झालेल्या व्यक्तींना वेतन आणि पगार दिल्याने अर्थव्यवस्थेत अधिक क्रयशक्ती निर्माण होते, परंतु त्याचबरोबर ग्राहकोपयोगी वस्तूंचे उत्पादन वाढत नाही. कधीकधी ग्राहकोपयोगी वस्तूंचा उल्लेख 'वेतन वस्तू' असा केला जातो आणि अशा वस्तू म्हणजे अन्नधान्य व जाडेभरडे कापड असा भोळसट ग्रह करून घेतला जातो. हे खरे नाही. गरीबांच्या हातात क्रयशक्ती उपलब्ध होताच ते सर्व प्रकारच्या वस्तू व सेवांची मागणी करतात. शिवाय खर्चाची पहिली फेरी संपली म्हणजे, ती क्रयशक्ती इतरांच्या हातात जाते, त्यातून वाढणाऱ्या उत्पन्नामुळे नुसत्याच वेतन वस्तूंचीच नव्हे, तर कमीजास्त प्रमाणात सर्वच ग्राहकोपयोगी वस्तूंची मागणी वाढते, आणि अंतिमत: त्यांचे उत्पादन करण्यासाठी कच्चा माल व भांडवली वस्तूंची मागणी वाढते. प्रारंभीचा वित्तपुरवठा नवे कर बसवून, कर्जे उभारून, तुटीचा अर्थभरणा करून (म्हणजे नोटा छापून), यांपैकी कोणत्या पद्धतीने केला असेल त्यानुसार नव्या मागणीचे स्वरूप बदलेल. परंतु पूर्ण रोजगाराच्या धडाकेबंद कार्यक्रमामुळे मागणी वाढून यथावकाश सर्वच वस्तू व सेवांच्या किमती वाढणे अनिवार्य आहे.

अशा प्रकारे अर्थव्यवस्थेस काही अंतर्यामी धोके असले तरी यातून आर्थिक विकासालाही गती मिळण्याचा संभव असतो. अर्थव्यवस्थेत उत्पादनाची अतिरिक्त क्षमता उपलब्ध असल्यास आणि तिने बाजारातील मागणीला प्रतिसाद दिला तर विकासास गती मिळेल. यात ती अपयशी ठरली तर चलनफुगवटा व भाववाढ अटळ आहे. म्हणून यासंबंधीचे निर्णय जबाबदारीचे व दूरगामी ठरतील. बाजारातील वाढत्या मागणीला अर्थव्यवस्थेने कसा प्रतिसाद द्यावा? विस्तृत नियोजन करून की, बाजारातील परिस्थितीनुसार पावले उचलण्याचे स्वातंत्र्य खाजगी क्षेत्राला देऊन? सुदैवाने सोविएत युनियनप्रमाणे आपण संपूर्ण केंद्रीय नियोजनाचा अवलंब केला

नसल्याने, तांत्रिक व व्यवस्थापकीय कौशल्य असलेले अधिकारी, उपलब्ध असलेले एक विस्तृत आणि उत्साही खाजगी क्षेत्र अजूनही अस्तित्वात आहे. बाजाराला प्रतिसाद कसा द्यावा याचे ज्ञान सार्वजनिक क्षेत्रापेक्षा खाजगी क्षेत्राला अधिक असते. बाजाराविषयीचे ज्ञान आणि त्या अनुषंगाने आवश्यक ते उत्पादनविषयक निर्णय त्वरित घेणे खाजगी क्षेत्राला शक्य असते, जे सार्वजनिक क्षेत्राला नसते. म्हणूनच या बाबत खाजगी क्षेत्र अधिक कार्यदक्ष ठरते. गेल्या वर्ष–दोन वर्षात रशिया व अन्य समाजवादी देशात झालेल्या उलथापालथीचे बीज सार्वजनिक क्षेत्राच्या याच अकार्यक्षमतेत आहे. खाजगी क्षेत्राच्या या वैशिष्ट्याचा पूर्ण फायदा उठवावयाचा असल्यास, त्याच्या निर्णयप्रक्रियेत आणि प्रेरणांमध्ये हस्तक्षेप करण्याचे शासनाने टाळावे हे बरे. 'अधिक श्रमप्रधान क्षेत्रांकडे व तंत्रविज्ञानाकडे खाजगी गुंतवणुकीचा ओघ परिणामकारकपणे वळविता येण्यासाठी' वित्तीय व पतपुरवठा धोरणांचा वापर करण्याचा मानस नियोजन मंडळाने व्यक्त केला आहे, तो टाळावा. वास्तविक खाजगी व सार्वजनिक क्षेत्रांच्या जबाबदाऱ्यांनुसार त्यांना साधनसंपत्ती विभागून देणे हे वित्तीय व पतपुरवठा धोरणांचे प्रधान कार्य आहे; ही धोरणे याच उद्देशाने आखली गेली पाहिजेत.

घटनेने दिलेल्या रोजगाराच्या हक्काचा आदर करणे आणि सर्व गरजूंना रोजगार उपलब्ध करून देणे ही पूर्णतया शासनाची जबाबदारी आहे. आठव्या पंचवार्षिक योजनेचा भर रोजगारावरच असेल तर शासनाला आपली सर्व वित्तीय, तांत्रिक आणि प्रशासकीय साधनसंपत्ती या एका उद्दिष्टाप्रत कारणी लावावी लागेल. हे केले तरच, बेकारी संपुष्टात येऊन उपलब्ध मानवी संपत्ती विकासाचा वेग वाढविण्यासाठी उपयोगात येण्याची शक्यता आहे. उलटपक्षी, शासन आपल्या आर्थिक कुवतीपलीकडचे काही करू म्हणेल तर अर्थव्यवस्था चलनफुगवटा व भाववाढीच्या गर्तेत पडेल. मग किंमती व वेतनावर मर्यादा आणि वस्तू व सेवांसाठी लांबच लांब रांगा अटळ होतील. सोविएत युनियन आणि इतर समाजवादी देश याच परिस्थितीतून बाहेर पडण्याची धडपड करीत आहेत.

रोजगाराच्या समस्येचा तिढा हा असा आहे. म्हणूनच रोजगाराच्या हक्काला राज्यघटनेमध्ये मूलभूत हक्काचे स्थान देताना काळजीपूर्वक पावले उचलावी लागतील. सुरूवातीला कमी वेतन द्यावे लागेल व त्याचबरोबर कामासाठी अधिक काटेकोर अटी घालाव्या लागतील. पुरेसा अनुभव मिळाल्यानंतर आणि अर्थव्यवस्था हे सर्व कितपत पचनी पाडू शकते हे समजल्यानंतर वेतन वाढविता येईल, कामाच्या अटी काहीशा सैल करता येतील. पूर्ण रोजगारात कामगारांना शिस्त ठेवणे अवघड होते हा सोविएत रशियाचा अनुभव आहे, त्याचे भान आपण राखले पाहिजे. आपण

स्वभावतःच कष्ट करणारी माणसे नव्हेत. सर्व काही गोष्टींसाठी शासनावर अवलंबून राहण्याची आपली परंपराच आहे; स्वातंत्र्योत्तर काळात तिला खतपाणी घालून दृढ बनविले गेले आहे. म्हणून रोजगाराचा घटनात्मक हक्क काम न करण्याचा कायदेशीर हक्क होण्याचा धोका आहे. असा हक्क राष्ट्राच्या विनाशाची नांदी ठरेल. ते टाळावयाचे तर रोजगाराचा हक्क न्यायालयाच्या कक्षेतून कटाक्षाने बाहेर ठेवला पाहिजे. आर्थिक विकास साधणारा रोजगार कायद्याने प्रस्थापित होत नाही आणि न्यायालयातून मिळविता येत नाही. त्यासाठी शासनसंस्थेकडे काही आर्थिक आणि संघटनात्मक क्षमता असावी लागते. तिने आपल्या मर्यादेतच जबाबदारी स्वीकारली पाहिजे. लोकप्रिय निवडणूक जाहिरनामे अथवा भंपक शब्दावलीचे मानवी हक्काचे जाहिरनामे यास बळी पडता कामा नये.

**संदर्भ टीपा**


१. नॅशनल फ्रंट मॅनिफेस्टो, पृ. १६.
२. लोकसभा सचिवालय, एस्टिमेट्स कमिटी (१९७८-७९), थर्टी-फोर्थ रिपोर्ट, परिच्छेद २.२८.
३. संयुक्त राष्ट्रसंघ, ह्यूमन राईट्स : ए कंपायलेशन ऑफ इंटरनॅशनल इन्स्ट्रूमेंट्स, पृ. ५.
४. आदिशेशय्या, ''ॲडॉप्ट वेज - गुड्स मॉडेल टू इम्प्लिमेंट इट '', कुरुक्षेत्र, मार्च १९९०, पृ. १.
५. बसू, डी. डी, कॉमेंटरी ऑन द कॉन्स्टिटयूशन ऑफ इंडिया, १९८१, पृ. ११३; कश्यप, सुभाष यांनी कुरुक्षेत्र, मार्च १९९०, पृ. २० येथे संदर्भ दिल्याप्रमाणे.
६. तत्रैव.
७. तत्रैव.
८. तत्रैव, पृ. ९.
९. तप, पृ. ३५.
१०. श्रम मंत्रालय, राइट टू वर्क ॲप्रोच, कॉन्स्टिट्यूशनल अमेंडमेंट, लेजिसलेशन ऑन वर्क गॅरंटी, फिनॅन्शिअल ॲन्ड अदर कन्सिडरेशन्स, सप्टेंबर १९९०, परिच्छेद ९.
११. तत्रैव, परिच्छेद ११.
१२. तत्रैव, परिच्छेद १२ (ii).
१३. तत्रैव, परिच्छेद १-२.
१४. तत्रैव, परिच्छेद ६, १२.
१५. नियोजन मंडळ, ॲप्रोच टू द एट्थ फाईव्ह इयर प्लॅन : १९९०-९५, मे १९९०, परिच्छेद १-४.
१६. तत्रैव, परिच्छेद ११७.
१७. नियोजन मंडळ, फोर्थ फाईव्ह ईयर प्लॅन, १९६९-७४, पृ. ४३४.
१८. नियोजन मंडळ, एम्प्लॉयमेंट : पास्ट ट्रेंड्स अँड प्रॉस्पेक्ट्स फॉर नाइन्टिन नाइन्टीज, मे १९९०, परिच्छेद २४.
१९. तत्रैव.
२०. तत्रैव, परिच्छेद समरी (१५).


*(पूर्वप्रसिद्धी : अर्थसंवाद, जुलै-सप्टेंबर १९९१, खं. १४, अं.४. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या विद्यमाने ३० जुलै १९९० रोजी जे. पी. नाईक भवन, मुंबई विद्यापीठ संकुल, विद्यानगरी, मुंबई येथे झालेले स्व. जमनालालजी बजाज स्मृती व्याख्यान (पहिले)).*

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथलयाचाही लाभ घेता येईल.

## 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलाकडे व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## अर्थबोधपत्रिका मासिक
## वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २००/– रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/– रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/– रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८००/– रुपये** |

**The Bank details for NEFT are as under :**

- Bank Name : **Vidya Sahakari Bank S.B. Road, Pune 411016.**
- Account Name : **Indian School of Political Economy**
- Bank Account No. : **200403130004208**
- NEFT/RTGS No. : **SVCB0003004**
- IFSC Code : **SVCB0003004**

# वाचनीय नवीन पुस्तके

**शिकता शिकविता**
**लेखक : नीलेश निमकर**
समकालीन प्रकाशन, पुणे
**पहिली आवृत्ती – १४ नोव्हेंबर २०२२ (बालदिन)**
**पृष्ठे – २२३, किंमत – रु. ३००/–**

शिक्षणाच्या, आणि विशेषकरून बालशिक्षणाच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या शिक्षणप्रेमींना 'नीलेश निमकर' हे व्यक्तिमत्त्व चांगल्यापैकी परिचित आहे. बालशिक्षण, आणि त्यांतही पुन्हा आदिवासी जनसमूहांसारख्या, औपचारिक शालेय शिक्षणाच्या विश्वापासून कित्येक शतके दूरच राहिलेल्या समाजघटकांमधील मुलामुलींवर शिक्षणाचे संस्कार घडविण्यात वर्षानुवर्षे व्रतस्थपणे योगदान देत राहणाऱ्या आजघडीच्या अग्रमानांकितांमध्ये अंतर्भाव असणाऱ्या नीलेश निमकर यांचे हे पुस्तक म्हणजे शिक्षणव्रतींसाठी जणू एक 'वर्कबुक'च होय. दुर्गम भागांतील आदिवासी मुलामुलींवर अक्षरसंस्कार घडविण्याद्वारे पदरी जमा झालेले उदंड असे द्विदशकी प्रत्यक्षानुभवसंचित आणि शिक्षणविषयक अव्वल दर्जाच्या संशोधनपूत नियतकालिकांमधून प्रकाशित होणाऱ्या अभ्यासांचे मर्मज्ञ वाचन यांच्या संगमाद्वारे निपजलेले निमकर यांचे या ग्रंथातील विवेचन समृद्ध वाचनानुभव प्रदान करणारे असेच आहे. बालशिक्षणाचे क्षेत्र किती प्रकारच्या आणि किती सखोल चिंतन–मननाची मागणी करणारे आहे, याची प्रचिती या पुस्तकाच्या पानोपानी आपल्याला येते. अतिशय मोकळ्या, संवादप्रधान, सरळ आणि नितळ लेखनशैलीमध्ये शब्दबद्ध झालेले निमकर यांचे अनुभवविश्व, प्रचलीत शिक्षणव्यवस्थेतील गंभीर चकवे आणि समस्या कनवाळू शिक्षकाच्या हळुवारपणे परंतु कमालीच्या सचिंत आत्मीयतेने अनेक प्रसंगांद्वारे आपल्या पुढ्यात उलगडते. प्रत्येकालाच अंतर्मुख होण्यास भाग पडणारा आणि शिक्षणाच्या प्रांताकडे संवेदनशीलतेने बघण्यास सर्वच संबंधितांना प्रवृत्त करणारा असाच हा दस्तऐवज होय.

**RNI Regn. No. MAHMAR/2002/9806**
**Published and Posted at Model colony Post Office Pune,**
**On 10th of each month**

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■ भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■ अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग-व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■ इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■ संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राकिय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■ संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■ अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे – ४११ ०३०. येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे-४११ ०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**